
# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक दुसरा

## राष्ट्रीय विज्ञान दिन





## आवर्जून वाचावे









# मेहता पब्लिशिंग हाऊसला प्रकाशन क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पुरस्कार



‘फेडरेशन ऑफ पब्लिशर्स ॲन्ड बुक सेलर्स असोसिएशन’ या प्रकाशन क्षेत्रातील सर्वोच्च संस्थेच्या वतीने यावर्षीपासून दिला जाणारा ‘गोल्डन ॲवॉर्ड’ स्वीकारताना मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक, संचालक श्री. अनिल मेहता.

गेली ५० वर्षे पुस्तक विक्री आणि प्रकाशन क्षेत्रामध्ये दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल हा पुरस्कार श्री. अनिल मेहता यांना प्रदान करण्यात आला. या वर्षीचा हा सन्मान भारतातील चार प्रकाशन संस्थांना देण्यात आला.

‘फेडरेशन ऑफ पब्लिशर्स ॲन्ड बुक सेलर्स असोसिएशन’ संस्थेच्या ६२व्या वार्षिक सभेचे औचित्य साधून हे पुरस्कार देण्यात आले. नवी दिल्लीतील ‘Le Meridien’ या हॉटेलमध्ये २८ जानेवारी २०१७ रोजी हा समारंभ पार पडला. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या उपस्थितीत FPBA संस्थेचे अध्यक्ष सुभाष सेठी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# मेहता मराठी
# ग्रंथजगत

। फेब्रुवारी २०१७ । वर्ष सतरावे । अंक दुसरा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २३८

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **वाचनप्रेमी** | १० |
| **उपक्रम** | १२ |
| **साहित्यवार्ता** | १८ |
| **पुरस्कार** | ४४ |
| *पुस्तक परिचय* | |
| **मी झारा गहरमानी : एक देशद्रोही** | ४८ |
| **पीस, लव्ह ॲण्ड हीलिंग** | ६२ |
| **स्मरण** | ८२ |
| **श्रद्धांजली** | ८६ |
| **अभिप्राय** | ८८ |
| **बालनगरी** | ९४ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## प्रकाशन व्यवसायाचं मराठीच्या भरणपोषणातील योगदान

मराठी पुस्तकांच्या कोणत्याही ग्रंथालयात, दुकानात किंवा प्रदर्शनात गेलं, की मराठीतील विविध विषयांवरची नवी-जुनी पुस्तकं लक्ष वेधून घेतात. अशा ठिकाणी वाचकांची अवस्था हे पुस्तक घेऊ का ते घेऊ, अशी झालेली असते. मराठीच्या या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीचं श्रेय अर्थातच त्या पुस्तकाच्या लेखकांबरोबरच द्यावं लागतं ते प्रकाशकांना. लेखकाच्या हस्तलिखिताचं (किंवा अन्य मार्गाने लिखित स्वरूपात साकारलेल्या संहितेचं) सुबक-सुंदर पुस्तकात रूपांतर करून ते पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचविण्याचं काम प्रकाशक करत असतात. पुस्तकनिर्मितीचं हे सर्जनशील काम करणाऱ्या अनेक प्रकाशकांच्या आणि प्रकाशन संस्थांच्या मराठीच्या भरणपोषणातील योगदानाचा हा एक धावता आढावा.

मूळ पुंडलिकाने लिहून घेतलेल्या ज्ञानेश्वरीच्या संहितेवर साडेसातशे वर्षांच्या अवधीत अनेक संस्कार, संपादनं झाली असतील; पण साडेसातशे वर्षांनंतरही आपण ज्ञानदेवांना अनुभवू शकतो ते प्रकाशकांमुळे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या भाषेतील फरक आपल्या लक्षात येतो; कारण त्यांचं साहित्य लिखित स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोचलं आहे, प्रकाशकांमुळे. समग्र संत साहित्य, पंडिती साहित्य, स्वातंत्र्यपूर्व काळातील साहित्य आणि स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्य, साहित्याचे काव्य, लघुनिबंधापासून ललित लेखनापर्यंतचे विविध आकृतिबंध आपण वाचू शकतो ते प्रकाशकांमुळे. कविता, कादंबरी, नाटक, ललित लेख, चरित्र, आत्मचरित्र, कथासंग्रह, प्रवासवर्णन, वैचारिक, धार्मिक, आध्यात्मिक इ. विविधरंगी साहित्याने

मराठीला संख्यात्मक, गुणात्मकदृष्ट्या समृद्ध केलं, ती समृद्धी आपल्यापर्यंत पोहोचते प्रकाशकांमुळे.

मराठी साहित्यामध्ये जेव्हा नवीन वळणे आली तेव्हा त्या त्या वळणावर साहित्यामध्ये अवतीर्ण झालेल्या नव्या प्रवाहांना सामावून घेऊन ते नवीन प्रवाह वाचकांपर्यंत पोहोचविण्याचं कामही प्रकाशकांनी केलं. त्या त्या वेळी ते आव्हान प्रकाशकांनी स्वीकारलं म्हणून आज अभ्यासकांना, वाचकांना मराठी साहित्यातील विविध वाटांवर, वळणांवर रेंगाळता येतं. त्या त्या वेळच्या नवीन प्रवाहांविषयी जाणून घेता येतं. सामाजिक जाणिवेतून निर्माण झालेलं साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा वसा घेऊन प्रकाशकांनी त्या सामाजिक जाणिवेला एक प्रकारे पाठिंबा दिला. 'यमुनापर्यटन' ही विधवा विवाह या विषयावरील बाबा पदमनजींची कादंबरी ज्या काळात प्रसिद्ध झाली, तो काळ विधवा विवाहाला अनुकूल नव्हता. तरीही ती कादंबरी छापण्याचं धारिष्ट्य तत्कालीन प्रकाशकांनी (त्या काळात प्रकाशक हा शब्द रूढनसावा. मुद्रक किंवा छापखाना मालक असं संबोधन त्या काळात वापरलं जात असावं.) दाखवलं. स्नेहवर्धन प्रकाशनाने ही कादंबरी तिच्या चौथ्या आवृत्तीच्या (१९३७ सालच्या) प्रस्तावनेसह पुनर्प्रकाशित केली आहे. मराठीतील ही पहिली कादंबरी बुकगंगा डॉट कॉमवर वाचकांना उपलब्ध होऊ शकते. र. धों. कर्व्यांची संतती नियमनासाठीची पुस्तकं छापण्याचे धारिष्ट्य त्या काळातही प्रकाशकांनी (मुद्रकांनी) दाखवले.

साहित्यात स्त्रीवादी, दलित, नवसाहित्य (विशेषत: कथा) इ. प्रवाह जेव्हा दाखल झाले त्यावेळी ते प्रवाह मराठीत कितपत रुळतील किंवा वाचक त्यांचं कसं स्वागत करतील याचा विचार न करता प्रकाशकांनी ते साहित्य वाचकांसमोर आणलं आणि मराठीतील हे प्रवाह एका ठराविक कालखंडासाठी का होईना मराठीत रुळले, मराठीचं दालन या प्रवाहांनी समृद्ध केलं. एक नवी विचारधारा या प्रवाहांच्या निमित्ताने मराठीला लाभली. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात या प्रवाहांचं वेगळेपण उठून दिसलं. अर्थातच हे सगळं शक्य झालं ते प्रकाशकांमुळे.

नाथमाधव, हरी नारायण आपटे, वा. म. जोशींच्या कालखंडानंतर वि.स. खांडेकर यांनी 'जीवनासाठी कला' आणि ना. सी. फडके यांनी 'कलेसाठी कला' या वादातून एक नवे रूप मराठी कादंबरीला प्राप्त करून दिले. त्या कादंबऱ्यांच्या निमित्ताने  मराठी भाषेचं संक्रमणही वाचकांना अनुभवायला मिळालं. तर कादंबरीचं हे नवं रूप आणि मराठीचं हे संक्रमणही प्रकाशकांनी तेवढ्याच उत्साहाने वाचकांसमोर आणलं. हीच कादंबरी

'रणांगण', 'कोसला,' 'बळी', 'बनगरवाडी' या वळणांवर आणखी वेगळ्या स्वरूपात आली आणि प्रकाशकांनी तिचं हेही स्वरूप वाचकांसमोर ठेवलं. 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'मृत्युंजय' सारख्या कादंबऱ्यांनी लोकप्रियतेचा उच्चांक गाठला, हे खरं असलं तरी लोकांपर्यंत या कादंबऱ्या पोहोचविण्याचं काम प्रकाशकांनी केलं, हे मान्य करावं लागतं.

आकर्षक सुरुवात, गाठ, निरगाठ आणि शेवट या आकृतिबंधात अडकलेल्या कथेला १९४५मध्ये नवकथेच्या रूपाने एक नवीन आकृतिबंध लाभला आणि ती सघन झाली. आकृतिबंधाचं हे नवेपण आणि तिची सघनता वाचकांपर्यंत पोहोचविण्याचं काम केलं ते पॉप्युलर प्रकाशनाने, पर्यायाने रामदास भटकळ यांनी. मौज प्रकाशनाचे श्री. पु. भागवत आणि पॉप्युलर प्रकाशनाच्या रामदास भटकळांना साहित्याची उत्तम जाण, व्यासंग आणि संपादनकौशल्य असल्यामुळे प्रतिभावंत लेखकांच्या उत्तमोत्तम साहित्यकृती त्यांनी मराठी वाचकांसमोर आणल्या. मेहता पब्लिशिंग हाऊस, कॉन्टिनेन्टल, मॅजेस्टिक, राजहंस, दिलीपराज प्रकाशनासह अनेक लहान-मोठी प्रकाशने मराठीच्या भरणपोषणात मोलाचं योगदान देत आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अनिल आणि सुनील मेहता या पिता-पुत्रांनी लेखकांची मांदियाळी जमवून विविध आकृतिबंध वाचकांसमोर आणले. तसेच साहित्याची उत्तम जाण, व्यासंग आणि संपादनकौशल्य असल्यामुळे स्वतंत्र पुस्तकांच्या निर्मितीबरोबरच अनुवादित पुस्तकांची निर्मिती, ही मेहतांची खास ओळख आहे. इंग्रजी, बंगाली, गुजराती, कन्नड भाषेतील उत्तमोत्तम साहित्यकृती आणि पुस्तकं मराठीत आणण्याचं श्रेय मेहतांकडे जातं. या अनुवादित पुस्तकांच्या आकृतिबंधांत आणि आशयातही वैविध्य आहे. विशेषत: इंग्रजीतील बेस्ट सेलर कादंबऱ्या मराठीत आणल्यामुळे त्या कादंबऱ्यांची व्यापकता, रहस्यमयता, थरार, त्या कादंबऱ्यांना लाभलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि भावनांचं वादळ, हे सगळं मराठी वाचकांनाही अनुभवता येतं.

तर, नवनिर्मिती, समीक्षा आणि संशोधन या तीनही पातळ्यांवर प्रकाशकांनी दिलेलं योगदान मराठीच्या भरण-पोषणाला कारणीभूत ठरलं आहे. प्रकाशनांची ही वाटचाल अशीच सृजनशील वाटेने अखंड चालत राहो आणि मायमराठीच्या दालनाची समृद्धी वृद्धिंगत होवो!



# मेहता मराठी ग्रंथजगत

## विशेष...

दि. १ मार्च, २०१६ पासून
मेहता पब्लिशिंग हाऊस
'मेहता मराठी ग्रंथजगत'ची
वार्षिक वर्गणी
बंद करीत आहोत.
तरी आपण
त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी
पाठवून सहकार्य करावे,
ही विनंती.

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

---

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com


GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**www.amazon..com उपलब्ध....**

eBooks



# वाचनप्रेमी

## आम्हा घरी धन : पुस्तकं जगण्याचं भान देतात

स्वतःला समजून घेण्यासाठी वाचन करणं खूप महत्त्वाचं असतं. देश, प्रांत, भाषा यापलीकडचा अनुभव आपल्याला पुस्तकांतून येतो, सांगताहेत लेखक-दिग्दर्शक सचिन कुंडलकर.

अनेक वेगवेगळ्या लेखकांची पुस्तकं वाचायला मला आवडतात; पण त्यातही काही लेखकांवर आणि पुस्तकांवर माझं निरातिशय प्रेम आहे. ही पुस्तकं त्यामुळेच मला आपलीशी वाटतात.

स्वत:ला समजून घेण्यासाठी वाचन करणं खूप महत्त्वाचं असतं. वाचनाला प्रादेशिक मर्यादा असू नयेत, असं मला वाटतं. देश, प्रांत, भाषा या पलीकडे जाऊन अनुभव घ्यायचा असेल तर त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचं वाचन व्हायला हवं. यामुळे मला ब्रिटिश, फ्रेंच, तुर्की लेखकांची पुस्तकं वाचायला खूप आवडतं. ब्रिटिश लेखक जेफ डायर यांची सगळीच पुस्तकं मला आवडतात. त्यातही त्यांचं 'पॅरीस ट्रान्स' हे माझं आवडतं पुस्तक. वर्तमानाचा संदर्भ देत अगदी बारीक बारीक तपशील त्यांच्या लेखनात आढळतात. खऱ्या जगाचं भान मला त्यांच्या पुस्तकांतून मिळतं. याचप्रमाणे फ्रेंच लेखक मिशेल वेलबेक यांचीही पुस्तकं मला वाचायला आवडतात. त्यांचं फ्रान्समधील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवरील सबमिशन हे पुस्तक मध्यंतरीच्या काळात खूप गाजलं. विनोदाच्या अंगाने परखड भाष्य करणारी त्यांची शैली मला खूप भावते. यामुळेच त्यांच्या नवीन लेखनाचीही मी वाट पाहत

असतो. मला खूप ऊर्जा मिळते त्यांच्या पुस्तकांतून.

ॲलन हॉलिंगस्ट यांचं ‘लाइन ऑफ ब्युटी’ हे पुस्तक मला खूप आवडतं. मार्गरिट थॅचर यांच्या काळातील समाजजीवन दर्शवणारी ही कादंबरी आहे. लंडनमधील एका कुटुंबाला केंद्रस्थानी ठेवून तिथल्या समाजाचं दर्शन या पुस्तकातून घडतं. याप्रमाणेच ओरहान पामुक या तुर्की लेखकाचं ‘अदर्स कलर’ हेही माझं आवडतं पुस्तक. या लेखकांच्या पुस्तकातून तिथली सांस्कृतिक, वैचारिक पार्श्वभूमी आपल्याला कळते. दूर देशातल्या या संस्कृतीचा अनुभव घेताना आपण जगाच्या अधिक जवळ आल्याचं भान येतं.

शांता गोखले यांची ‘त्या वर्षी’ ही कादंबरी मला पुन:पुन्हा वाचायला आवडते. ही कादंबरी वाचल्यानंतर मनात कायम हुरहूर जाणवत राहते. दुर्गा भागवत, मिलिंद बोकिलांचं लिखाणही वाचायला आवडतं. त्यांची शैलीच वेगळी आहे. त्यांच्या ‘एकदम’, ‘समुद्र’ या पुस्तकांतून वाचक म्हणून प्रत्येक वेळी वेगळा अनुभव आपल्याला मिळतो. याचप्रमाणे मला महेश एलकुंचवारांचं लेखन खूप आवडतं. त्यांचं सगळं ललित लेखन, नाटकं आणि इतर सर्वच साहित्य वाचायला मला आवडतं. ते पुस्तकांतून स्वतःचं आयुष्य फार परखडपणे मांडतात. आपल्याच आयुष्याकडे त्रयस्थपणे पाहण्याची दृष्टी त्यांच्या पुस्तकांतून मिळते. या सगळ्या लेखकांमध्ये एक समान धागा आढळतो तो म्हणजे त्यांच्या जगण्याचा सारा अवकाश ते यातून मांडू पाहतात आणि आपणही आपल्या आयुष्याशी तो तोलून बघतो. त्यामुळेच की काय जेफ डायरसारखा तरुण लेखक असो अथवा महेश एलकुंचवार, दोघांच्या पुस्तकांतून जगण्याचं भान येतं. अतिशय टोकदार असं यांचं लिखाण आहे. एलकुंचवारांच्या ‘त्रिबंध’ या पुस्तकातून असा अनुभव आपल्याला मिळतो. आपल्याला ते पटत असतं, मान्य होत असतं; पण ते स्वीकारलं जात नाही. जगण्यातला हा टोकाचा खरेपणा पेलण्याची, स्वीकारण्याची ताकद मला महेश एलकुंचवारांच्या पुस्तकातून मिळते.

**– सचिन कुंडलकर**

**(साभार – दैनिक सामना उत्सव पुरवणी**
**१५ ऑक्टोबर २०१६ )**



## उपक्रम

## दिनविशेष

**दिसामाजि काहीतरी ते लिहावे।**
**प्रसंगी अखंडित वाचित जावे।।**

**- श्री स्वामी समर्थ रामदास**

**वाचकांसाठी सुवर्णसंधी**

**‘करा मैत्री पुस्तकांशी’**

**‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ चा नवीन उपक्रम**

**१५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०१७ दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

**authors@mehtapublishinghouse.com**

# दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
# ४०टक्क्यांपर्यंत सूट

**१९ फेब्रुवारी - छत्रपती शिवाजी महाराज जयंती**

रणजित देसाई लिखित 'श्रीमान योगी'
या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ५४०/-**

*१९ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ३९९/-**

**१९ फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'Schapelle', 'शॅपेल (मराठी)' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५२०/-**

*१९ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत २६०/-**

**२२ फेब्रुवारी - जागतिक विचार दिवस**

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग, द माइंड जिम, येस! मन:परिवर्तन शास्त्रातील ५० गुपितं, शांततेने काम करा!, प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०२०/-**

*२२ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ६९९/-**

**२३ फेब्रुवारी - ज्योत्स्ना लेले यांचा जन्मदिन**

'कॅच मी इफ यू कॅन, लेफ्ट टू टेल, ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स, परमवीर चक्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०१५/-**

*२३ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारीपर्यंत.*

**सवलत किंमत ५९९/-**

## २३ फेब्रुवारी - सुचित तांबोळी यांचा जन्मदिन

सुचित तांबोळी लिखित 'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत.

**सवलत किंमत २९९९/-**

**मूळ किंमत - २००/-**

*२३ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारीपर्यंत.*

## २५ फेब्रुवारी – आ. बा. पाटील यांचा जन्मदिन

**आ. बा. पाटील लिखित** 'बोन्साय, घरातील बाग, शेती करू फायद्याची, सुंदर आपली फुलबाग, सुंदर आपली फळबाग' या पुस्तकसंचावर सवलत.

**सवलत किंमत ४९९/-**

**संचाची मूळ किंमत - ७४०/-**

*२५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारीपर्यंत.*

## २७ फेब्रुवारी– अशोक पाथरकर यांचा जन्मदिन

'अलाव्ह, हे सर्व आपल्याला कुठे नेणार, हुकूमशाहीच्या सावलीत, द असोशिएट, द गिफ्ट ऑफ रेन, द पार्लमेन्टरी सिस्टिम' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत १०९९/-**

**संचाची मूळ किंमत - १९६०/-**

*२७ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारीपर्यंत.*

## २७ फेब्रुवारी – मराठी राज्यभाषा दिन

'मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित सर्व पुस्तकांवर **४०% सूट**

*('स्वामी' सोडून)*

*२७ फेब्रुवारीपर्यंत*

## २८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन

'**डी. एस. इटोकर लिखित** वैज्ञानिक खेळणी, छंदातून विज्ञान, फक्त खेळण्यांसाठी, खेळणीच खेळणी, खेळणी विज्ञानाची, वाचनातून विज्ञान, A to Z विज्ञान ही पुस्तके., **डॉ. अरुण मांडे लिखित** विज्ञान गमती, विज्ञान जमती पुस्तके.,

**मीना किणीकर लिखित** चला प्रयोग करू या! -

१. अन्न / परिस्थितीशास्त्र /
 रसायने / पदार्थ

२. अवकाश / हवास्थिती /
 हवा / उष्णता

३. मोजमापे / ध्वनी /
 ऊर्जा / गती : चलन

या एकत्रित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ११२५/-**

*२८ फेब्रुवारी ते १मार्चपर्यंत.*

**सवलत किंमत ६९९/-**

## २८ फेब्रुवारी -स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन

'द सिमीऑन चेंबर, द ॲटर्नी, क्रिटिकल मास' या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १०८०/-**

*२८ फेब्रुवारी ते १ मार्चपर्यंत.*

**सवलत किंमत ६४९/-**

## १ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन

पांडुरंग कुंभार लिखित 'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत – १३०/-**

*१ मार्च ते २ मार्चपर्यंत.*

**सवलत किंमत ६५/-**

## ४ मार्च - जागतिक लैंगिक अत्याचार विरोधी दिन

‘द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स, हरवलेले बालपण, द काइट रनर, अ‍ॅन आय फॉर अ‍ॅन आय, डिनायल, मी अनिता राकेश सांगतेय, इन द नेम ऑफ ऑनर, सर्कल ऑफ लाइट, मिराज, फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स, सेक्स वर्कर, आलो-अंधारि, शेम, द प्राइस ऑफ लव्ह, माझी ललाटरेषा, आमेन : अ ऑटोबायॉग्राफी ऑफ अ नन’

या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३३७०/-**

*४ मार्च ते ६ मार्चपर्यंत*

**सवलत किंमत २०२२/-**

## ८ मार्च - आंतरराष्ट्रीय महिला दिन

‘रुपेरी सिंधू, क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता,
चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग २ व ३,
नोबेल ललना भाग १ व २,
आय डेअर, स्वप्नाकडून सत्याकडे,
अंतराळवीर सुनीता विल्यम्स,
अ‍ॅज आय सी : भारतीय पोलीस सेवा,
अ‍ॅज आय सी : नेतृत्व आणि प्रशासन,
अ‍ॅज आय सी : स्त्रियांचे सक्षमीकरण,
इट्स ऑलवेज पॉसिबल,
मजल दरमजल,
बी द चेंज : भ्रष्टाचाराशी लढा,
व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय’

या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३०९५/-**

*८ मार्च ते १० मार्चपर्यंत*

**सवलत किंमत १७९९/-**

### १२ मार्च – यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन

'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध, पहिली फेरी' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५००/-**

*१२ मार्च ते १४ मार्चपर्यंत*

सवलत किंमत
२५०/-

### १५ मार्च – जागतिक अपंग दिन

नसीमा हुरजूक 'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २३०/-**

*१५ मार्च ते १७ मार्चपर्यंत*

सवलत किंमत
१४९/-

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

website : www.mehtapublishinghouse.com


**आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा**

**www.mehtapublishinghouse.com**

**e-books** आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता Computer, i-pad आणि Tab वर वाचा.

play.google.com/store/books • m.dailyhunt.in/Ebooks/marathi

www.amazon.com उपलब्ध....

**मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)**
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

**T-Book Club**
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com



# साहित्य वार्ता

## ‘वाचणाऱ्याने वाचत जावे’

मराठी वाचकांची संख्या खूप कमी झालीय असे आज संपादकांपासून प्रकाशक, विक्रेते सर्वचजण म्हणत असतात आणि ते बहुतांश खरेही आहे. म्हणजे बघा, आपल्याकडे सर्वाधारणपणे पुस्तकाची आवृत्ती एक हजार प्रतींची असते; पण ही आवृत्ती संपायला चार - पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागतो. मराठीतील नामवंत प्रकाशनांनी छापलेल्या अनेक दिग्गज लेखकांच्या पुस्तकांची दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षे झाली तरी पहिली आवृत्ती संपलेली नाहीये. अनेक महत्त्वाच्या पुस्तकांच्या जुन्या आवृत्तीच्या प्रती ग्रंथप्रदर्शनातून अक्षरश: वीस-तीस रुपयांना मिळतात. नाटक-कविता या प्रकारच्या पुस्तकांची आवृत्ती तर पाचशे प्रतींचींच असते. इंग्रजी वगैरे सोडाच, पण अगदी कन्नड, तेलगु, बंगाली आदी इतर भारतीय भाषांच्या तुलनेत मराठी वाचकांची (अर्थात, इथे ग्रंथ विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या गृहीत धरलीय) संख्या तुलनेने खूपच कमी आहे. इंग्रजीत सर्वाधिक खपाच्या पुस्तकांचा क्रम मांडायचा ठरवला तर पहिल्या पाचही ग्रंथांच्या प्रतींची विक्री दहा कोटींपेक्षा जास्त आहे. १९९७ साली आलेल्या ‘हॅरी पॉटर’या पुस्तकाच्या सात भागांची एकूण विक्री ४० कोटी प्रतींची आहे; पण अकरा-बारा कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या महाराष्ट्रात कोणत्याही मराठी ग्रंथाची विक्री कोटीत तर सोडा, काही हजारांतही होणे दुरापास्त झाले आहे.

काही वाचक ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचतात. आपल्याकडे वाचनालयांची एक सशक्त परंपरा आहेच. मुंबईतील रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय १८०४ सालचे; पण या ग्रंथालयात १८४०पर्यंत भारतीयांना प्रवेश नव्हता. निव्वळ इंग्रज लोक या ग्रंथालयाचा लाभ घेत. त्यामुळे मराठी माणसाच्या दृष्टीने रत्नागिरी येथील पहिले सार्वजनिक ग्रंथालय जे १८२८ साली सुरू झाले. आजही महाराष्ट्रात शंभर-सव्वाशेपेक्षा

जास्त वर्षे सेवाकार्यात असलेली शंभरावर जुनी ग्रंथालये आहेत. त्यापैकी आपल्या कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर, गारगोटी, शिरोळ, कुरुंदवाड, इचलकरंजी येथील पाच ग्रंथालयांची नावे सांगता येतील. या ग्रंथालयांत उपलब्ध असणारी दुर्मिळ ग्रंथसंपदा वाचकांसाठी एक अनमोल ठेवा आहे. खरेतर या वाचनालयांची अभिमानाने नोंद घेण्यासाठी त्यांना खास बाब म्हणून 'हेरिटेज'चा दर्जा द्यायला हवा. विद्यापीठ आणि शाळा-महाविद्यालयांतही सुसज्ज ग्रंथालये असतात; पण तेथेही वाचणाऱ्यांची संख्या समाधानकारक नाहीच. १८९६ साली शंकर वावीकर या गृहस्थाने 'वाचन' नावाच्या पुस्तिकेत एक मजेशीर उल्लेख केला आहे की, हल्लीचे प्रोफेसर आणि शिक्षक हे टेक्स्ट बुकव्यतिरिक्त काही वाचत नाहीत. आता २०१७ सालीही या अवस्थेत बदल झालाय असेही काही दिसत नाही.

टाइमपास करण्यासाठी वाचणारे किंवा विशिष्ट विचारसरणीने भारावून निव्वळ त्याच विचारसरणीचे ग्रंथ वाचणाऱ्या वाचकांपेक्षा बरे-वाईट वाङ्मय कोणते हे बरोबर ओळखून वाचणारा वाचकवर्ग अधिक महत्त्वाचा आहे. अशा वाचकांची संख्या कमी असली तरी लेखक, प्रकाशक आणि वाचक यांना साधणारा हा महत्त्वाचा दुवा असतो.

मराठीत खूप वाचली जाणारी आणि खूप विकल्या जाणाऱ्या ग्रंथांची यादी केली तर या ग्रंथांचे अनेक लेखक कोल्हापूरचे आहेत याची नोंद घ्यावीच लागेल. वि. स. खांडेकर यांची 'ययाती', शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय', रणजित देसाई यांची 'स्वामी' या कादंबऱ्या खूप लोकप्रिय आहेत. बाबा कदम यांच्या कादंबऱ्या तर प्रचंड संख्येने खपतात. विश्वास पाटील यांच्या कादंबऱ्यांनाही खूप मागणी असते. या कादंबऱ्यांच्या दर्जाबाबत जरूर मतभिन्नता होऊ शकते; पण या लेखनाच्या प्रचंड लोकप्रियतेची कारणमीमांसाही झाली पाहिजे. वाचकांच्या मनावर इतकी वर्षे अधिराज्य गाजविणाऱ्या या लेखनात, वाचकांना आकृष्ट करणारे कोणते घटक आहेत हे विचारात घ्यायला हवे. कोल्हापूर परिसरात लेखकाची साहित्यिक जडणघडण आणि लेखनाला मिळालेली लोकप्रियता याचा काही संबंध आहे का, हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे, असे वाटते.

**-रफीक सूरज**

## कवितेत दिसत नाही गुरू-शिष्य परंपरा : काळे 'गझलसम्राट सुरेश भट आणि...'चे प्रकाशन

'संगीताप्रमाणेच कवितेतही गुरू-शिष्य परंपरा आहे; मात्र कवितेच्या क्षेत्रातील ही परंपरा सध्या दिसत नाही,' अशी खंत नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी व्यक्त केली. खऱ्या कवीची कविता कालोत्तीर्ण असते,' असेही ते म्हणाले.

'नंदिनी पब्लिकेशन हाऊस'तर्फे आयोजित कार्यक्रमात गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या 'गझलसम्राट सुरेश भट आणि...' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. काळे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी भटांच्या वेगवेगळ्या गझलांची पेरणी करत भाषण रंगवले. या वेळी साहित्यिक भारत सासणे, पत्रकार विजय कुवळेकर, पुष्पा भट, प्रकाशिका नंदिनी तांबोळी उपस्थित होत्या.

काळे म्हणाले, 'आपल्याकडे केशवसुत-गोविंदाग्रज किवा गोविंदाग्रज-आचार्य अत्रे अशा गुरू-शिष्यांच्या वेगवेगळ्या जोड्या होत्या. त्या आता दिसत नाहीत. 'सुरेश भट यांनी खऱ्या अर्थाने गझलेला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्याआधी मराठी गझल नव्हती असे नाही. माधव ज्युलियन लिहायचे; पण त्यांच्या गझलदृष्टीला भटांनी विरोध केला होता. भटांच्या गझलांत विश्वाचे दु:ख व्यक्त झाले आहे. वेदनेचा वेध घेणारा असा दुसरा कुठलाही कवी नाही. असा कवी पाहण्याचे भाग्य लाभले, याचा अभिमान आहे,' अशा भावनाही काळे यांनी व्यक्त केल्या. आनंद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

'बहिऱ्या समाजाला जागे करण्याचे काम भटांच्या गझलांनी केले. त्यांनी गझलेला एक परिमाण दिले, अर्थपूर्णता दिली,' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी केले.

## मराठी गौरव दिनाची जबाबदारी विद्यापीठांवर-कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी विविध कार्यक्रमांच्या आयोजनाचे आदेश

मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांनी मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी परिश्रम घेतले. त्यामुळे मातृभाषेचा गौरव म्हणून कुसुमाग्रजांचा जन्मदिन (२७

फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अकृषी, अभिमत, स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न सर्व महाविद्यालयांवर विविध उपक्रम राबविण्याची जबाबदारी सोपविली आहे.

मराठीचा उगम, विकास, समृद्धी, भवितव्य, भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन या संबंधाने विद्यापीठ किंवा महाविद्यालयांमधील शिक्षक-विद्यार्थ्यांनी लेख लिहायचे आहेत. हे सर्व लेख मराठी विकिपीडियावर उपलब्ध करावयाचे आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठांनी आपल्या आवाराच्या बाहेर या कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशी उच्च व तंत्रशिक्षण विभागाची अपेक्षा आहे. विद्यापीठाचे मुख्यालय असलेल्या शहरातील ऐतिहासिक ठिकाणी, सांस्कृतिक सभागृह, मोठा चौक किंवा मैदान अशी ठिकाणे अपेक्षित आहेत. मराठी भाषेचा प्रवास व विकास हे या कार्यक्रमांचे सूत्र असायला हवे. मातृभाषेची महती आणि माहिती, मातृभाषेचे व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील स्थान, मातृभाषेचे मानस व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा आहे

**चर्चासत्रे, परिसंवादाचे आयोजन**

सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोचवण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथोत्सव, ग्रंथदिंडी यांचाही उपक्रमात समावेश करावयाचा आहे. शाळा, महाविद्यालये, सरकारी व निमसरकारी कार्यालये, खासगी संस्थांमध्ये मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विषयक निबंध, वक्तृत्व अशा स्पर्धा घ्यावयाच्या आहेत. मराठी भाषा, साहित्य कोष आदी विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा घेत असतानाच तज्ज्ञ, विचारवंत, साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यास सांगितले आहे.

## साहित्य एकमेकांना जोडते : नहार
## ‘दुनिया’ कवितासंग्रहाचे प्रकाशन

‘साहित्य हे वाचकांना समाजाच्या जवळ आणणारे, एकमेकांना जोडणारे माध्यम आहे. त्यामुळे देशभक्ती, सामाजिक ऐक्य आणि माणसांचे

माणूसपण जपण्याची जबाबदारी लेखकांवरही तितकीच आहे,' असे मत 'सरहद'चे संस्थापक संजय नहार यांनी येथे व्यक्त केले.

स्वरगंधार संगीत, साहित्य प्रचार, पृथ्वीराज प्रकाशन यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात कवी म. भा. चव्हाण यांच्या 'दुनिया' या कवितासंग्रहाचे प्रकाशन नहार यांच्या हस्ते झाले. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, कवयित्री श्रद्धा राजेभोसले, 'अक्षरमानव'चे सचिव दीपक पारखी, अशोक भांबुरे, डॉ. सूरज चौगुले उपस्थित होते.

'कवीची ओळख त्याच्या कविताच करून देत असतात,' असे सांगून चव्हाण यांनी कविता सादर केल्या. विजय सातपुते यांनी सूत्रसंचालन केले.

'कुठल्याही चळवळीचा लेखनावर प्रभाव येऊ न देता म. भा. चव्हाण यांनी स्वत:ची लेखनशैली विकसित केली. विषमता, रूढी, परंपरांविषयी ते भाष्य करतात. 'दुनिया' या संग्रहानेही हेच सिद्ध केले आहे. लेखकांची समाजाकडे पाहण्याची दृष्टी निकोप, प्रामाणिक असावी,' असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

## दृष्टिहीनांनाही मिळणार वाचनानंद


दृष्टिहीन व्यक्तींना जिवंत वाचनानंद अनुभवता यावा, म्हणून अमेरिकेतील भारतीय वंशाचे नागरिक सुरेश बजाज यांनी 'हीयर टू रीड' हे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले असून, ते मोफत उपलब्ध आहे.

'हीयर टू रीड' हे ॲप दृश्य अक्षारांना ध्वनीत रूपांतरित करून देते. त्यामुळे दृश्य लिपी वाचू न शकणाऱ्यांना ती ऐकता येते. सध्या अँड्रॉइडवर हे ॲप उपलब्ध आहे. व्हॉट्सॲप, ट्विटर, फेसबुक आणि ई-मेलच्या जमान्यात दृष्टिहीनांना'टेक्स्ट टू स्पीच'च्या पर्यायांमध्ये हिंदी वा इंग्रजीतून प्रादेशिक भाषांतील मजकुराचे वाचन करता येते. हा पर्याय त्यांना वाचनाचा खरा आनंद देत नाही, हे लक्षात आल्यानंतर भारतातील दृष्टिहीनांना आपल्या भाषेत वाचनानंद कसा घेता येईल, यावर बजाज यांनी पाच वर्षे काम केले. त्यांच्या चिकाटीचे फळ म्हणजे 'हीयर टू रीड' हे ॲप. भारतातील दृष्टिहीनांना त्यांच्या बोलीचा लहेजा असलेले उच्चार या नव्या ॲपमुळे ऐकता येतील. दृष्टिहीनांबरोबरच ज्येष्ठांनाही हे ॲप वापरता येईल.

भारतीय भाषांची मजा त्यांच्या लहेजातच आहे. वाचनातील ही मजा

**नवं कोरं**

# अफलातून मेंदू




लेखक - **डॉ.अनिल गांधी**

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

माणसाचं हृदय कोमल की कठोर अशी चर्चा असते; पण दोन्हींचा संबंध पूर्णपणे मेंदूशीच असतो, हृदयाशी नाही. मेंदू जिवंत तोपर्यंत मनाचेही अस्तित्व असते. मन अथांग आहे. त्याच्या विचारांना, कल्पनाशक्तीला ना अंत ना पार अशी परिस्थिती असते. कोणाच्याही मनाचा थांग लागत नाही असा आजपर्यंतचा समजही शासकीय संशोधनाने फोल ठरविला आहे. आता मनुष्याच्या मेंदूत डोकावणे शक्य झाले आहे. मनाचा थांग लागला आहे इतकेच नव्हे तर दुसऱ्याच्या मेंदूतील विचार समजून घेऊन त्यात बदल करण्याचीही किमया साधली आहे. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने ब्रेन वॉशिंग शक्य झाले आहे.या पुस्तकात मेंदूची रचना, कार्य याखेरीज मनाचे विकार, मेंदूचे आजार याविषयी ऊहापोह केला आहे. तसेच ते टाळण्यासाठी किंवा लांबविण्यासाठी व्यायाम, आहार याविषयी माहिती दिली आहे.

मेंदू आणि मज्जारज्जुंचे अॅनन केफॅली, हायड्रोकेफॅलस, एन केफॅलोसील, मेनिंगोसील असे विकृती निर्माण करणारे किंवा अर्भकाचा अंत करणारे भयाण आजार अगदी साध्या उपायाने बहुतांशी टाळता येतात. मातृत्व स्विकारण्याचा निर्णय होताच त्या स्त्रीने फोलिक अॅसिडची एक गोळी रोज घेणे (वर्षाचा खर्च केवळ १०० रु.) हा तो साधा उपाय आहे. हे सांगणे हा या पुस्तकाचा प्रमुख हेतू आहे.

दृष्टिहीनांनाही घेता येईल. या ॲपमध्ये काही त्रुटी आहेत. त्या काही दिवसांत दूर करता येतील,' असे प्रतिपादन ॲपचे निर्माते सुरेश बजाज यांनी केले.

## पडद्यामागचे कलाकार हेच नाट्यसृष्टीचे आधारस्तंभ : भणगे

'पडद्यामागचे कलाकार हेच नाट्यसृष्टीचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामाची दखल घेतली गेली पाहिजे,' असे मत नाटककार श्रीनिवास भणगे यांनी व्यक्त केले.

गोपाळ हायस्कूल येथे अहमदनगर शहरवासीय मित्रमंडळाचा बारावा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पडद्यामागच्या कलाकारांचा सत्कार भणगे, श्रीराम रानडे, अविनाश देशमुख यांच्या हस्ते झाला. ज्येष्ठ नाट्य व्यवस्थापक मनोहर कुलकर्णी, रंगमंच सहायक विठ्ठल हुलावळे, रंगभूषाकार माधव थत्ते, नेपथ्यकार सदाशिव गाडेकर, वेशभूषाकार राजेश घोलप, ध्वनी व प्रकाश संयोजक सुरेंद्र गोखले, मामा शेलार, वाहन चालक रवी पाटील, विवेक जोशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे, श्रीराम चौधरी, सुधीर दार्वेकर, बापू पोतदार, डॉ. अ. ल. देशमुख आदी उपस्थित होते.

'नाटक ही सांघिक कला आहे. त्यामुळे पडद्यामागच्या कलावंतांनीही नाट्यसृष्टी जिवंत ठेवण्याचे काम तितकेच मनापासून केले आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊ नये,' अशी भावना पडद्यामागच्या कलावंतांनी सत्कारानंतर व्यक्त केली. स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन केले.

## मीच माझ्यात विसर्जित होऊन गातो : पं. हृदयनाथ मंगेशकर

'गाणे इतक्याच वेळेत संपले पाहिजे, हा विचार मनात बांधून अनेक गायक गातात. मी असे बांधन घेऊन कधी गायलो नाही. रंगमंचावर स्वत:ला सोडतो आणि मीच माझ्यात विसर्जित होऊन गात राहतो...' अशा शब्दांत ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर श्रोत्यांशी संवाद साधत होते.

'भावसरगम' या कार्यक्रमाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने पं. मंगेशकर यांचा 'शिरीष थिएटर्स'च्या वतीने आयोजित कार्यक्रमात जाहीर सत्कार करण्यात आला. या वेळी श्रोत्यांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट

करीत पं. मंगेशकर यांना मानवंदना दिली. ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर, आयोजक शिरीष रायरीकर उपस्थित होते. पं. मंगेशकर म्हणाले, 'मी मुक्तपणे गातो. लोक काय म्हणतील, याची पर्वा करत नाही. स्वत:ला बांधून न घेता गायलं की मैफल अधिक वर जाते आणि हेच त्या गायनाचे यश असते. मी गाताना स्वत:ला विसरून जातो. कसा दिसतोय, दाढी किती वाढली, माईक कुठं आहे... हे काहीही माहिती नसतं.'

राधा मंगेशकर आणि अरुण नूलकर यांनी सूत्रसंचालन केले.

'एखादा कार्यक्रम ५० वर्षे सतत करत राहणं हे अवघड काम आहे. त्यासाठी प्रचंड प्रवास केला. सुरुवातीला ट्रकमधून जावं लागायचं अन् गेलो. अशा अनेक कष्टांतून हा कार्यक्रम उभा राहिला आहे, अशा शब्दांत त्यांनी आठवणीही उलगडल्या. दरम्यान, 'हा खेळ सावल्यांचा', 'तू तेव्हा तशी', 'जय देव जय देव जय जय शिवराया', 'शूर आम्ही सरदार', 'म्यानातून उसळे तलवारीची पात', 'सागरा प्राण तळमळला...' अशी विविध गीते या वेळी नव्या पिढीतील गायकांनी सादर केली.

## साहित्यिकांनी नवमाध्यमे स्वीकारावीत : श्रीराम पवार

'सोशल मीडियावरील नव्या पिढीचे लेखन आपण कचरा समजत असलो, तरी जगाने ते स्वीकारले आहे; मात्र या माध्यमांचे वय फार कमी आहे. ती अपरिपक्व आहेत. त्यामुळे ते नाकारण्यापेक्षा त्यांना परिपक्व करण्यासाठी प्रगल्भ व अनुभवी साहित्यिकांनीच आता नवमाध्यमे स्वीकारण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन 'सकाळ' माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार यांनी केले. विदर्भ साहित्य संघाच्या ९४ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी मनोहर म्हैसाळकर होते. साहित्य संघाचे वाङ्मय पुरस्कारही प्रदान करण्यात आले. श्रीराम पवार म्हणाले, 'जागतिकीकरण माणसाचे जगणे कवेत घेईल, असे गेली तीन दशके आपण ऐकत आलोय; मात्र २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात नेमका उलटा प्रवास सुरू झाला. नवमाध्यमांमुळे 'अन्न, वस्त्र, निवारा आणि डाटा' ही माणसाची गरज होऊन बसली. छापील साहित्यातून व्यक्त होणाऱ्यांना चारशे वर्षांचा वारसा आहे; मात्र या नवमाध्यमांना असा कुठलाच वारसा नाही, तरी त्यांच्याच हातात

भविष्याची सूत्रे आहेत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोचायचे असेल, तर अनुभवी साहित्यिकांनाच या माध्यमांचा स्वीकार करावा लागेल,' असेही ते म्हणाले.

## ✍ भरभरून जगण्यासाठी वाचन हवेच ज्येष्ठ साहित्यिक शिवराज गोर्ले यांचे प्रतिपादन

'जीवनाचा वेग वाढला आहे. त्यामुळे वाचनासाठी जराही उसंत मिळत नाही, हे जरी खरं असलं, तरीही जगण्याचा खोलवर अनुभव घ्यायचा असेल, भरभरून जगायचं असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक शिवराज गोर्ले यांनी व्यक्त केले.

'साहित्यदर्शन'च्या ३२५व्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन गोर्ले यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, आयडीबीआय बँकेचे सहाय्यक महाप्रबंधक नरेश बिंदू, साहित्यदर्शनचे गणेश लोंढे आणि रवींद्र कासार उपस्थित होते.

गोर्ले म्हणाले, 'समृद्ध जगायचं असेल तर दारात झाडी आणि घरात पुस्तकं हवीत. ऑनलाइन पुस्तकांचीही मगणी वाढत आहे. मात्र, त्यामुळे छापील पुस्तकांचं स्थान कधीही कमी होणार नाही. वाचक पुस्तकांकडे येत नसतील, तर पुस्तकं वाचकांपर्यंत घेऊन जावी लागणार आहेत. त्यामुळेच 'साहित्यदर्शन'सारखी प्रदर्शनं महत्त्वाची आहेत.'

जोशी म्हणाले, 'वाचनसंस्कृतीचा, वाचकांच्या अभिरुचीचा पोत दिवसेंदिवस बदलत चालला आहे. त्यामुळेच ललित साहित्यापेक्षा माहितीपर साहित्याची मागणी वाढली आहे. त्या साहित्याकडे वळलेला वाचक ललित साहित्याकडे वळविणे, हे महत्त्वाचं आव्हान आहे.' साहित्य प्रकारानुसार प्रदर्शनात एक लाखांहून अधिक पुस्तकं मांडली होती.

## ✍ शिवरायांचे अप्रकाशित पत्र सापडले डॉ. केदार फाळके यांची माहिती; 'पाटीलकी' वतनाबाबतचा संदर्भ

छत्रपती शिवाजी महाराजांची कामकाजाची पद्धत, राजकीय आणि प्रशासकीय धोरण अधोरेखित करणारे खुद्द महाराजांचेच अप्रकाशित पत्र मिळाले आहे. शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके यांना धुळे येथील

समर्थ वाग्देवता मंदिरात हे पत्र मिळाले आहे.

डॉ. फाळके यांनी शिवछत्रपतींच्या कार्यावर पीएचडी मिळवली आहे. काही दिवसांपूर्वी ते अभ्यासासाठी धुळ्यामधील दफ्तरखान्यातील पत्रे चाळत होते. दरम्यान, त्यांना महाराजांची अस्सल मुद्रा उमटविलेले हे पत्र हाती लागले. महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी (१८ ऑगस्ट १६७३) 'सातारा' चे सुभेदार अबाजी मोरदेव यांना महाराजांनी हे पत्र पाठवले आहे.

या पत्रात पाटीलकी वतनासंबंधात कान्होजी खराडे आणि काळभर यांच्यातील वादावर दिलेला निवाडा आहे. हे पत्र १६७३ सालातील आहे. स्वराज्यात दाखल झालेल्या प्रदेशाची प्रशासकीय व्यवस्था लावण्यासंदर्भात महाराजांची दक्षता या पत्रातून दिसून येत असल्याचे डॉ. फाळके यांनी नमूद केले. ते म्हणाले, 'हे पत्र राज्याभिषेका पूर्वीचे असून, त्यावेळी 'पाटीलकी' वतनासंबंधात खराडे आणि काळभर यांच्यात वाद सुरू होता. ही बाब महाराजांच्या कानावर आली. त्यावर खराडे यांना समज द्यावी, तसेच त्यांची घोडी किंवा माणसे पालीमध्ये असतील, तर त्यांना बाहेर घालवावे आणि गावातल्या पिकांची लावणी, संचणीची कामे काळभरांकडून करून घ्यावीत, असा आदेश महाराजांनी दिला होता. या पत्रावर दोन ओळींनंतर महाराजांच्या प्रधानाचा शिक्का असून, पत्राच्या शेवटी महाराजांची मुद्रा आहे. शिवाय भारत इतिहास संशोधक मंडळात असणाऱ्या महाराजांच्या अस्सल कौलनाम्यातल्या हस्ताक्षरासारखे या पत्रातील हस्ताक्षर आहे.'

आजवर महाराजांची जवळपास २५०हून अधिक पत्रे मिळाली आहेत. या पत्रातले अक्षर, वाक्यरचना, भाषाशैली ही महाराजांच्या अन्य पत्रांसारखीच आहे. या पत्रावर आणखी संशोधन सुरू असून, डॉ. वि. आ. चितळे, शरद कुबेर, रमण चितळे हे सहकार्य करत आहेत, असे डॉ. फाळके यांनी सांगितले.

## विवेकानंदांवरील पुस्तकाचे प्रकाशन

फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात लेखक आर. के. लोंढेलिखित 'सर्वधर्मीय प्रतिपालक स्वामी विवेकानंद' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधत पुस्तक प्रकाशन

सोहळा घेण्यात आला. यावेळी नगरसेविका लता राजगुरू, हाजी नदाफ, प्रकाश भालेराव, राजाराम शेलार, लेखक व्ही. बी. सोनकांबळे, सोनाबाई तुपेरे, सुनील भोईटे, विठ्ठल गायकवाड उपस्थित होते.

लोंढे म्हणाले, 'विवेकानंद यांनी जगाला मानवतावाद शिकवला. सर्वधर्म परिषदेत विवेकानंदांनी सर्वधर्म समन्वयाच्या सामान्य अधिष्ठानाविषयी मार्गदर्शन केले. धर्माधर्मात संघर्ष करण्यापेक्षा एकमेकांना सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी मांडली. त्यांचा मानवतावादी विचारच जगाला विनाशापासून थांबवू शकेल.' प्रास्ताविक गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन जी. एस. कोलते यांनी केले.


## मराठी गझलचा अभ्यासक्रमात समावेश करू
## मॉरिशस येथील डॉ. बीदन अब्बा यांचे मत; गझलविषयक आंतरराष्ट्रीय परिषद

'उर्दू किंवा हिंदी गझल ऐकली होती; पण मराठी गझल प्रथमच पुण्यात ऐकायला मिळाली. आत मॉरिशसमध्येही अभ्यासक्रमात मराठी गझलचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करेन. यातून मराठी गझलकार तयार झाले, तर मराठी म्हणून या भाषेचे ऋण फेडण्याचा आनंद मला मिळेल,' अशी भावना मोका येथील महात्मा गांधी इन्स्टिट्यूटमधील मराठी अभ्यास विभागाचे प्रमुख डॉ. बीदन अब्बा यांनी व्यक्त केली. डॉ. अब्बा 'मराठी गझलेचा जागतिक संचार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी पुण्यात आले होते. ते म्हणाले, 'मॉरिशसमध्ये मराठी लोक आले; पण पुस्तके आली नाहीत. त्यामुळे ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, मनाचे श्लोक, शिवलीलामृत हे पाठ असलेले मराठी साहित्य त्यांनी मौखिक रूपाने पुढील पिढ्यांना दिले. याबरोबरच भजन, गोंधळ, नाटके आदी प्रकारांतून आम्ही मराठी भाषा पुढे घेऊन जात होतो.'

'मराठी गझल मात्र मॉरिशसमध्ये आली नव्हती. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून प्रेरणा घेऊन तेथील बीए आणि एमएच्या अभ्यासक्रमात मराठी गझलचा समावेश करण्याचा प्रस्ताव संस्थेपुढे ठेवणार आहे. यातून नवे गझलकार तिथे निर्माण होतील. तसेच तेथे गझलेवर परिषदा आणि गझलनृत्य आयोजित करण्याचा माझा प्रयत्न असेल. तेथील मराठी लोक

**नवं कोरं**

# रुपेरी सिंधू




लेखक - **अतुल कहाते**

**किंमत : १२५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

बॅडमिंटनमध्ये रिओ ऑलिम्पिक्स स्पर्धेत रौप्यपदक मिळवण्याचा अभूतपूर्व पराक्रम पी. व्ही. सिंधू या युवा भारतीय खेळाडूनं करून दाखवला.
अत्यंत साध्या परिस्थितीत वाढलेल्या सिंधूनं जिद्द, परिश्रम, अथक सराव आणि प्रशिक्षकाचा सल्ला प्रमाण मानून केलेले कष्ट या सगळ्या गोष्टींमुळे
सिंधू जागतिक पातळीवर इतक्या यशोशिखरावर जाऊन पोहोचली. इथून पुढेही ती प्रचंड यश मिळवू शकते, असा आशावाद तिनं जागवला आहे.
या सिंधूची ही प्रेरणादायी कहाणी.

गझल हा नवा प्रकार नक्कीच स्वीकारतील,' असा विश्वास डॉ. अब्बा यांनी व्यक्त केला.

प्राथमिक शाळांमध्ये मराठी आणण्यासाठी पुण्यातील बालभारतीच्या पुस्तकांचा आधार घेण्यात आला होता; परंतु नगर येथील मराठीचे शिक्षक कऱ्हाडकर यांना मॉरिशसला बोलविण्यात आले. तेथे तीन वर्षे वास्तव्य करून त्यांनी सोप्या भाषेत अभ्यासक्रम तयार करून दिला. तो 'अभिनव मराठी' या नावाने प्रचलित झाला आहे. उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास, अभंग आदी असल्याचेही डॉ. अब्बा यांनी सांगितले.

## ✍ दुर्मिळ पुस्तके पाहण्याची संधी

अक्षरधारा बुक गॅलरीमध्ये दुर्मिळ पुस्तके हाताळता येणार आहेत. या दालनामध्ये साहित्य अकादमी, गीताप्रेस गोरखपूर, नॅशनल बुक ट्रस्ट, रामकृष्ण मठ, विनोबा साहित्य, गांधी साहित्य, भारतीय विचार साधना, प्राज्ञ पाठशाला, महाराष्ट्र साहित्य परिषद अशा अनेक संस्थांच्या पुस्तकांचा समावेश असेल.

विनोबाजींचे साहित्य, गांधी साहित्य, तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता, समर्थ वाङ्मय, हिराबाई ठक्कर यांचे कर्माचा सिद्धांत, भारत सरकारच्या वतीने प्रकाशित होणारे ग. दि. माडगूळकर लिखित 'गीतरामायण', विनोबा लिखित 'गीताई', मराठी विश्वकोष, वाङ्मय कोष अशा अनेक पुस्तकांचा समावेश असेल.

## ✍ आम्हा दोघांमध्ये 'अभिमान' नाही
## रमेश देव-सीमा देव यांचा 'पिफ बझार'मध्ये संवाद

'आम्ही दोघंही त्या काळी आपापल्या कारकिर्दीच्या सर्वोच्च स्थानी होतो; पण आमच्यात कधीही 'अभिमान' चित्रपटासारखे परस्परांचा स्वाभिमान दुखावणारे प्रसंग घडले नाहीत. तशा शक्यता काही वेळा आल्याही; पण मी ते सावरलं. संसाराची घडी मी आणि रमेशने विस्कटू दिली नाही... खरं सांगायचं तर, सीमा माझ्यापेक्षा दसपट उत्तम कलाकार आहे.

मला हे नेहमीच ठाऊक होतं आणि मी तिच्या अभिनयासमोर सदोदित दबलेलाच असायचो...'

मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवलेल्या आणि 'ऑन-स्क्रीन'च नव्हे, तर 'ऑफ-स्क्रीन'ही सहजीवनात असलेल्या एका देखण्या 'कपल'चे, अर्थात सीमा देव-रमेश देव हे यांचे बोल!

अजूनही एव्हरग्रीन असणाऱ्या देव दाम्पत्याच्या अनेक आठवणींचा पट पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) रसिकांसमोर उलगडला. सीमा देव यांना यंदाच्या महोत्सवात जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याच्या निमित्ताने पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधला. त्या आधी या दाम्पत्याच्या हस्ते 'पिफ बझार'चं उद्घाटन झालं. जब्बार पटेल, श्रीरंग गोडबोले उपस्थित होते.

'आलिया भोगासी' या एकत्र केलेल्या पहिल्या सिनेमात बहीण-भावाची भूमिका केल्यानंतर सुरू झालेल्या सहप्रवासासोबतच सीमाजींनी आपला मराठी-हिंदी चित्रपटांतील प्रवासही उलगडला.

**...'ते' वाक्य आजही डोळ्यांत पाणी आणतं**

सीमा देव म्हणाल्या, 'राजेश खन्नासोबत काम करताना आमचं छान जमायचं. आम्ही दोघं गिरगावचे. 'आनंद' चित्रपटात जेव्हा मी त्याला म्हणते– 'मुझे आशीर्वाद दो'– त्या वेळी 'यह भी नहीं कह सकता के मेरी उम्र तुम्हे लग जाये'– हे राजेशने उच्चारलेलं वाक्य आजही डोळ्यांत पाणी आणतं...'

**अशी झाली पहिली भेट!**

मुंबईत रेल्वेच्या थर्ड क्लासच्या डब्यात आमची पहिली भेट झाली. ही चर्नी रोडवरून आणि मी ग्रँट रोडवरून लोकलच्या डब्यात चढलेलो. मला आठवतं, तो डबा मोगऱ्याच्या सुवासाने भरला होता. मी डब्यात शोध घेतला अन् मला दिसलं- रंगाने सावळीशी, थोडीशी नकटी अन् बोलक्या डोळ्यांची एक मुलगी खूप सारे गजरे माळून बसली होती. मी एवढा भारावलो, की थेट तिच्या पुढ्यातल्या बाकावर जाऊन बसलो... अशा मिश्कील शब्दांत रमेश देव यांनी सीमा यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीचा अनुभव सांगितला.

## ‘करुणोपनिषदे’तून बाबा आमटे यांचा उलगडला जीवनप्रवास

‘आनंदवनी... तळपता सूर्य’, ‘मी मागितली श्रीमंती...’, ‘थांबला ना सूर्य कधी, थांबली ना...’, ‘‘वैराण वाळवंटी मी सूर्य फुलविताना’ अशा रचनांनी ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांचा जीवनप्रवास ‘करुणोपनिषदे’ या कार्यक्रमातून उलगडला.

सृजन फाउंडेशनतर्फे आयोजित ‘सृजन महोत्सवा’त आमटे यांच्या जीवनावर आधारित ‘करुणोपनिषदे’ हा कवितांचा कार्यक्रम सादर झाला. याची संकल्पना चंद्रकांत काळे यांची होती. अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, गायिका अंजली मराठे, नरेंद्र भिडे आणि अमित त्रिभुवन यांनी कार्यक्रमाचे सादरीकरण केले. तर अपूर्व द्रविड आणि भिडे यांनी संगीतसाथ दिली. या कार्यक्रमात अभिनेते नाना पाटेकर हे प्रेक्षकांमध्ये उपस्थित होते.

‘तळपता सूर्य सारे चराचर दाहतो आहे’, ‘नसतात हो क्षितिजे उंच झेपावणाऱ्या पंखांना’ अशा रचनांमधून बाबांचे विश्व उत्तरोत्तर उलगडत गेले. काळे म्हणाले, ‘बाबांच्या कविता, मुलाखती अशा स्वरूपात माझ्याकडे साहित्य आले. त्याच्यावर जवळजवळ मी वर्षभर काम केले. त्यातून या कार्यक्रमाची संकल्पना पुढे आली. बाबांच्याच रचनांमधून त्यांचे कार्य आणि व्यक्तिमत्त्व उभे करणे आव्हानात्मक होते. त्यांच्या काही कविता दीर्घ होत्या; परंतु त्याचे संपादन करून त्या गायनातून कशा सादर होतील, यावर लक्ष केंद्रित केले.’

‘या कार्यक्रमानिमित्त पुन्हा एकदा बाबांची शब्दरूपी भेट घडली. बाबांचे कार्य काव्य आणि उताऱ्यातून उभे करताना आपण किती छोटे आहोत, याची जाणीव झाली. वसंत पोतदार यांच्या माध्यमातून आमटे कुटुंबीयांशी माझी भेट झाली. आज त्याला ४४ वर्षे लोटली. परंतु, त्या काळात बाबांनी कसे काम उभे केले असेल, हे पाहिल्यावर अंगावर काटा येतो,’ असे उद्गार नाना पाटेकर यांनी कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी काढले.फाउंडेशनचे अध्यक्ष प्रकाश पायगुडे यांनी आभार मानले.

## महिला अत्याचाराबाबतच्या जागृतीसाठी लघुपट महोत्सव

महिलांवरील अत्याचारांबाबत तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी रायझिंग इंडिया रिसर्च फाउंडेशनतर्फे रायझिंग इंडिया आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. हा महोत्सव मार्च

महिन्यात होईल. अशी माहिती सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी फाउंडेशनचे संस्थापक दीपक करंजीकर, गिरीश लाड उपस्थित होते. बाळ म्हणाल्या, 'कौटुंबिक हिंसा, बलात्कार, स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. महिलांविषयीचे प्रश्न गांभीर्याने हाताळले जावेत, त्याबद्दल उपाययोजना केल्या जाव्यात, तरुणाईमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. याद्वारे विविध प्रश्नांवर एक डिजिटल ग्रंथालय निर्माण केले जाईल.'

## 'माध्यमांतर' या विषयावरील चर्चासत्र रंगले

दूरचित्रवाणी हे सध्याच्या काळात जणू उद्योगधंद्याचेच माध्यम बनले आहे. आजचा प्रेक्षक हा दांभिक मालिकांच्या आहारी गेला आहे. अशा परिस्थितीत जर चांगल्या कलाकृती निर्माण होत नसतील, तर तो दोष स्वत: प्रेक्षकांचाच ठरतो. हे चित्र बदलायचे असल्यास प्रेक्षकांनी चांगले चित्रपट पाहणे, उत्तम पुस्तके वाचणे आणि त्यावर आधारित कालाकृतींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असा सूर मान्यवरांनी लावला.

१५व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आयोजित 'माध्यमांतर' विषयावरील चर्चासत्रादरम्यान दिग्दर्शक महेश मांजरेकर, चंद्रकांत कुलकर्णी, रवी जाधव, संजय कृष्णाजी पाटील आदींनी ही मते मांडली. गाजलेल्या साहित्यावर अथवा नाटकावर आधारित चित्रपट करताना त्याचा आशय ध्यानात घेणे गरजेचे आहे. कलाकृती ज्या माध्यमात सादर करावयाची आहे, त्याची बलस्थाने-मर्यादा लक्षात घेऊन माध्यमांतर करावे, असेही ते म्हणाले.

कुलकर्णी म्हणाले, 'प्रत्येक माध्यमाची बलस्थाने-मर्यादा ओळखून, त्यातील आशय लक्षात घेऊन माध्यमांतर झाल्यास त्या कलाकृतीला योग्य न्याय मिळू शकतो. माध्यमांतर करताना दोन्ही माध्यमांतील नियमांचा अभ्यास हवा. एखाद्या घटनेतून, कादंबरीतून, नाटकातून, लघुकथेतूनही कलाकृतीच्या निर्मितीची बीजे मिळू शकतात.'

मांजरेकर म्हणाले, 'नाटक ते सिनेमा ही माध्यमांतराची प्रक्रिया अवघड असते. आज साहित्यकृती चांगल्या दर्जाच्या होत नाहीत, म्हणून माध्यमांतराची गरज आहे, असे मानणे चुकीचे आहे. विषय संपलेले नाहीत. त्या विषयापलीकडे, स्टेजपलीकडे जाऊन चित्रपटांची निर्मिती करणे गरजेचे

आहे.’

**अग्रलेख आणि भाषणांवरसुद्धा होईल चित्रपट!**

कुलकर्णी म्हणाले, ‘घेतले एखादे नाटक आणि केला त्यावर चित्रपट असे होत नसते! त्यासाठी त्या-त्या माध्यमाची भाषा अन् समज असावी लागते. केवळ रूढसाहित्यच नव्हे, तर अग्रलेख आणि भाषणांवरसुद्धा एखादा उत्तम चित्रपट होऊ शकतो. विषय आणि आशय महत्त्वाचा. प्रत्येक कलाकृतीचे माध्यमांतर होऊ शकते, असा समज चुकीचा आहे. प्रत्येक माध्यमाचा पोत वेगवेगळा असणार हे जाणून घेतले पाहिजे.’

## अस्मितादर्श साहित्य संमेलनाचा समारोप

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जंयतीनिमित्त राज्य सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी सुरू करण्याचा संकल्प केला आहे. हा संकल्प स्तुत्य आहे. आता ही अकादमी सुरू करावी, अशी सूचना ३४व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनाच्या समारोपातील अधिवेशनात ठरावाद्वारे करण्यात आली. यासह दहा ठराव मंजूर करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या राज्य सरकारने इंग्रजी भाषेत प्रकाशित केलेल्या समग्र खंडांचा अनुवाद मराठी, हिंदी आणि भारतातील सर्व प्रादेशिक भाषेत करावा, डॉ. आंबेडकर यांच्या लेखनाचे खंडात्मक पुनर्मुद्रण करून ते वाचकांना उपलब्ध करून द्यावे. राज्य सरकारने पाली भाषा व वाङ्मय विद्यापीठाची स्थापना अंबेजोगाई (जि. बीड) येथे करावी, डॉ. आंबेडकर यांनी भेटी दिलेल्या ठिकाणी त्यांचे स्मारक उभे करून त्या ठिकाणांना पर्यटन क्षेत्राचा दर्जा देऊन यांच्या नावाने लातूर येथे महानगरपालिकेने प्रशस्त सांस्कृतिक सभागृह आणि सुसज्ज ग्रंथालय स्थापन करावे, अशा मागण्या ठरावातून करण्यात आल्या.


## कवितांची मनमुक्त संध्याकाळ

‘सृष्टीमध्ये दोनच जीव
बाकी कुणी नसेल
सगळीकडे बस तेवढं
आपलं माणूस दिसेल...’

**नवं कोरं**

मनुष्यस्वभावाचे पैलू उलगडणारी कथा

# सार्थ




मूळ लेखक - **एस्. एल्. भैरप्पा**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

यशोधरा. मोठ्या शहरात राहणारी तापट डोक्याची मुलगी. गावाकडच्या विजय नावाच्या मुलाशी तिची लग्नगाठ बांधली जाते आणि संकटच उद्‌भवतं. वैवाहिक जीवनात जुळवून घेण्याची तारेवरची कसरत सुरू होते. त्यातून कधी हलक्या-फुलक्या रंगतदार क्षणांचा अनुभव येतो; तर कधी तंट्याच्या विकोपाचा. अशात बाळाच्या अनपेक्षित आगमनामुळे दोघांतला झगडा वाढतो. बाळाला कसं वाढवायचं, यासंबंधीच्या दोघांच्या मतभेदांमुळं त्यात तेल ओतलं जातं.

त्यांचं एखाद्या तरी मुद्द्यावर एकमत होईल का? की ती एक आवाक्याबाहेरची गोष्ट ठरेल? असं वाटत राहातं.

लग्न आणि पालकत्व याविषयीचा ताजा आणि प्रामाणिक विचार असलेली, स्वत्वाचा शोध घेणारी ही कथा आहे. ती तुम्हाला खळखळून हसवेल आणि त्यातल्या विनोदी आणि हव्याहव्याशा वाटणाऱ्या व्यक्तिरेखांबद्दल तुम्हाला मनापासून सहानुभूती वाटेल.

या शब्दांत कवी वैभव जोशी प्रेमाबद्दलच्या कवितेतून तिची आणि त्याची ओढव्यक्त करीत होते. संदीप खरे प्रेमाचा वेगळाच पैलू मांडताना म्हणत होते, 'तसे काही चेहऱ्यावर, अधिक-उणे नसते, पण मनात दु:खी असणाऱ्याचे, हसणे वेगळेच असते...' या दोन कवींच्या कविता मनसोक्त ऐकण्याची संधी सृजन फाउंडेशन आणि नांदेड सिटीतर्फे आयोजित तीन दिवसीय सृजन महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अनुभवता आली.

आरंभी जोशींनी गुलजारांची 'किताबे' ही हिंदीतील, तर खरेंनी मंगेश पाडगावकरांची 'राघोबा रघुनाथ' ही कविता सादर केली. नंतर जोशींनी 'पडद्यावर राष्ट्रगीत दिसते आणि उभे असतो आम्ही' अशी समाजाला आत्मपरीक्षण करायला लावणारी, 'म्हणजे काय कोण जाणे तरीपण, तरीपण बरंच बोलत असतो आम्ही दिवसापण, रात्रीपण' ही संवादातला फोलपणा मांडणारी आणि 'दिवस उठतो, धावत सुटतो, धावत सुटतो फक्त, दिवस आपला वाटत असतो, वाटत असतो फक्त' ही आयुष्यातील संभ्रमावस्था व्यक्त करणारी अशा स्वत:च्या अनेक कविता सादर केल्या.

खरेंनीही त्यांच्या कवितांचा खजिना खुला करीत निसर्ग, प्रेम, नातेसंबंध, विवेकबुद्धी आदी विविध विषयांवरच्या कविता म्हटल्या. 'दोघांच्याही हातांवर एकमेकांच्या रेषा आहेत, दोघांच्याही ओठांवर एकमेकांची भाषा आहे,' 'अफाट होती तुझी स्मरणशक्ती, मलाच कसे काय विसरलीस?' 'वाल्याचा वाल्मीकी होऊ शकतो एकदाच, पण त्याची कारणे वेगळीही असू शकतात' अशा लक्षवेधी कवितांसह खरेंनी चालीवरही दोन कविता पेश केल्या. मंगेश कुलकर्णींनी बहारदार निवेदन केलं. नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी खरे आणि जोशींनी उपस्थितांना पाचारण केलं. त्यानुसार वलय मुळगुंद आणि पंकज हरोलीकर यांनी कविता सादर केल्या. बाह्यदृष्टी नसली तरी सुरांच्या माध्यमातून जगाकडे पाहणाऱ्या नाशिकच्या निनाद शुक्ल या गायकाने 'दिसलीस तू, फुलले ऋतू' व 'हे सुरांनो चंद्र व्हा' ही गीतं सादर केली. प्रकाश पायगुडे यांनी प्रास्ताविक केलं.

## ऋत्विक घटक यांचे अपूर्ण चित्रपट मिळाले

ज्येष्ठ दिग्दर्शक ऋत्विक घटक यांचे तीन अपूर्ण चित्रपट राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला (एनएफएआय) मिळाले आहेत. हे तीनही चित्रपट

बंगाली भाषेत असून, ते १९५९ ते १९६८ दरम्यान बनवले गेले होते.

'एनएफएआय'चे संचालक प्रकाश मगदूम यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. घटक यांच्या 'कातो अजानारे' (१९५९) या चित्रपटाची आठ रिळे, 'बंगार बंग दर्शन' (१९६३) या चित्रपटाची चार रिळे आणि 'रंगेर गुलाम' (१९६८) या चित्रपटाची तीन रिळे मिळाली आहेत. पश्चिम बंगालचा माहिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे 'एनएफएआय' ला या 'फुटेज'चा खजिना सापडला. 'ऋत्विक घटक मोमोरिअल ट्रस्ट'नेही त्यासाठी मदत केली. 'घटक यांचे जवळपास सर्व चित्रपट एनएफएआयकडे असून, या अपूर्ण चित्रपटांमुळे तो संग्रह आणखी समृद्ध झाला,' असे मगदूम यांनी सांगितले.

## समाजसुधारक सावित्रीबाई फुलेंवर जन्मदिनानिमित्त गुगल डुडल

गुगलचे ताजे डुडल हे समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या १८६व्या जन्मदिनानिमित्त साकारले आहे. त्यात त्यांनी हाती घेतलेल्या समाजकार्याचे सूचक चित्रण आहे. परिस्थितीशी जुळवून घेत त्यांनी समाजसुधारणेचे काम केले होते. या डुडलवर क्लिक केल्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील काही प्रसंगांची चित्रेही दिसतात. मस्कत-मुंबई येथील कलाकार व ग्राफिक डिझायनर मालविका आशर यांनी हे डुडल तयार केले आहे. सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती जोतिराव फुले यांच्याबरोबर महिलांच्या हक्कासाठी ब्रिटिश राजवटीत लढा दिला होता. मराठी कवितेतही सावित्रीबाईंचे योगदान असून, मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी मोठे काम केले होते. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. जोतिराव फुले व त्यांनी १८४८मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यात नऊ विद्यार्थिनी होत्या. अस्पृश्य व मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्याबाबत या दाम्पत्याचा ब्रिटिश सरकारच्या बॉम्बे प्रसिडेन्सीने १८५०मध्ये सत्कार केला होता. सावित्रीबाई या भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या होत्या व त्यांनी परित्यक्ता महिलांसाठी १८६४मध्ये निवाऱ्याची व्यवस्था केली होती. समाजातील समतेसाठी त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून काम केले. त्यांनी समाजात स्त्रियांना मिळणाऱ्या वागणुकीवर कविता केल्या होत्या व १९३४ मध्ये त्यांचे 'काव्यफुले' हे पुस्तक प्रसिद्ध

झाले. त्यानंतर १९८२मध्ये त्यांचे 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे पुस्तक मरणोत्तर प्रसिद्ध झाले.

## गानसम्राज्ञीच्या स्वरात 'रामरक्षा'

गेली दोन वर्षे प्रकृतीच्या कारणास्तव रेकॉर्डिंगपासून दूर असलेल्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी पुन्हा एकदा रेकॉर्डिंग रूममध्ये पाऊल टाकले ते रामरक्षा रेकॉर्ड करण्यासाठी. बऱ्याच काळापासून मनात असलेली त्यांची ही इच्छा प्रकृतीने साथ दिल्यामुळे पूर्ण होऊ घातली आहे.

'रामरक्षा स्तोत्र रेकॉर्ड करण्याचे बराच काळ मनात होते. तो योग आता जुळून येत आहे. भक्तिगीते गाण्याने मिळणारे समाधान अपूर्व आहे. रामभक्ती वर्णन करणारे 'राम रतन धन पायो' आणि पं. भीमसेन जोशी यांच्यासह रेकॉर्ड केलेले 'राम श्याम गुण गान' हे दोन प्रयोग श्रोत्यांना भावले होते. माझ्या मनालाही ते आत्यंतिक समाधान देणारे होते,' अशी लतादीदींची भावना आहे. संगीतकार मयुरेश पै यांच्यासोबत त्या रामरक्षा रेकॉर्ड करत आहेत. वयाच्या ८७व्या वर्षीही रेकॉर्डिंग करतानाची सगळी पथ्ये त्या नियमित पाळत असल्याचे मयुरेश पै यांनी सांगितले. श्लोक, भजन, भक्तिसंगीत ही त्यांची आवडती शैली असून, त्यांचा आनंद पुन्हा घेता येणार असल्याबद्दल त्या आनंदी असल्याचेही पै यांनी सांगितले.

पं. दीनानाथ मंगेशकर यांच्या निधनानंतर लता मंगेशकर यांनी पहिले गाणे १९४२ मध्ये रेकॉर्ड केले होते. त्याआधी त्यांनी कार्यक्रमांतून अनेक गाणी सादर केली होती. त्यांनी करिअर म्हणून प्रत्यक्ष रेकॉर्डिंगला सुरुवात केली त्याचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. गेल्या दोन वर्षांच्या काळात प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी रेकॉर्डिंग केले नव्हते. या ब्रेकनंतर पुन्हा रेकॉर्डिंग करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे अमृतमहोत्सवी वर्षातील हा अल्बम अधिक खास आहे. हा अल्बम करण्याची कल्पना लता मंगेशकर यांचीच होती. गेल्या दहा वर्षांत मयुरेश पै यांच्याबरोबर त्यांनी अनेक अल्बम केले आहेत. संध्याकाळी रामरक्षा म्हणण्याची प्रथा आता हरवत चालल्याने आपल्याजवळील सांस्कृतिक संचित पुढच्या पिढ्यांना द्यावे, या विचारातून त्यांनी या अल्बमचे काम सुरू केले आहे.

रामरक्षेच्या या अल्बममधील दोन श्लोक आतापर्यंत रेकॉर्ड झाले

नवं कोरं

# द मॅड तिबेटियन

गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!

मूळ लेखक - **दिप्ती नवल**

अनुवाद - **सुनंदा अमरापूरकर**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**




जीवनाकडे जणू भिंगातून पाहताना उमलून आलेल्या आहेत,
'गोष्टी तेव्हाच्या नि आत्ताच्या – द मॅड तिबेटियन'
एखादा चित्रपट डोळ्यांसमोर उलगडत जावा, तशी प्रत्येक गोष्ट
नजरेसमोर साकार होते आणि मनावर भावनांचा उत्कट ठसा
उमटवते. 'थुल्ली' कथा वाचताना वाचक आपोआप मुंबईच्या
कामाठीपुऱ्यात पोचतो आणि तिथल्या वेश्यांचं अंधकारमय,
दुर्दैवी आयुष्य प्रत्यक्ष पाहिल्यासारखा सुन्न होतो.
तर 'पियानो ट्युनर' फिरोझ बाटलीबॉयने एके काळी वाजवलेल्या
सुंदर स्वरलहरींबरोबर वाचकाच्या काळजापर्यंत अलगद पोचतो.
एकाकीपणानं ग्रासलेलं रूथ मेबेरीचं जगणं मरेपर्यंत
उमेद न गमावता प्रयत्न करीत राहण्याचा संदेश देऊन प्रेरित करतं.
'द...द... दामन', 'नवी सकाळ', 'मुंबई सेंट्रल', 'न्योनबा',
'अघटिताची चाहूल', 'दोघी बहिणी', 'पाखरं' सगळ्या कथा
प्रत्यक्ष जगण्याचीच अनुभूती देतात. प्रत्येक जिवंत कथा
जणू निनादत्या स्वरात जीवनातली आशा, प्रेम आणि उद्याचा
आनंद
यांच्या लकेरी घेत वाचकाला वेढून टाकते.

आहेत. ३८ श्लोकांच्या या अल्बमचे रेकॉर्डिंग फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होऊ शकते. त्यानंतर २४ एप्रिलला पं. दीनानाथ मंगेशकर यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने हा अल्बम सादर होण्याची शक्यता आहे.

## तरुणांची वाचन चळवळ
### रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशनतर्फे 'रिझो लायब्ररी' सुरू

पुस्तकांपासून वंचित राहणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, नागरिकांना अवांतर वाचनासाठी चांगली पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशनतर्फे 'रिझो लायब्ररी' ही पुस्तक चळवळ सुरू करण्यात आली आहे. यासाठी संस्थेचे कार्यकर्ते वेगवेगळ्या सोसायट्यांतील नागरिकांशी संवाद साधून पुस्तके गोळा करीत आहेत. जमा होणारी पुस्तके फिरत्या ग्रंथालयाच्या स्वरूपात राज्यातील विविध खेड्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

पुण्यातील आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या वैभव मोगरेकर आणि गौतमी बिडकर यांनी तीन वर्षांपूर्वी रोस्ट्रम इंडिया सोशल ऑर्गनायझेशनची (रिझो) स्थापना केली. समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून, प्राथमिक सुविधांपासून वंचित असलेल्या घटकांसाठी काही तरी केले पाहिजे, असा उद्देश ठेवून ही संस्था सुरू करण्यात आली. वैभव आणि गौतमीच्या या मोहिमेमध्ये भागवत, कुलकर्णींसह वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करणारी हौशी मंडळीही आता सहभागी झाली आहेत. संस्थेतर्फे गेल्या दोन वर्षांपासून कात्रज-कोंढवा रोडवरील स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी छोटी शाळा चालविण्यात येते. यामध्ये ४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.' या मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. शाळेमध्ये आता पूर्ण वेळ शिक्षकांची नियुक्ती केली असून, संस्थेचे कार्यकर्ते स्वत:च्या पगारातून पैसे बाजूला काढून शाळेचा सगळा खर्च उचलतात. शाळेची घडी बसल्यामुळे आम्ही ग्रंथालयाची मोहीम हाती घेतली आहे. पुण्यालगतच्या छोट्या गावांमधील मुलांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी पुस्तकांचा संग्रह करत आहोत. आमच्या ग्रंथालयांमध्ये आध्यात्मिक, विनोदी, कथासंग्रह, कवितासंग्रह, ग्रंथ, कादंबरी अशा सगळ्या प्रकारच्या पुस्तकांचा समावेश असेल,' असे वैभव मोगरेकर यांनी सांगितले.

ते म्हणाले, ‘सध्या एक ग्रंथालय सुरू होईल, एवढी पुस्तके जमा झाली आहेत. पुणे जिल्ह्यातील साधारण ५० लहान गावांमध्ये आम्ही छोटी ग्रंथालये सुरू करणार आहोत. ही ग्रंथालये आम्ही सर्वांसाठी मोफत उपलब्ध ठेवणार आहोत. अधिकाधिक वाचकांनी पुस्तके वाचावीत, यासाठी आमचा प्रयत्न राहील.’ संस्थेच्या पुस्तक चळवळीत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी https://www.rostrumindia.org/ या वेबसाइटवर अथवा ८६०००४००३९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## ‘ऑल इज वेल’ने मारली बाजी

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या चित्रपट महोत्सवामध्ये मुंबईतील आनंद कुलकर्णींच्या ‘ऑल इज वेल’ या लघुपटाने बाजी मारत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. अमेरिकेच्या जॅक्स आणि स्टिव्ह फिशरच्या ‘सायलेंट रिव्हर’ या चित्रपटाने द्वितीय, तर गाझियाबादच्या अमित गोस्वामीच्या ‘क्रोलिकल्स ऑफ अ वाइल्ड लाइफ’ व दिल्लीच्या आसिफ खानच्या ‘द अँग्री रिव्हर’ ने विभागून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

नदी आणि पर्यावरण असा या स्पर्धेचा विषय होता. विजेत्यांचे लघुपट किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवात दाखवण्यात आले. प्रसिद्ध दिग्दर्शक माइक पांडे आणि उषा देशपांडे यांनी या लघुपटांची निवड केली असल्याची माहिती, महोत्सवाचे संयोजक विरेंद्र चित्राव यांनी पत्रकार परिषदेत दिली. आरती किर्लोस्कर, सुप्रिया गोटुरकर, जुई तावडे, संदीप देसाई, नयनीश देशपांडे आदी या वेळी उपस्थित होते.

लघुपट स्पर्धेत देश-विदेशांतील एकूण ४५०हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यांच्यातून तीन सर्वोत्तम लघुपटांची निवड करण्यात आली. याशिवाय पुण्याच्या अमोल कचरे आणि साताऱ्याच्या संयोग मोहिते यांच्या लघुपटांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. महोत्सवाअंतर्गत छायाचित्र स्पर्धा देखील घेण्यात आली होती. त्यामध्ये नऊ हजारांहून अधिक छायाचित्रांचा सहभाग होता. त्यात चंद्रपूरच्या अमोल बायस याने प्रथम, पुण्याच्या इंद्रनिल बासू यांनी द्वितीय, तर सांगलीच्या सार्थक पाटील याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

## समाजाचे विघटन होता कामा नये : जयसिंगराव पवार
## जवळकर पुरस्काराने गौरव

'इतिहासाचा चुकीचा अर्थ न काढता तो बारकाईने समजून घ्यायला हवा. ब्राह्मण्याविरुद्ध जरूर भांडा. मात्र, स्वत:मधील ब्राह्मण्यही शोधा. दगड, पुतळे बोलतात का? मात्र, तो संबंधित व्यक्तीच्या कार्याचा प्रतीकात्मक गौरव असतो. इतिहास योग्य पद्धतीने समजून घेण्याची नितांत गरज आहे. कोणत्याही परिस्थितीत समाजाचे विघटन होता कामा नये,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केले.

समता प्रतिष्ठानतर्फे पवार यांना सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, तर ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या प्रसंगी वसुधा पवार, मधुकर निरफराके, विशाखा खैरे, ॲड. संपत कांबळे हेही उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'सावित्रीबाई फुलेंनी शिक्षणाची ज्योत लावली. त्यांचा फोटो सर्वत्र, किमान मुलींच्या शाळेत तरी असावा. पण, आज तशी परिस्थिती दिसत नाही. विद्येची देवता असलेल्या सरस्वतीची प्रतिमा हवी; मात्र त्याचबरोबर सावित्रीबाईंच्या कार्याचा विसर पडता कामा नये. कोणत्याही परिस्थतीत समाजाचे विघटन होता कामा नये, हा बोध आणि प्रेरणा इतिहासाच्या अभ्यासातून घेता येईल. सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळ ही प्रतिक्रिया होती, याचे महत्त्व समजून घ्यायला हवे,' असेही ते म्हणाले.

## कवी, लेखकांनी मत्सर बाळगू नये : कोत्तापल्ले
## गझलवरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

'उर्दू गझलांच्या मुशायऱ्यांमध्ये वातावरण उत्फुल्ल असते. त्या गझलांना दाद मिळते. मराठी श्रोता मात्र ढिम्म असतो. हसू की नको. दाद देऊ की नको, असा विचार तो करत असतो. हे चित्र बदलायला हवे. या बरोबरच कवी, लेखकांनी एकमेकांबद्दल मत्सर बाळगू नये,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजित 'मराठी गझलेचा जागतिक संचार' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप झाला, त्या वेळी डॉ. कोत्तापल्ले बोलत होते. मराठी विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश सांगोलकर उपस्थित होते.

विद्यापीठातील मराठी विभागाच्या ७० वर्षांच्या इतिहासात गझलांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक एकत्र येण्याची पहिलीच घटना आहे, असे सांगत डॉ. कोत्तापल्ले म्हणाले. 'चांगले गाणे लिहिण्याचे सामर्थ्य फार कमी लोकांकडे असते. त्या गाण्यांना आपण फार महत्त्व देत नाही. गझलेचेही तसेच झाले आहे. तिच्यातील सामर्थ्यदेखील कमी लोकांनी ओळखले आहे.'

डॉ. सांगोलेकर म्हणाले, 'मराठी गझल प्रांतात बरेच गटतट झाले आहेत. ते असावेत; पण गटबाजी नको. तेच या चर्चासत्राच्या माध्यमातून संपविण्याचा प्रयत्न केला आहे.'

**पैसे का मिळत नाहीत, विचार करा!**

चर्चासत्राच्या समारोपावेळी मुंबईतील गझलरसिक महिलेने गझलेच्या प्रसारासाठी पाच हजार रुपायांचा मदतनिधी दिला. त्यावर, 'एकीकडे मागूनही पैसे मिळत नाही, इथे मात्र लोक आणून देतात,' अशी टिप्पणी एका वक्त्याने केली. डॉ. कोत्तापल्ले यांनी त्याचा संदर्भ भाषणात दिला; परंतु साहित्य संमेलनाच्या निधीमधील वाढीच्या मागणीचा उल्लेख टाळत ते म्हणाले, 'लोकांकडे पैसे मागूनही मिळत नसतील, तर ते का मिळत नाहीत, याचा विचारही आपण केला पाहिजे.'

❖

# पुरस्कार



**✻ मारुती चितमपल्ली, यास्मिन शेख यांना पुरस्कार**

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. श्री. पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार 'भारतीय विचार साधना प्रकाशन'या संस्थेस जाहीर झाला आहे. विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ साहित्यिक मारुती चितमपल्ली यांची निवड करण्यात आली आहे. मंगेश पाडगावकर भाषा संवर्धक पुरस्कार श्याम जोशी यांना, तर डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ यास्मिन शेख यांना जाहीर झाला आहे.

मराठी भाषा विभागाचे मंत्री विनोद तावडे यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. व्यावसायिक नफा-तोटा न पाहता राष्ट्रभक्ती, राष्ट्रपुरुष, सामाजिक सेवा असे विषय पुस्तकांच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम भारतीय विचार साधना प्रकाशनाने केले आहे. पर्यावरण व वन्यजीवन याविषयीचे लेखन आणि कोशनिर्मिती करणारे मारुती चितमपल्ली, बदलापूर येथील 'ग्रंथसखा' वाचनालयाचे श्याम जोशी व मराठी व्याकरण, त्याचे नियम, म्हणी, वाक्प्रचार याविषयी पुस्तके लिहिणाऱ्या यास्मिन शेख यांना अन्य पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कार निवड समितीमधील सदस्य डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, बाबा भांड, डॉ. सदानंद मोरे, श्याम घोणसे आणि तावडे यांच्या झालेल्या बैठकीत या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. मराठी भाषा दिनाच्या दिवशी (२७ फेब्रुवारी) हे चारही पुरस्कार विशेष सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहेत.

**✻ पुणेकरांच्या 'डीएनए'मध्येच संगीत : झाकीर हुसेन; एस. डी. बर्मन क्रिएटिव्ह ॲवॉर्ड प्रदान; अपर्णा सेन, सीमा देव यांना जीवनगौरव पुरस्कार**

'संगीत आणि पुणं यांचं एक अतूट नातं आहे. संगीताविषयी इथले कानसेन जागृत असल्याने कलाकाराला कुठं आणि कशी दाद द्यायची, हे त्यांना अचूक कळते. पुणेकरांच्या 'डीएनए'मध्येच संगीत आहे. पुणं हे माझं दुसरं घरच आहे,' अशा शब्दांत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांनी दर्दी पुणेकरांवर स्तुतिसुमने उधळत पुण्याच्या आठवणींना उजाळा दिला.

पुणे फिल्म फाउंडेशन आणि राज्य शासन यांच्या वतीने आयोजित पंधरावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सिटी प्राईड, कोथरूड येथे रंगला. या उद्‌घाटन सोहळ्यात ज्येष्ठ दिग्दर्शिका व अभिनेत्री अपर्णा सेन आणि जेष्ठ अभिनेत्री सीमा देव यांना 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तर संगीत क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीबद्दल उस्ताद झाकीर हुसेन यांना 'एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय क्रिएटिव्ह ॲवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते.

पुण्याविषयी बोलताना झाकीर हुसेन म्हणाले, 'वयाच्या सातव्या वर्षी सवाई गंधर्व संगीत महोत्सवात तबलावादन करण्याची संधी मिळाली. संगीत, त्याची साधना म्हणजे काय, या गोष्टी पुण्यात आल्यानंतर कळतात. बालगंधर्व, कुमार गंधर्व, अप्पा जळगावकर यांना मी साथसंगत केली आहे. संगीत हे पुणेकरांच्या रक्तामध्ये आहे. नाट्यसंगीताचे वातावरण पुण्यात असल्याने शास्त्रीय संगीतालाही पुणेकरांनी आपलेसे केले. उर्दू गझलचे मुशायरेही इथे ऐकले जातात. भाषा भलेही कळत नसली तरी त्यामध्येही ते समरसून जातात. 'एस. डी. बर्मन यांच्या 'डॉ. विद्या' या चित्रपटात मी वादन केले आहे. ते म्हणजे संगीतातील देव आहेत. त्यांच्या नावाच्या पुरस्काराला मी खरंच पात्र आहे का नाही, हे मला माहीत नाही,' असे सांगून आपल्या मोठेपणाचे दर्शनही त्यांनी घडविले. तसेच 'आजचे संगीत हे चांगले आहे. ए. आर. रेहमान, शंकर– एहसान– लॉय यांच्यासारखे लोक चांगले काम करत आहेत. संगीत हे दिग्दर्शक, निर्मात्यांच्या आवडीनुसार द्यावे लागते. माझ्यासाठी वेळ देणारे दिग्दर्शक, निर्माते हवे आहेत,' अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली. उद्‌घाटन सोहळ्याला प्रो. जेर्झी स्टर (पोलंड), पास्कलजेव्हिक (सर्बिया), जॉर्ज अरियागाडा (चिली), जेन्स फिशर (स्वीडन), गौरी रामनारायण (भारत), बेनेट रतायके (श्रीलंका) आणि नर्गिस

अबायर (इराण) उपस्थित होते. पिफचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांनी प्रास्ताविक केले. श्रीरंग गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले तर पिफचे सचिव डॉ. रवी गुप्ता यांनी आभार मानले.

### * विजया राजाध्यक्षांना 'जनस्थान' पुरस्कार

ज्येष्ठ लेखिका व समीक्षक-कथाकार विजया मंगेश राजाध्यक्ष यांना यंदाचा मराठीतील मानाचा 'जनस्थान' पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठी साहित्य क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर ठसा उमटविणाऱ्या, मराठी भाषेतून गौरवास्पद लेखन करणाऱ्या साहित्यिकाला हा पुरस्कार कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देऊन सन्मानित केले जाते.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्यासह मुंबईत पुरस्कार निवड समितीचे सदस्य सतीश तांबे, दासू वैद्य, रेखा इनामदार-साने, मोनिका गजेंद्रगडकर, अनुपमा उजगरे यांनी विजया राजाध्यक्षांच्या नावाची घोषणा मुंबईत केली. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी २७ फेब्रुवारीला पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र असे आहे. 'कुसुमाग्रज हे माझ्या शालेय जीवनापासून ते आजतागायतचे दैवत आहे. त्यांच्याशी व्यक्ती आणि वाचक म्हणून जोडलेले नाते प्रेरणादायी राहिले आहे. त्यामुळे आजच्या पुरस्कारामुळे आनंद होत असतानाच तात्यासाहेब आपल्यात आहेत, अशी जाणीव होते,' असे विजया राजाध्यक्ष म्हणाल्या.

### * सई परांजपे यांना 'आरती प्रभू पुरस्कार'

बाबा वर्दम थिएटर्स आणि आरती प्रभू अकादमीच्या पाचव्या पुरस्काराच्या मानकरी नाटककार सई परांजपे ठरल्या. त्याचे वितरण २१ जानेवारीला करण्यात आले. केदार सामंत म्हणाले, '२०१३ पासून नाटक किंवा कविता या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या नाटककार कै. चि. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या नावाने पुरस्कार देण्यात येतो. रोख ११ हजार, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.'

### * लालन सारंग यांना 'जीवनगौरव' पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे देण्यात

येणारा ‘जीवनगौरव पुरस्कार’ यंदा ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते २४ जानेवारीला कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात करण्यात आले.

सारंग यांच्या नाट्य कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला अभिनेत्री वंदना गुप्ते, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर, नाट्य समीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे, राकेश सारंग उपस्थित होते. वितरण सोहळ्यानंतर सारंग यांच्याशी दिलखुलास गप्पांचा कार्यक्रम रंगला.

**⁕ कविता भालेराव यांना ग्रंथपुरस्कार**

प्रसिद्ध लेखक आणि चार्टर्ड अकाउंटंट मिलिंद संगोराम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा पहिला ग्रंथपुरस्कार ‘गणितयोगी डॉ. श्रीराम अभ्यंकर’ या पुस्तकासाठी देण्यात आला. एका अनौपचारिक समारंभात लेखिका कविता भालेराव यांना हा पुरस्कार ज्येष्ठ रंगकर्मी श्रीराम रानडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

‘गणिताच्या क्षेत्रात जागतिक कीर्ती संपादन केलेल्या डॉ. अभ्यंकर यांच्या कार्यकर्तृत्वाची कहाणी अतिशय रोचकपणे मांडलेल्या या पुस्तकाने मराठी चरित्र वाङ्‌मयात मोलाची भर पडली आहे,’ असे मत रानडे यांनी व्यक्त केले.

वाचनवेड हे मिलिंद संगोराम यांचे स्वभाववैशिष्ट्य होते. कोणत्याही विषयावरील सकस लेखन त्यांना नेहमीच आकर्षित करीत असे. त्यामुळे या पुरस्काराचे महत्त्व अधिक असल्याचे राजहंस प्रकाशनचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी सांगितले. सहजसुंदर आणि ओघवती शैली यामुळे डॉ. अभ्यंकर यांची अनेक वैशिष्ट्ये या पुस्तकात उलगडली असल्याचे लेखक आनंद हर्डीकर यांनी सांगितले.

‘गणित हा माझ्या अभ्यासाचा विषय नसतानाही, दिलीप माजगावकर यांच्या प्रोत्साहनामुळे हे लेखन माझ्या हातून होऊ शकले,’ अशी भावना भालेराव यांनी व्यक्त केली. डॉ. अपूर्वा संगोराम यांनी मनोगत व्यक्त केले. माजगावकर यांनी सौमित्र यांची ‘पुस्तक’ ही कविता वाचून मिलिंद संगोराम यांच्या आठवणींना उजाळा दिला.

❖


# पुस्तक परिचय

'माय लाइफ ॲज अ ट्रेटर' या
इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

## मी झारा गहरमानी एक देशद्रोही

**इराणमधील राजकीय व सामाजिक गुंतागुंत समजून घेऊन रसिक वाचकांना अंतर्मुख करणारी कहाणी**

*'माय लाइफ ॲज अ ट्रेटर' ही कथा आहे झारा गहरमानी या सामान्य मुलीची. कैदेच्या अंधारात लुप्त झाल्यापासून तिथून पुन्हा स्वातंत्र्याकडे केलेल्या तिच्या निरतिशय धीट प्रवासाची. सदर विदारक प्रवास पूर्णत्वाला नेताना झारा स्वतःमधील सामर्थ्याबद्दल अनभिज्ञ होती; पण परिस्थितीनुरूप तिला आपल्यातलं ते सामर्थ्य जागृत करून त्याचा योग्य तो वापर करावा लागला. झारानं हे सगळं नेमकं कसं साधलं आणि एका सामान्य पर्शियन मुलीपासून ती एका धैर्यवान, करारी कार्यकर्तीमध्ये कशी रूपांतरित झाली, याची ही प्रेरणादायक कथा आहे.*



**लेखक**
**झारा गहरमानी**

**अनुवाद**
**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**

*‘झारा गहरमानीने लिहिलेलं ‘माय लाइफ अ‍ॅज अ ट्रेटर’ हे पुस्तक जितकं प्रेरणादायी आहे, तितकंच बिथरून टाकणारंसुद्धा! तारुण्यसुलभ आदर्शवाद आणि धर्मांधांची दुराग्रही मतप्रणाली ह्या दोहोंमध्ये क्लेश झाल्यावर उद्भवणाऱ्या भयावह परिस्थितीचं लेखिकेनं केलेलं नेमकं चित्रण, वाचकाला मुळापासून हादरवून सोडतं! मात्र, घोर हिंसेच्या भीतिदायक छायेत वावरताना आपल्यात जागृत ठेवलेल्या मनोबलाचं झाराने जे चित्रण केलेलं आहे, ते निव्वळ विलक्षण होय. कमालीच्या नकारात्मक परिस्थितीमधूनही सौंदर्य व स्वातंत्र्यासाठीची आस कशी तेवत ठेवता येते, ह्याची ही कथा एक उत्तम उदाहरण आहे. इराणच्या कुख्यात एव्हिन तुरुंगामध्ये व्यतीत केलेल्या काळ्याकुट्ट दिवसांचं विदारक चित्रण करणारी झारा गहरमानीची ही कथा, प्रतिकूल परिस्थितीमध्येसुद्धा एका तरुण, आशावादी मुलीच्या हृदयात जागृत राहणाऱ्या स्वातंत्र्य व जीवन लालसेचं उत्कृष्ट रेखाटन आहे.’*

**– लुई ब्राउन,**
**‘द डान्सिंग गर्ल्स ऑफ लाहोर : सेलिंग लव्ह अ‍ॅण्ड सेव्हिंग ड्रीम्स इन पाकिस्तान्स प्लेझर डिस्ट्रिक्ट’चे लेखक.**

*‘मानवतेशी गद्दारी करणाऱ्या व्यक्तीपेक्षा इतर कुठलाही गद्दार जास्त शापित नसेल!’*

**- जेम्स रसेल लॉवेल,**
**‘ऑन द कॅप्चर ऑफ सर्टन फ्युजिटिव्ह स्लेव्ह्ज नीयर वॉशिंग्टन’.**



*१९८१ साली इराण येथील तेहरानमध्ये झारा गहरमानीचा जन्म झाला. एव्हिन तुरुंगामधून सुटका झाल्यानंतर झारा ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक झाली. सध्या ती तिथंच राहते. ‘माय लाइफ अॅज अ ट्रेटर’ हे तिचं पहिलं पुस्तक आहे.*

*झारा गहरमानीला या पुस्तकाच्या लिखाणकार्यात मदत करणारे रॉबर्ट हिलमन हे पत्रकार व कादंबरीकार आहेत. आपल्या कारकिर्दीमध्ये त्यांनी बऱ्याचदा मध्य-पूर्व देशांचे दौरे केलेले आहेत.*

**इ**राकविरुद्ध चालू झालेलं युद्ध संपेपर्यंत, तेहरानमधली माझ्या वयाची मुलं एयर-रेड्स अर्थात विमानहल्ल्यांबद्दल सावधान करणाऱ्या भोंग्याला सरावून गेलो होतो. सुरुवातीला भोंगा ऐकून भीतीनं पळापळ करणारी आम्ही मुलं आता खांदे उडवून पुन्हा आमच्या खेळांत दंग होऊ लागलो होतो. कधी खरोखरीच क्षेपणास्त्र पडलंच तर ''एऽऽ! त्याचा निशाणा चुकला! आम्ही अजूनही जिवंत आहोत!'', असा जल्लोष करू लागलो होतो (!). खरंतर मला माझ्या इतर शूर सवंगड्यांप्रमाणे भोंगा वाजल्यावरही खेळत राहणं आवडलं असतं; पण मी घरी पोहोचेपर्यंत आई भीतीनं वेडीपिशी होईल हे ठाऊक असल्यानं भोंगा वाजला की, मी थोड्या वेळातच आम्हाला दिलेल्या छावणीमध्ये लपायला जात असे. विमानहल्ल्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी सरकारनं आम्हा तेहरान वासियांना लांबच्या लांब बोगदे करून दिले होते. ह्याच आमच्या छावण्या. भोंगा वाजला की, एरवी बोगद्यामध्ये सुखदु:खाच्या गोष्टी करत बसलेल्या बायकांमध्ये एकच गलका उडे! आपल्या सगळ्या पोरांना हुडकून काढून, त्यांना छावणीत परत आणेपर्यंत त्यांच्या जिवात जीव नसे. बोगद्यामधलं आयुष्य म्हणजे एक निराळंच जग होतं. आम्हा लहान मुलांसाठी ओळीनं गाद्या घातलेल्या असायच्या. त्यांवर आम्हाला दामटवत झोपवताना, आमच्या आया दंगा करणाऱ्या मोठ्या मुलांवर खेकसत राहायच्या. त्यांनी नजरेआड होऊ नये ह्यासाठी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवायच्या. मोठ्या वयाचे पुरुष बऱ्याचदा प्रार्थना करण्यात मग्न असायचे. खिदळत राहणाऱ्या पोरांच्या आणि खेकसत राहणाऱ्या स्त्रियांच्या गलक्यामध्ये ह्या पुरुषांची प्रार्थना कशी काय पूर्ण व्हायची, ह्याबद्दल मला आजही कुतूहल आहे.

छावणीत येताना मी माझ्यासोबत माझा आवडता पायजमा, रंगीत खडू आणि चित्रांचं पुस्तक आणायला विसरले नव्हते. त्यामुळं माझा बराचसा वेळ रुस्तम, दारियस, सोहराब इत्यादींची चित्रं काढण्यात जात असे.

मात्र छावणीच्या सुरक्षित कवचाबाहेरचं तेहरान फारच भीषण होत चाललं होतं. कित्येक लोकांची सुंदर घरं – त्यांनी निगुतीनं राखलेल्या बागा आणि खुद्द कित्येक लोकसुद्धा – आगीच्या लोळांमध्ये भस्म होत

होती. रस्त्यांमध्ये पडणाऱ्या मृतदेहांचा खच आवरण्यासाठी सैनिकांची धावपळ सुरू होती. रक्ताळलेल्या अवस्थेत विव्हळणाऱ्या जखमींसाठी ॲम्ब्युलन्स कमी पडत होत्या. सगळीकडे हाहाकार माजला होता; पण मी मात्र छावणीमध्ये सुरक्षित राहिले होते.

त्यानंतर बारा वर्षांनी इराणमध्ये पुन्हा अशी परिस्थिती उद्भवली, जेव्हा माझ्यासमोर दोन पर्याय उभे ठाकले – एकतर मी निमूट घरात बसून होणाऱ्या गोष्टींवर मूक (आणि दुबळा) आक्षेप दर्शवत राहावं किंवा मग सरळ रस्त्यावर जाऊन सदर अन्यायांचा जोरकसपणे धिक्कार करावा. ह्या वेळी मी माझ्या मनाप्रमाणे निर्णय घेतला. आता मी पाच-सहा वर्षांची लहान मुलगी न राहता महाविद्यालयाच्या दुसऱ्या वर्षात शिकणारी सुजाण तरुणी बनले होते. बारा वर्षांपूर्वी माझ्या बालमनाला खरंतर जे करावंसं वाटत होतं (पण तसं दर्शवता आलं नव्हतं), तेच मी आता करायचं ठरवलं आणि अन्यायाच्या विरुद्ध आरोळ्या ठोकत रस्त्यावर उतरले. वास्तविक त्या मोर्च्याचा उद्देश खूप सोपा आणि स्थानिक होता. सरकारच्या मतप्रणाल्यांविरुद्ध असलेला इतिहास शिकवल्याचा ठपका ठेवून आमच्या एका प्राध्यापकांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या ह्या अन्यायी अटकेबद्दल विरोध दर्शवण्यासाठी आम्ही मोर्चा काढला होता. आमच्या ह्या मोर्च्याला स्थानिक जनतेकडून आणि काही निडर वर्तमानपत्रांकडूनही चांगलाच पाठिंबा मिळाला होता.


मला आणि माझ्या मोर्चेबांधवांना असं वाटलं की, आम्हाला मिळालेला जनतेचा पाठिंबा पाहून सरकार घाबरलं. आपण चुकलो आहोत हे मान्य करण्याची, सरकारची आमच्या डोळ्यांत डोळे घालून सांगण्याची हिंमत नाही म्हणून – नाहीतर खरंतर त्यांना तसंच करावंसं वाटत असेल, असं आमचं ठाम मत झालं. आमच्या मोर्च्याला स्वत:हूनच, वेळेआधी यशस्वी घोषित करण्याच्या उन्मादामध्ये आम्ही असं गृहीत धरलं की, आमची तोंडं बंद करण्यासाठी लागणारा दम आता सरकारमध्ये उरलेला नाहीये. पण अर्थात त्यानंतर लवकरच असा साक्षात्कार झाला की, तसं नसून त्या वेळी सरकार फक्त हा अदमास बांधत होतं की, आमची तोंडं बंद करण्यासाठी त्यांना नेमका किती जोर लावावा लागेल.

सरकारच्या इराद्यांचा अंदाज येईपर्यंत मी आणि माझ्या आजूबाजूची

**नवं कोरं**

*विश्वासघात करणाऱ्या,*
*नातं तोडणाऱ्या किंवा मनावर घाव*
*घालणाऱ्या मित्रांशी पुन्हा मैत्री करा!*

# मैत्री अशी आणि तशी




मुळ लेखक - **जॅन येगर**

अनुवाद - **सुप्रिया वकील**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'मैत्री' हा आयुष्यातील एक सुरेख रेशीमबंध असतो, जो आयुष्यातील चढ-उतारात आपली सोबत करतो, आधार देतो, आपली उमेद टिकवून ठेवतो; पण जर या सुंदर नात्याची वीण उसवत गेली, तर माणसाचं आयुष्य वैराण होऊ शकतं, त्याचे दूरगामी परिणाम घडू शकतात. वैयक्तिक आयुष्य, करिअर, इतर नातेसंबंध यावरही ठळक दुष्परिणाम घडू शकतात. अशा या 'मैत्री'च्या नात्याचं महत्त्व ओळखून लेखिका जॅन येगर यांनी दीर्घ संशोधनातून या विषयाची सविस्तर मांडणी केली आहे. मैत्रीचं नातं जोडण्यासाठी, ते टिकवण्यासाठी, त्यामुळे आयुष्य अधिक आनंदी व सुखकर बनण्यासाठी काय करता येईल, तसंच नकारात्मक मैत्री, मैत्रीत उद्भवणारे संघर्ष यावर कशी मात करता येईल, अशा अनेक पैलूंना तपशीलवार स्पर्श करत हे पुस्तक 'मैत्री'विषयक मार्गदर्शन करतानाच आत्मपरीक्षणास प्रवृत्त करते.

तरुण मुलं, आमच्या नव्या शत्रूवर हसण्यात मग्न झालो होतो. आमचे नवे शत्रू म्हणजे पोलिस, सरकारनं नेमलेले सुरक्षारक्षक, बासिजीमधली मूर्ख, बिनडोक आणि धर्मांध तरुण पोरं, मुल्ला आणि एकूणच सगळी सरकारी माणसं पण ज्या वेळी आम्ही त्यांच्यावर तोंडसुख घेण्यात आणि त्यांची टर उडवण्यात मग्न होतो, तेव्हा आम्हा कुणालाच असं कधी वाटलं नाही की, आम्हाला ह्याची खूप मोठी किंमत मोजावी लागेल.

तारुण्यसुलभ आत्मविश्वासानं भारावलेल्या आम्हा मुलांना तर असं वाटत होतं की, आमचा रस्ता कापण्याची कुणी हिंमतच करू धजवणार नाही. माझ्या बाबतीत बोलाल तर मी ह्या विश्वासात मग्न होते की, माझ्यासोबत माझा 'रुस्तम' – माझा अराश – असल्यावर मला जगात कुणाचीही भीती बाळगण्याची गरज नाही.

मग एक दिवस असा उजाडला. जेव्हा मी महाविद्यालयामधून घरी परतत होते. बॅगमधून महाविद्यालयाची पुस्तकं डोकावत होती आणि डोक्यावरचा रुमाल धीटपणे पाठीमागे सरकून माझे बोटभर केस दाखवत होता. मी नुकतीच माझ्या दोन मैत्रिणींना त्यांच्या घरी सोडून माझ्या घरापर्यंत जाणारा रस्ता कापत होते. त्या दोन मैत्रिणीसुद्धा माझ्यासारख्याच 'ज्वालामुखी' प्रवृत्तीच्या होत्या. संपूर्ण रस्ताभर आम्ही आमच्यावर होणाऱ्या अन्यायांविरुद्ध महाविद्यालयामध्ये धरणे धरली पाहिजेत, अशा कल्पना मांडत आणि तारुण्यसुलभ पद्धतीनं महाविद्यालयातल्या देखण्या मुलांबाबत चर्चा करत आलो होतो.

इतक्या कड्या पहाऱ्यांमधूनसुद्धा आम्ही चार घटका करमणूक मिळवू शकलो आणि चार घटका स्वतंत्र विचार उद्घोषित करू शकलो, ह्या उन्मादात मी झपाझप पावलं टाकत पुढं चालू लागले. इतक्यात माझ्याशेजारून करकचून ब्रेक लावल्याचा आवाज आला, तसं मी चमकून मागे बघितलं. मी काही प्रतिक्रिया देऊ शकण्याआधीच, त्या हिरव्या रंगाच्या प्युगो गाडीमधून एक शिपाई बाई बाहेर पडली आणि मला म्हणाली, ''तुझं ओळखपत्र दाखव.'' मला काहीच समजेना... हा नेमका काय प्रकार चाललाय? पण आता ही वेळ प्रश्न विचारण्याची नाही हे लक्षात येऊन, मी निमूट तिला माझं ओळखपत्र सुपूर्द केलं. तिनं त्यावर धड नजर फिरवेपर्यंत अजून एक शिपाई उतरला आणि क्षणार्धात त्यानं

मला गाडीच्या पाठच्या आसनावर ढकललं. ती शिपाई बाईसुद्धा गाडीत शिरली आणि मला काही समजण्याच्या आत गाडीनं वेग धरला. आता मी प्रचंड घाबरले आणि मागच्या काचेतून डोकावत, काही मदत मिळते का ते बघू लागले. बघितलं तर माझ्या दोन्ही मैत्रिणी जीव तोडून गाडीमागे धावत होत्या. (त्यांच्या घरापासून काही अंतरावरच हा प्रकार घडल्यानं, त्यांनी सगळं बघितलं होतं.) पण गाडीच्या सुसाट वेगासमोर त्यांचा वेग कमी पडला आणि काही क्षणांतच मला त्या दिसेनाशा झाल्या.

घडला प्रकार इतका आकस्मिक होता की, काही मिनिटं मला ते सगळं स्वप्नात घडल्यासारखंच वाटत राहिलं. मग जरा भानावर आल्यावर त्या घटनेचं गांभीर्य माझ्या मनात झिरपू लागलं. हे असं पोलिसांकडून रस्त्यावरून उचललं जाणं निश्चितच आगामी मोठ्या संकटाची चाहूल होती. मी असं ओझरतं ऐकलं होतं की, बऱ्याचदा बंड पुकारणाऱ्या विद्यार्थ्यांना धडा शिकवण्यासाठी, पोलिस त्यांना असेच रस्त्यावरून उचलून, खरपूस चोप देऊन, रक्ताळलेल्या अवस्थेत कुठल्यातरी अज्ञात ठिकाणी फेकून देतात. पण आजपावेतो माझ्या ओळखीच्या कुठल्याही व्यक्तीसोबत असं घडलं नसल्यामुळं मी त्या गोष्टीचा फारसा गांभीर्यानं विचार केला नव्हता. हो, ह्या गोष्टीसाठी माझी मानसिक तयारी होती की, कधीतरी मला पोलिस ठाण्यात बोलावलं जाईल आणि चार उभे-आडवे प्रश्न विचारले जातील; पण मला असं थेट उचललं जाईल, असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं. सदर परिस्थितीमध्ये आपला आत्मसन्मान जपण्याच्या हेतूनं मी जरा उच्चभ्रू आणि निडर वागण्याची खूणगाठ बांधली आणि त्यानुसार शेजारच्या शिपाई बाईला विचारलं, ''एक्स्यूज मी! पण मला जरा सांगाल का की, तुम्ही मला कुठं नेत आहात?''

उत्तरादाखल, त्या बाईनं माझ्याकडे साधं वळूनही न पाहता, रटाळ स्वरात सांगितलं, ''पोलिस ठाण्यात. तुला काही प्रश्न विचारायचे आहेत.''

''प्रश्न? कशाबद्दल?''

''वेळ आली की सगळं सांगितलं जाईल.''

''नाही! मला आत्ताच्या आत्ता सांगा.''


पण अर्थातच माझ्यासारख्या धिटाईनं हट्ट धरणाऱ्या मूर्खांशी रोजच सामना करणाऱ्या त्या अधिकाऱ्यांवर माझ्या धमकावणीचा काहीच परिणाम झाला नाही. मी त्यांना अजून काही विचारू शकण्याआधीच, अचानक गाडी थांबवली गेली आणि शिपाई बाईनं माझ्या डोळ्यांवर काळी पट्टी चढवली. मला काही दिसत नाहीये ह्याची चार-चार वेळा खात्री केली. आता मात्र माझं सगळं अवसान गळून गेलं. मी ठरवून टाकलं की, हे लोक माझ्यावर ज्या कुठल्या गुन्ह्याचा ठपका ठेवतील, त्याबद्दल मी अगदी नाक घासून माफी मागेन. पुन्हा तो गुन्हा करणार नाही, असं माझ्या आईची शपथ घेऊन सांगेन. ... माझी आई!... अरे देवा! तिला ह्याबाबत काही समजता कामा नये. ती बिचारी माझ्या काळजीनं मरूनच जाईल. ... नाही, मी माफी मागेन... म्हणजे माझी लगेच सुटका होईल आणि माझ्या आईच्या जिवात जीव येईल. पण हे चूक आहे ना? असे कसे हे लोक मला भर रस्त्यावरून उचलून घेऊन आले? ही काय पद्धत झाली? नाही! मी त्यांना आता धमकी देईन की, मला निमूट सोडा; नाहीतर मी सरळ वृत्तपत्रांकडे जाऊन तुमचा भांडाफोड करीन.... अरे बाप रे! पण माझ्या ह्या धमकीचा त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही तर? तर मग मी इथंच खितपत पडेन आणि तिथं माझी आई माझ्यासाठी झुरत मरेल. नाही! तसं होता कामा नये. मी ह्यांना सांगेन की, मी जे काही केलं, ते स्वत:च्या मर्जीनं केलं नाही. मला तर हे माहीतच नव्हतं की, माझ्या कृत्याचा काय विपरीत परिणाम होईल. माझ्या मित्र-मैत्रिणींनी मला फशी पाडलं, म्हणून मी असं वागले. त्यांनी मला फसवलं. ... पण... पण मी हे असं बोलल्याचं अराशला समजलं तर? तर त्याला माझी किती लाज वाटेल? तो किती नाराज होईल? त्याचा माझ्यावरचा विश्वासच उडून जाईल. नाही! मी ह्यांच्यासमोर गयावयाही करणार नाही आणि खोटंसुद्धा सांगणार नाही. चुकीचं ते वागत आहेत, मी नाही. मी खरं काय तेच सांगणार! आणि बाबा चांगला वकील आणून माझी सुटका करून घेतीलच.

माझं हे विचारचक्र मध्येच थांबलं, तशी मी पुन्हा भानावर आले. दुरून गाड्यांचा आवाज येत असतो; पण मला नेमकं कुठं नेत आहेत, ह्याचा अंदाज येत नाही. तेहरानमध्ये तर गल्लोगल्ली पोलिस ठाणी आहेत. मग तिथल्याच कुठल्यातरी ठाण्यात न नेता, मला इतकं दूर कुठं

**नवं कोरं**

*एका असामान्य महिलेची कहाणी*

# द्विखंडित




मूळ लेखक - **तसलिमा नासरिन**

अनुवाद - **विलास गीते**

**किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘द्विखंडित’ हा तसलिमा नासरिन यांच्या आत्मचरित्राचा तिसरा भाग आहे. या भागात तसलिमांच्या सत्तावीस ते तीस वर्षांपर्यंतच्या वयाची कहाणी आहे. तसलिमांच्या स्त्रीवादी लेखनाला आलेला वेग, त्यांचे स्तंभलेखन, कवितालेखन व कादंबरीलेखन याबद्दल त्यांनी या पुस्तकात सविस्तरपणे लिहिले आहे. स्तंभलेखनाचे ‘निर्बाचित कलाम’ हे पुस्तक व ‘लज्जा’ ही कादंबरी प्रकाशित झाल्यावर बांगलादेशमध्ये त्यांच्याविरुद्ध तयार झालेले वातावरण, त्यांचा खून करण्याचा फतवा, त्यांना ‘आनंद’ पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ लेखकांना वाटणारी ईर्ष्या, पुस्तकजत्रेत त्यांच्यावर झालेला हल्ला व त्यांच्या पुस्तकांची होळी, या सर्वच घटनांबद्दल त्यांनी या पुस्तकात लिहिले आहे.

केवळ विषयाच्या महत्त्वामुळेच नव्हे, तर प्रसादगुणानेही या भागाला वाचनीय बनवले आहे. ‘द्विखंडित’ हे पुस्तक एकाच वेळी साहित्य, एका असामान्य महिलेची कहाणी आणि एक देश आणि समाज यांच्यामधल्या वादळाची कहाणी आहे.

नेत आहेत?

जसजसा वेळ जात राहतो, तसतशी माझ्या मनातली भीती अजूनच गडद होऊ लागते. आम्ही नेमकं चाललोय तरी कुठं?

अखेर बऱ्याच वेळानं गाडी थांबते आणि शिपाई बाई मला फर्मावते, ''चल, खाली उतर.''

मी उतरते आणि शिपाई बाईच्या हुकमानुसार पुढं चालू लागते. डोळ्यांवरच्या पट्टीमुळे दिशाहीन झाल्यासारखं वाटत असतं. लहानपणी लपंडाव हा माझ्या आवडत्या खेळांपैकी एक होता; पण आताचा हा लपंडाव जीवघेणा वाटू लागला होता. कुठल्याही क्षणी माझ्यावर चाबूक चालवला जाईल किंवा मला छडीनं फोडून काढण्यात येईल, ह्या भीतीनं मी पुरती गारठून जाते.

काही अंतर असंच अडखळत चालल्यावर, शिपाई बाई पुन्हा मला फर्मावते, ''हं, थांब!'' मी तत्काळ जागीच खिळून राहते, जणू मी किती गुणी मुलगी आहे, ह्याचीच ग्वाही देत असावे.

माझ्या आजूबाजूला लोक फिरत असल्याचं जाणवतं. मध्येच कुणीतरी खिदळतं; त्यावर कुणी अधिकारी पुरुष त्या व्यक्तीला दरडावून गप्प करतो. मग ती शिपाई-बाई माझ्या डोळ्यांवरची पट्टी ओढून काढते. (तसं करताना माझ्या डोक्यावरचा रुमाल खेचला जाणार नाही, ह्याची काळजी घेते.)

डोळे उघडल्यावर लक्षात येतं की, मी एका पोलिस-चौकीमध्ये उभी आहे; पण ही चौकी तेहरानमधल्या इतर चौक्यांपेक्षा वेगळी दिसत आहे. काही पोलिस टेबलापाशी बसून कुणाची चौकशी करण्यात मग्न असतात; तर काही कंटाळलेल्या चेहऱ्यानं इथं-तिथं बघत उभे असतात. तिथल्या एका भिंतीला पाठ टेकून काही मुली आणि स्त्रिया बसलेल्या असतात. अचानक एक शिपाई बाई त्यांच्यावर जोरजोरात ओरडू लागते आणि हातवारे करून त्या सगळ्यांना तिच्यासमोर येऊन उभं राहायला फर्मावते. त्या सगळ्या लगबगीनं माझ्याशेजारी येऊन उभ्या राहतात. मी त्यांच्याकडे चोरटा कटाक्ष टाकते तेव्हा लक्षात येतं की, त्या सगळ्याजणी वेश्या असतात. अगदी किशोरवयीन मुलींपासून ते पन्नाशीतल्या प्रौढांपर्यंत. त्या

स्त्रियांच्या जथ्थ्याकडे बघून मला लक्षात येतं की, दिवसभर लोकांना रोकत-टोकत फिरणाऱ्या बासिजींनी ह्यांना इथं उचलून आणलेलं असावं. आम्ही सगळ्या समदु:खी आहोत ह्या विचारानं मी त्यांपैकी एकीशी बोलायचा प्रयत्न करत खुसफुसते, ‘‘नमस्कार...’’ त्यावर ती बाई आपल्या शेजारणीकडे बघून दात विचकत उद्गारते, ‘‘अजून एक महाविद्यालयीन पाखरू आलंय बघ!’’

त्या सगळ्या बायका फारच हुज्जत घालणाऱ्या होत्या. वास्तविक सगळ्याच इराण्यांना हुज्जत घालण्याची सवय असते; पण आता आपण पोलिस-कोठडीत आहोत तर जरा संयमानं वागलं पाहिजे, ह्याचं त्या बायकांना काही भानच नव्हतं मुळी! आपल्याला इथं का आणण्यात आलं आहे, ह्याबद्दल त्या तिथल्या पोलिस-अधिकाऱ्यांशी वाद घालत बसल्या होत्या. वीतभर वस्त्रं घातलेली एक मुलगी विचारत होती, ‘‘मी काय गुन्हा केलाय?’’ ओठांवर लिपस्टिक फासलेली दुसरी मुलगी खिदळत होती, ‘‘ही लिपस्टिक नाहीये काही; मी लॉलिपॉप खात होते ना, त्यामुळे माझे ओठ इतके रंगले आहेत.’’

मला समजेना की, इतक्या बिकट प्रसंगी ह्या एवढ्या बिनधास्तपणे कशा काय वागू शकतात? मी का नाही अशी वागू शकत? देवा! मला जर ह्यांची शिक्षा भोगता आली, तर किती बरं होईल. किमान त्यांना आपला गुन्हा काय आहे, हे तरी माहितेय. त्यामुळे त्यांना जी शिक्षा मिळेल, ती भोगण्याची त्यांची मानसिक तयारी तरी आहे. मला मात्र माझा गुन्हा काय आहे हेसुद्धा ठाऊक नाही आणि त्यासाठी काय शिक्षा मिळू शकते, हेसुद्धा माहीत नाही. त्यामुळं माझी अस्वस्थता अर्थातच सगळ्यात अधिक वाईट आहे.

थोड्या वेळानं मला इथं घेऊन आलेली शिपाई बाई कंटाळून आराम करण्यासाठी निघून जाते. ती गेल्यावर इतर स्त्रिया पटापट चौकीभर फतकल मारून बसतात; पण मी मात्र अगदी आज्ञाधारकपणाची पराकाष्ठा करत तशीच उभी राहते. बाकीच्या स्त्रिया माझ्याकडे बघून फिदीफिदी हसत राहतात; पण मी त्यांच्याकडे दुर्लक्ष करते. बराच वेळ जातो. मग एक पोलिस अधिकारी आत येऊन आम्हाला त्याच्यापाठी चालत येण्याचा हुकूम करतो. तो आम्हाला एका तारेच्या दरवाजापर्यंत घेऊन जातो.

दरवाजा उघडतो; आम्हा सगळ्यांना आत ढकलतो आणि दरवाजा बंद करून घेतो. आता आम्ही सगळ्या त्या दरवाजामागे अडकलेल्या कैदी बनतो. थोड्या वेळानं आमच्यावर पहारा देणारे शिपाई सुस्त झाल्याचं लक्षात आल्यावर, मी त्या स्त्रियांपैकी एकीला विचारते, ''तुम्ही इथून बाहेर पडलात की, फक्त एकदा माझ्या आईला फोन करून कळवाल का की, मी इथे बंदिस्त आहे ते? प्लीज? प्लीज?''

तशी ती बाई मला नखशिखान्त न्याहाळत थंडपणे उत्तर देते, ''नाही. तू राजकीय कैदी म्हणून आणली गेली आहेस. तुला मदत करायला गेले, तर माझ्यावर काय कंबख्ती ओढवेल ह्याचा मला अंदाजसुद्धा लावायचा नाहीये.''

''असं करू नका हो. माझ्यावर दया करा. बरं...माझ्याकडे थोडे पैसे आहेत. ते मी तुम्हाला दिले, तर कराल का माझं हे काम?''

''नाही.'' असं म्हणत ती माझ्यापासून जरा दूर जाऊ लागते. पण मी निग्रहानं तिच्या पाठी जात पुन्हा एकदा विनवते, ''बरं, मला एवढं तरी सांगू शकाल का की, आता ही लोकं मला काय करतील? प्लीज?''

त्यावर ती बाई (कुणी आमचं संभाषण ऐकत नाहीये ह्याची खात्री करून) एका शब्दात उत्तर देते, ''एव्हिन.''

''काय? खरंच?''

''तू मला विचारलंस, मी तुला सांगितलं.''

खरंतर मला तिला अजूनही काही विचारायचं असतं; पण माझा इरादा ओळखून की काय, ती बाई माझ्यापासून लगेच दूर होते.


आता मी एकटी पडते, सर्वस्वी एकटी! 'देवाऽऽऽ! माझ्यावर कृपा कर, माझी मदत कर!' माझ्यासमोर काय वाढून ठेवलं आहे, ह्याची जाणीव झाल्यावर माझं हृदय जोरजोरात धडधडू लागतं; घशाला कोरड पडते; मेंदूमध्ये भीतियुक्त विचारांचं मोहोळ उठतं आणि त्या सगळ्या कोलाहलामधून एक जाणीव ठळकपणे उभी राहते. ती ही की, 'हे सगळं झेलण्यासाठी माझ्या अंगात तसूभरही त्राण उरलेले नाहीये.'

❖

**नवं कोरं**

निळ्या डॉल्फिन्सच्या
बेटावरील सत्यकथा!

# गोष्ट एका करानाची




मूळ लेखक - **स्कॉट ओ'डेल**

अनुवाद - **मैत्रेयी जोशी**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'आयलंड ऑफ द ब्ल्यू डॉल्फिन्स,' प्रशांत महासागरातलं एक बेट... आकार एखाद्या सूर्यस्नान घेत पहुडलेल्या महाकाय मत्स्यासारखा. या बेटावर निळे डॉल्फिन्स पोहतात, ऑटर जलक्रीडा करतात, समुद्रपक्षी सूर मारून मासे पकडतात. एकेकाळी या बेटावर इंडियन्सची वस्ती होती. एका जहाजात बसून ते पूर्वेकडे निघून गेले आणि

एक १२-१३ वर्षांची मुलगी तिथेच मागे राहिली.

'कराना' नावाची ती इंडियन मुलगी १८ वर्षं या निर्जन बेटावर वाट पाहात एकटीच राहिली. 'दुसरं जहाज येईल आणि मला घेऊन जाईल', या आशेवर ती जगत होती.

या एकाकीपणातही ती मनाने खचली नाही. तिने स्वत:साठी घर बांधलं, स्वसंरक्षणार्थ शस्त्रं बनवली, नाव बांधली,

त्या नावेत बसून जलपर्यटन केलं.

अशरण जीवनेच्छा, दुर्दम्य आशावाद आणि पार्श्वभूमीला या बेटावरील रमणीय निसर्गसौंदर्याचं चित्रण असलेली ही सत्यकथा.


# पुस्तक परिचय

# पीस, लव्ह अँन्ड हीलिंग

## शरीर - मनाचा संवाद आणि स्वयंउपचारांचा मार्ग : एक शोध

*साधारण दहा वर्षांपूर्वी मूळ प्रकाशित झालेले ‘पीस, लव्ह अँड हीलिंग’ हे पुस्तक आपल्यामध्ये स्वत:ला बरे करण्याची शक्ती अंगभूतच आहे, हा क्रांतिकारी संदेश देते. अनेक शास्त्रीय अभ्यासांतून हे आता सिद्धही झालेले आहे. मन, बुद्धी आणि शरीर यांतील परस्परसंबंध आता संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राकडूनही स्वीकारले जात आहेत. याच तत्त्वाचा पुन्हा परिचय करून देताना डॉ. बर्नी एस. सिगेल चेतना, मनोसामाजिक घटक, वृत्ती आणि प्रतिकार यंत्रणा यांमधील संबंधांवरील सध्याच्या संशोधनावर प्रकाश टाकतात.*

*सिगेल म्हणतात, ‘प्रेम आणि मन:शांती आपले नक्कीच संरक्षण करीत असते. जीवनाच्या खडतर प्रवासामध्ये समस्यांचा सामना करायला यामुळेच ताकद येते. आपल्याला टिकून राहण्यास शिकवले जाते, वर्तमानामध्ये जगायला प्रोत्साहन मिळते आणि आलेल्या प्रत्येक दिवसाचा सामना करायला नव्याने जोम येतो.’*



**लेखक**
**बर्नी एस. सिगल**


**अनुवाद**
**पूर्णिमा कुंडेटकर**

*'ही एक सगळ्यात मनोरंजक गोष्ट आहे की, जीवनाचा समतोल हा माणसाच्या 'मनोवृत्ती'वर अवलंबून असतो! लक्षात येतंय? म्हणजे जर एखादी व्यक्ती जास्त आनंदी आणि मनाने खंबीर असेल, तर त्या व्यक्तीच्या शरीरात सोडियम निर्माण होण्याला अडथळा निर्माण होतो आणि मग कोणताही आजार किंवा इतर काहीही त्याला मृत्यूकडे ढकलू शकत नाही. परंतु ज्या क्षणी व्यक्तीच्या मनाचा खंबीरपणा ढळतो, त्या क्षणापासून सोडियम वरचढठरते आणि मग ती व्यक्ती स्वत:च मृत्यूला आमंत्रण देते.'*

*'सकारात्मकतेचे शरीरशास्त्र इतके सोपे आणि स्पष्ट आहे.'*

*'त्यामुळे शंभर-एक वर्षांनंतर शास्त्रज्ञांनी जर एखादे असे सोडियम मीठ शोधून काढले, जे एखाद्या जीवामध्ये पसरविल्यावर त्याच्या मनोवृत्तीची परीक्षा होईल, ती व्यक्ती निखळ मनाची आहे किंवा नाही, याची परीक्षा ते सोडियम मीठच करेल. शरीरात निर्माण झालेल्या रोगाच्या पेशी वाढतील किंवा तो रोग नष्ट होईल, हे त्या सोडियम मिठावर अवलंबून असेल, तर असा एखादा शोध लागल्यास मला त्याचे नक्कीच आश्चर्य वाटणार नाही.'*

**– अलेक्झांडर सोलझ्हेनीटसेन, कर्करोग वॉर्ड**



स्वतःला 'बर्नी' या नावाने संबोधित केले जावे असे त्यांना वाटते. न्यू हेवन येथील कनेक्टिकट येथे १९८९ पर्यंत जनरल व लहान मुलांचे चिकित्सक म्हणून त्यांनी काम पाहिले. १९७८ मध्ये त्यांनी रुग्णांचे सशक्तीकरण व जीवनातील आनंद घेत शांत चित्ताने मृत्यूला सामोरे जाणे या विषयावर मांडणी करायला सुरुवात केली. त्यांनी 'केअरफ्रॉन्टेशन' (Carefrontation-Care & Confrontation) नावाने कर्करोग झालेल्या अपवादात्मक रुग्णांच्या गटाची स्थापना केली.

बर्नी यांची ज्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा आहे ते तत्त्वज्ञान त्यांनी वैद्यकीय नीतिमत्ता व आध्यात्मिक बाबींमुळे गोंधळून गेलेल्या समाजासमोर ठेवले. त्यांची १९८६ साली 'लव्ह, मेडिसिन ॲण्ड मिरॅकल्स', १९८९ साली 'पीस, लव्ह ॲण्ड हीलिंग', १९९३ साली 'हाऊ टू लिव्ह बिट्विन ऑफिस व्हिजिट्स' आणि १९९८ साली 'प्रिस्क्रिप्शन फॉर लिव्हिंग' ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या पुस्तकांद्वारे आजारातून बरे होणे या विषयांवरील नवीन संकल्पना त्यांनी सादर केल्या आहेत. आता बर्नी आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि वैद्यकीय शिक्षणात मानवतावादी दृष्टिकोन आणण्यासाठी झटत आहेत. ते व त्यांची पत्नी बॉबी सध्या या विषयावर व्याख्यान देणे, कार्यशाळा आयोजित करणे याबद्दलचे तंत्र व अनुभव सर्वांसमोर आणणे यासाठी अविरत प्रवास करीत आहेत.

# पीस, लव्ह अँड हीलिंगबाबतचे काही विचार आणि त्यांची प्रतिबिंबे

पीस, लव्ह अँड हीलिंगच्या मूळ प्रकाशनापासूनच जागरूकता, मनोसामाजिक घटक, व्यावहारिकपणे बरे होणे, प्रतिकारशक्तीची कार्यप्रणाली आणि त्यांच्याशी संबंधित इतर अनेक घटकांवर शास्त्रज्ञ संशोधन करीत आहेत; परंतु या सर्व कल्पना नवीन नाहीत. नुकतेच तणावाशी निगडित आजाराच्या एका खटल्यामध्ये वैद्यकीय तज्ज्ञ या नात्याने काम बघताना मला विचारले गेले, 'या नव्या पद्धतीची सुरुवात कधी झाली?' त्यावर मी उत्तरलो, 'शेकडो वर्षांपूर्वी!' का? कारण त्या वेळी आपल्या रुग्णाच्या उपचारासाठी फिजिशियन्स औषधांवर फार कमी अवलंबून असत. त्या ऐवजी ते रुग्णाची जीवनशैली, त्याचा स्वभाव अशा प्रकारच्या माहितीवर जास्त भर देत.

वुडी एलन आपल्याला सांगतात की, 'माणसाचे दोन भागांत विभाजन होते – बुद्धी आणि शरीर! बुद्धी किंवा मन हे काव्य, तत्त्वज्ञान इत्यादींसारख्या अनेक चांगल्या महत्त्वाकांक्षा बाळगत असते, परंतु सगळी मजा शरीर लुटत असते. मला वाटते की, शरीर आणि बुद्धी किंवा मन हा एक संघ आहे, जो रक्तवाहिन्या आणि संदेशवाहक चेतातंतूंनी परस्परांशी जोडलेला असतो. प्रेम, आशा, आनंद आणि मानसिक शांती या सगळ्यांचा जेवढा शरीरावर परिणाम होत असतो, तेवढाच निराशा आणि दुःखाचासुद्धा होत असतो. शरीर आणि मन यांच्या संवादाचे हेच तर शास्त्र आहे.''

आज तंत्रज्ञानाने गगनभरारी घेतलेली आहे आणि त्याबद्दल मी मनःपूर्वक आभारीही आहे. परंतु निवारणासाठी, शरीराला बरे करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या पलीकडेही आणखी बरेच काही लागत असते. आज लोकांच्या वर्तनातून हे स्पष्टपणे प्रतीत होते. मला मान्य आहे की मरणे सोपे आहे आणि जगण्यालाच खरी हिंमत लागते. आपल्याला मृत्यूकडे पाठ करून जीवनाकडेच बघायचे आहे. जगण्यामध्ये अर्थ शोधायचा आहे. तेव्हाच आपल्याला कळेल की, आपण या पृथ्वीवर का आलो आहोत, आपलं कोणतं कार्य अपुरं राहिलं आहे? त्यातूनच जगण्याची प्रेरणा मिळेल. महान

गुरूंच्या ज्ञानाचा उपयोग करून जगण्याचा अर्थ शोधण्यासाठी मृत्यूच्या दाढेतून परतलेले लोक झटत आहेत.

मृत्यूशी झटापट करून, त्याला चीत करून, दीर्घकाळ जगलेल्या लोकांच्या एका गटाचा माझे मित्र मानसशास्त्रज्ञ वॉरेन बर्लेड यांनी अभ्यास केला, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही वैशिष्ट्यांची नोंद केली. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, हे लोक तीन गटांमध्ये विभागले जातात.

रागाची अभिव्यक्ती करण्याची क्षमता, नवीन गोष्टी शिकून जीवनशैलीमध्ये बदल करण्याची तयारी आणि आध्यात्मिक वृत्ती. काही लोकांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एकच वैशिष्ट्य दिसते, तर काहींमध्ये सर्व तीनही वैशिष्ट्ये दिसतात.

अशा प्रकारे माझ्या व्यवसायामध्ये मी रुग्णांचे जे निरीक्षण केले त्यातून मला असे दिसून आले की, जेव्हा एखाद्या व्यक्तीला मी सांगतो की, त्याला गंभीर आजार झाला आहे, जो बरा होऊ शकत नाही आणि ती व्यक्ती यावरून माझ्यावर भडकते, माझ्याकडे मदत मागते किंवा योग्य प्रकारे प्रतिसाद न दिल्यास पोटतिडकीने आक्रोश करते, ती व्यक्ती त्या आजारातून बरी होण्याची शक्यता जास्त असते.

याउलट ज्या व्यक्ती अशा आजाराचा स्वीकार करतात, हताश होतात आणि निमूटपणे घरी जाऊन मृत्यूची वाट बघत बसतात, त्यांची बरे होण्याची शक्यता तितकीच धूसर होत जाते. जी व्यक्ती विविध कार्यशाळांना उपस्थित राहते, वेगवेगळे वाचन करते आणि त्यातून मिळणाऱ्या माहितीमुळे स्वत:च्या जीवनशैलीत बदल करते, ती व्यक्तीसुद्धा स्वत:च्या जगण्याच्या शक्यतेत वाढच करीत असते. असे हे लढाऊ वृत्तीचे लोक स्वत:साठी कोणते जीवन अधिक योग्य आहे, यावर लक्ष केंद्रित करतात. हा स्वार्थीपणा नसून आपल्या इच्छेनुसार, हवे तसे जीवन निवडून त्या जीवनाचे रक्षण करणे आहे. लादलेले आयुष्य झुगारून, मनासारख्या आयुष्यासाठी केलेल्या मशागतीतून जीवन फुलविणे आहे.

तिसरा गुण आहे, तो आध्यात्मिक वृत्तीचा. हा एक असा स्त्रोत आहे, जो कठीण परिस्थितीमध्ये स्वत:बरोबर शांती आणि धैर्य आणतो. आपले त्रास, आपली दु:खं ईश्वरावर सोपविणे कधीकधी खूप अवघड असते, पण कधीकधी तेच जास्त योग्य ठरते.

इथे मी 'धर्म' हा शब्द वापरत नाही. कारण काही धर्मांचे नियम आणि

पद्धती व्यक्तीच्या मनात अपराधी भाव निर्माण करू शकतात आणि त्यामुळे बरे होण्याच्या प्रक्रियेमध्ये समस्या येऊ शकते. ईश्वर 'स्वत:' समस्या नाही. ईश्वर आणि संकटे सर्वोत्तम शिक्षक आहेत. त्यामुळे लढाऊ वृत्ती पीडिताच्या भावनेवर विजय मिळवते.

शांतानंद सरस्वतींचे लिखाण वाचताना 'पूर्ण व्यक्ती'बाबतचे त्यांनी केलेले विवेचन माझ्या वाचनात आले. त्यामध्ये त्यांनी 'कृती', 'विवेक' आणि 'समर्पण' हे गुण वर्णिले आहेत. ओळखीचे वाटतात ना! म्हणूनच मी म्हणतो की, मी याचा जितका खोलवर अभ्यास करीत जातो तितके मला असे जाणवत जाते की, हे नवीन नाही. परंतु आपल्या या शोधांना भूतकाळातील दाखल्यांचे जसजसे संदर्भ मिळत जातात, तसे हे शोध अधिक पक्के, अधिक वैध होत जातात.

आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीमध्ये स्मरणाची, जागरूकतेची क्षमता आहे. आपली स्वप्ने, प्रतीके आणि भावना याबद्दलच सांगत असतात. आता शास्त्राने, विज्ञानानेही हे सिद्ध केलेले आहे.

ज्या लोकांमध्ये अवयवाचे रोपण झालेले असते, त्यांची त्या अवयव-दात्याच्या जीवनाशी संबधीत, अनुभवांशी संबंधीत जी माहिती सतत उघड होत असते, ती अविश्वसनीय परंतु सत्य असते. त्यामुळे माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, आपल्या शरीराकडून येणाऱ्या संदेशांकडे आणि आपल्याला खुपणाऱ्या गोष्टींकडे नीट लक्ष द्या. तुम्ही तुमच्या शरीराला काय संदेश देत आहात, कोणती माहिती पुरवीत आहात त्याकडे सजगतेने बघा. त्याबाबत सतत जागरूक राहा. तुमच्या बुद्धीला, तुमच्या विचारक्षमतेला तुमच्या जाणिवांचा ताबा घेऊ देऊ नका. तुमच्या आरोग्यासाठी, तब्येतीसाठी हे घातक आहे. 'मन करा रे प्रसन्न!' ही उक्ती याबाबत तंतोतंत लागू पडते.

एका दु:खद घटनेच्या दरम्यान एका वकिलाला एकदम जाणीव झाली की, कायद्याचे शिक्षण घेताना तो जे शिकला, त्याचा काहीही उपयोग नाही. तो म्हणतो, 'विचार करायला शिकताना माझ्या 'जाणिवा' कधी बोथट झाल्या हे मला कळलेच नाही.'

हे पुस्तक पूर्ण होताना मी तुम्हाला तुमच्या याच जाणिवा प्रगल्भ करण्याचे मार्ग सांगणार आहे, ज्यामुळे तुम्हाला जशी व्यक्ती बनावे असे वाटते, तसे बनण्यास मदत मिळेल.

प्रेमाची नाती आरोग्यावर परिणाम करतात हे सिद्ध झालेले आहे. डेन्मार्कमध्ये दत्तक मुलांवर केलेल्या अभ्यासामध्ये असे आढळून आले की, या मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांचा मृत्यू जर कर्करोगाने झाला असेल, तर या मुलांमध्येही वयाच्या पन्नाशीपूर्वी कर्करोग विकसित होण्याची शक्यता जास्त असते. मग त्यांच्या जीवशास्त्रीय पालकांना कर्करोग झाला नसला तरीही!

स्वयंपाकघरात असलेल्या कर्करोगाच्या तत्त्वांचा याच्याशी काहीही संबंध नाही. पालकांबरोबर मुलांचे संबंध चांगले नसतील किंवा दोघांपैकी एका पालकाचा अकाली मृत्यू झाला असेल, तर त्याचा मुलांच्या भावी आरोग्यावर परिणाम होतो. हार्वर्डच्या विद्यार्थ्यांवर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, कॉलेजमध्ये येणाऱ्या मुलांपैकी ज्या मुलांनी त्यांचे पालक प्रेमळ असल्याचे नमूद केले होते, त्यांपैकी फक्त २९ टक्के मुलांना जीवनाच्या मध्यापर्यंत कोणताही ठळक आजार झालेला नव्हता. या उलट ज्या मुलांनी आपल्या पालकांचे वर्णन करताना प्रेमळ या शब्दाचा वापर केला नव्हता, त्यापैकी ९५ टक्के मुलांना पुढे गंभीर आजार झाले होते. या अभ्यासात बाकी सर्व संबंधित घटकांचाही विचार करण्यात आला होता. विश्वास किंवा श्रद्धेचाही असाच परिणाम दिसून येतो.

आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे की आप्तांची, प्रेमाची, स्नेहाची, आपुलकीची नाती आणि त्यामागील सुदृढआणि आपलेपणाची भावनाच सर्वाधिक परिणाम करत असते. जिवंत राहण्यासाठी अत्यावश्यक जीवनरसाचे रसायन यातूनच निर्माण होते. केवळ अंत:स्त्रावांची ही भूमिका नसते. शास्त्रज्ञ आणि फिजिशियन्स यांच्या पदव्यांमुळे, पुस्तकी ज्ञानामुळे अनेकदा त्यांची वृत्ती झापड बांधल्यासारखी संकुचित बनते. जेव्हा आजार त्यांच्या स्वत:च्या घरामध्ये प्रवेश करतो, तेव्हाच त्यांचा दृष्टिकोन बदलतो. मग ते जगण्यामागच्या, जिवंत राहण्यासाठीच्या घटकांचा विचार करायला लागतात आणि त्यामध्ये प्रेम नेहमीच सर्वोच्च पदावर असते.


सायकोन्युरोइम्युनॉलॉजीच्या क्षेत्रातील अग्रणी डॉ. जॉर्ज सोलोमन हे दीर्घायुषी लोकांचे गुण सांगताना 'रोग प्रतिकारक स्पर्धक व्यक्तिमत्त्व' ही संज्ञा वापरतात. व्यक्तीमध्ये हे गुणधर्म आहेत का? एड्स किंवा इतर कोणत्याही आजारांशी सामना करताना ती व्यक्ती दीर्घ जगेल का, हे ठरविताना ते काही प्रश्नांचा आधार घेतात. त्यांचे हे प्रश्न खूपच वास्तववादी आहेत. इतर

नवं कोरं

आयरिश महिलेच्या
भारतावरील निष्ठेची कहाणी

# क्रांतियोगिनी
# भगिनी निवेदिता

लेखक - **मृणालिनी गडकरी**




**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

भगिनी निवेदिताचे शिक्षण, साहित्य, कला, अध्यात्म या क्षेत्रातील कार्य क्रांतिकारक आहे; मात्र हे कार्य बरेचसे ज्ञात आहे. इतके दिवस अज्ञात होते ते तिचे सशस्त्र क्रांतीला असलेले सहकार्य! स्वामी विवेकानंदांनी पारखून निवडलेल्या या 'सिंहिणी'ला स्वत:च्या आत्मिक मुक्तीपेक्षा भारताची पारतंत्र्यातून मुक्ती महत्त्वाची वाटत होती आणि त्यासाठी सनदशीर वा सशस्त्र क्रांती असा कुठलाच मार्ग तिला वर्ज्य नव्हता. तिचा 'लॉजिस्टिक सपोर्ट' भारतीय क्रांतिकारकांना मिळाला म्हणूनच भारतीय क्रांतिकार्य प्रभावी झाले.

मानसशास्त्रज्ञांच्या अनेक पानी व्यक्तिमत्त्व विश्लेषणांच्या आधाराच्या तुलनेत या प्रश्नावलीमुळे डॉ. जॉर्जना उपचारांची दिशा ठरविताना अधिक मदत मिळते.

जिवंत राहणाऱ्या लोकांमध्ये दिसणाऱ्या गुणधर्मांशी हे प्रश्न साधर्म्य साधतात. जिवंत राहणाऱ्या लोकांच्या दैनंदिन कामकाजामधील प्रत्येक गोष्टीला एक अर्थ असतो. ते अर्थपूर्ण जगत असतात. ते जे काही करतात त्यामध्ये काहींना काही मूल्ये शोधत असतात. आपल्या प्रत्येक कृतीतून जगामध्ये प्रेम वाटण्याचे, वाढविण्याचे त्यांचे प्रयत्न असतात. आठवड्याची सुरुवात, सोमवार त्यांच्या अंगावर येत नाही. परिस्थिती बदलता येत नसेल, तर तिच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन तरी नक्कीच बदलता येतो, हे ते शिकलेले असतात. आनंदाची निवड करणे आपल्या हातात असते आणि ह्या आनंदाच्या झऱ्याचा स्त्रोत आपल्या आतच असतो.

दुसरा गुणधर्म म्हणजे, जेव्हा तुम्हाला सन्मानाने योग्य वागणूक मिळत नसेल, तेव्हा त्याबद्दल योग्य प्रकारे राग व्यक्त करणे योग्य ठरते. रुग्णालयात भरती होताना तुमच्या जवळ नेहमी 'सीगल कीट' असावे असे मी नेहमी सुचवतो. या सीगल कीटमध्ये एक जादूचा मार्कर, एक मोठा आवाज करणारी शिट्टी किंवा तत्सम वस्तू आणि एक पाण्याची बंदूक असते.

जर तुम्हाला ॲनेस्थेशिया दिला जाणार असेल, तर तुमच्या शरीरावर खुणा करण्यासाठी मार्कर. जसे की, स्तनाचा कर्करोग झालेल्या एका बाईच्या स्तनाची शस्त्रक्रिया होणार होती, तेव्हा तिने बाधित नसलेल्या स्तनावर लिहून ठेवले होते, 'हा नाही रे येड्या!' शिट्टी किंवा दुसरे काही आवाज करणारे साधन यासाठी की, समजा कॉल बटन दाबल्यानंतरही बराच काळ जर कोणी तुमच्याकडे लक्ष द्यायला आले नाहीतर ही शिट्टी वाजवून तुम्ही लक्ष वेधून घेऊ शकता आणि जे लोक तुम्हाला एक व्यक्ती म्हणून न संबोधता तुमच्या आजाराच्या नावाने किंवा खोली क्रमांकाने संबोधतात त्यांच्यावर पाणी उडवण्यासाठी पाण्याची बंदूक.

यामध्ये मी आणखी पुढे म्हणेन की, जेव्हा तुमच्यातील ऊर्जा कमी झालेली असते, जेव्हा तुम्हाला कोणावर चिडावं, रागवावसंसुद्धा वाटत नाही, तेव्हा ती समस्या देवावर सोपवा. शांतपणे, नि:शंक मनाने प्रार्थना करा आणि सर्वकाही त्या परमात्म्यावर सोपवून निर्धास्त राहा. नंतर तुम्हालाच जाणवेल की, ज्या गोष्टीवरून तुम्ही चिडलात, भडकलात ती गोष्ट खरंतर तुमच्या

भल्यासाठीच होती. डॉक्टरांच्या प्रतीक्षागृहामध्ये दोन तास वाट बघावी लागली, तर आपल्या वडिलांबद्दल विचार करा ज्यांना तुम्ही गेल्या वीस वर्षांत भेटला नाहीत. वाट बघत बसावं लागलं म्हणून चिडून, रागावून तिथून निघून जाण्याऐवजी ईश्वराचे आभार माना की तुम्हाला निवांतपणे विचार करायला वेळ मिळाला. त्या परमात्म्यावर सगळं सोपवा आणि निश्चिंत व्हा. अपघातामध्ये बोटे गमावल्यानंतर अनेक वर्षांनी जाणवेल की, तुम्हाला पकडणारे नरभक्षक आदिवासी अपूर्ण शरीराच्या व्यक्तीला खात नाहीत म्हणून तुमचा जीव वाचला. जिवावर बेतलेलं बोटांवर निभावलं!

जिवंत राहण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक गुणांमध्ये एक महत्त्वाचा गुण म्हणजे गरज पडेल, तेव्हा बिनदिक्कतपणे मदत मागणे. अशी मदत तुम्ही फक्त तुमच्या कुटुंबीयांकडेच मागायची नाहीतर वैद्यकीय व्यावसायिकांकडेही मागायची आहे.

आजाराच्या एखाद्या ठरावीक पायरीवर स्वत:साठी योग्य उपचार कोणते याचा निर्णय स्वत:चा स्वत: घेता येणे, हा सुद्धा महत्त्वाचा गुणधर्म आहे. याचा अर्थ केवळ इतरांना खूश करण्यासाठी, त्यांना दुखवायचे नाही म्हणून जे उपचार सांगितले जातील ते करणे मान्य न करणे. जीवन हे प्रसूतीच्या कळांसारखे असते, कोणती कळ ही तुम्हाला स्वत:ला जन्म देण्यासाठी निर्णायक आहे, हे फक्त तुम्हालाच जाणवत असते. जेव्हा तुम्ही स्वत:ची ही जाणीव वापरता, तेव्हा तुमचा त्रास खूप कमी होतो. त्या उपचारांमुळे होणारे अपरिहार्य दुष्परिणामही सौम्य असतात. कारण तुम्ही त्या निर्णयामुळे निश्चिंत असता आणि तुमची काळजी घेणारे तुमचे आप्त, जिवलग लोक तुम्हाला मदत करायला तुमच्या आसपास सदैव तत्पर असतात, मग ते कुटुंबीय असो किंवा तुमचे फिजिशियन. यामध्ये अगदी त्या निर्णयाचाही समावेश आहे जेव्हा तुम्हाला आतून, मनापासून सगळ्या उपचारांचा कंटाळा आलेला असतो आणि ही इहलोकीची यात्रा शांतपणे संपवावी असे वाटत असते.

ज्या गोष्टी तुम्हाला करायच्या नाहीत, त्यांना ठामपणे नकार देण्याची क्षमता- सुद्धा अंगी बाणवा. माझा वेळ अमूल्य आहे आणि त्यामुळे मला न आवडणाऱ्या, कराव्याशा न वाटणाऱ्या गोष्टी करण्यात मी माझा वेळ अजिबात व्यर्थ दवडणार नाही. याचा अर्थ काहीच न करता तुम्ही निष्क्रिय, स्वस्थ बसावे असा नाहीतर इतरांना तुम्ही जे काही करावे असे वाटते, ते करण्यात वेळ वाया न घालवता तुम्ही तुमच्या आवडीच्या गोष्टी करण्यामध्ये

व्यस्त व्हाल आणि त्यामध्ये पूर्वीपेक्षा जास्त रमाल. जेव्हाही तुम्ही इतरांसाठी काही कराल तेव्हा ते प्रेमामुळे असेल, कोणत्याही उपकारांच्या ओझ्यामुळे नाही. त्यामुळे याचा तुम्हालाही फायदा होईल आणि त्यांनाही.

मग तुम्ही असे काही नवनवीन उद्योग शोधून काढाल जे तुम्हाला काळाचे भान विसरायला लावतील आणि तुमच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनून जातील. मी याला 'खेळणे' म्हणतो. जर तुम्हाला तुमचे काम आवडत असेल, तर मग ते काम हे काम न राहता खेळ, मनोरंजनाचे साधन बनते. ही सर्वाधिक आनंददायी शारीरिक अवस्था आहे. जेव्हा तुम्हाला वेळेचं भानच राहत नाही तेव्हा तुमचं वय वाढतच नाही, तुम्हाला कशाचा त्रास होत नाही आणि आजारपणही जाणवत नाही. हे मी फक्त तुमची समजूत घालण्यासाठी म्हणत नाही, खरंच म्हणतो आहे. तेव्हा आपल्याला कोणती गोष्ट आवडते ते शोधून काढा. कोणती गोष्ट तुम्हाला काळाचं भान विसरायला लावते? ती शोधा आणि करायला लागा. तुमच्या दिनक्रमामध्ये त्या गोष्टीसाठी वेळ काढा.

तुमच्या दुखण्याचा वापर शारीरिक आणि मानसिक दु:ख, आयुष्याची दिशा ठरविण्यासाठी वापरा. हिरा हा नेहमी कोळशाच्या खाणीतच सापडतो. निराशेने खचून जाऊ नका, तर नवीन गोष्टी शिकून स्वत:चं आयुष्य बदलायला तिचा सकारात्मक वापर करा. माझी पत्नी बॉबी म्हणते त्याप्रमाणे, 'स्वत:ला कधीही अपयशी मानू नका. निदान एक वाईट उदाहरण म्हणून तरी तुमचे नेहमीच वेगळे अस्तित्व असेल.'

उपचारांमध्ये प्रेमाचा वाटा किती मोठा असतो, यावर चर्चा करण्यावर मी अनेकदा वेळ घालवला आहे, जोर दिलेला आहे. परंतु विनोदाचे महत्त्वही कमी नाही. लहान मुलांसारखी निरागस निखळ विनोद बुद्धी हे जिवंत राहण्याचे मोठे साधन आहे. पुढच्या वेळी एखाद्या विनोदावर जेव्हा तुम्ही खळखळून हसाल तेव्हा थोडं स्वत:च्या शरीराकडे लक्ष द्या. त्याला कसं वाटतं आहे? त्याच्या मध्ये कोणत्या हालचाली होत आहेत? हसण्यापूर्वी आणि हसण्यानंतर त्यामध्ये काय बदल झाले? याचं आपलं आपणच निरीक्षण करून बघा. हास्यविनोदाचा तुमच्या न्युरोपेप्टाईड्सवर होणारा परिणाम मोजला गेला आहे. हे जगण्यासाठीचे वर्तन आहे, यामध्ये शंकाच नाही. माझ्या व्याख्यानांच्या आणि कार्यशाळांच्या वेळी माझी पत्नी नेहमी पंधरा-वीस मिनिटांचा एक विनोदी कार्यक्रम करते. तिच्या या विनोदाचा

माझ्या कार्यक्रमात मोठा वाटा आहे. हास्यविनोदामुळे न्युरोपेप्टाईड्स्मध्ये बदल होतात, व्याख्यान देण्यापूर्वीच्या ह्या कार्यक्रमाचा खूपच चांगला परिणाम होतो, असे मला जाणवले आहे. जेव्हा तिचा कार्यक्रम संपतो तेव्हा लोक हलके-फुलके झालेले असतात. त्यांच्या आशा पल्लवीत झालेल्या असतात, विश्वास दुणावलेला असतो. कदाचित बहुतांश वेळा माझ्या तासन्तास चालणाऱ्या व्याख्यानापेक्षा तिच्या काही मिनिटांच्या कार्यक्रमाबद्दल ते अधिक ऋणी असतात.

लहान मुलांच्या नजरेतून जगाकडे बघा, त्यांच्या कानाने ऐका मग तुम्हाला कळेल की जग किती मजेदार आहे! माझ्याकडे अनेक सुंदर-सुंदर कविता येतात. त्यांचा उगम संकटांनंतर झालेला असतो. त्यातल्या काही आनंदाने आणि विनोदाने ओतप्रोत भरलेल्या असतात. मला माहीत आहे, जिवावरच्या दुखण्याशी सामना करून बरे झालेले लोकच अशा कविता करू शकतात.

जीवनाच्या नश्वरतेची जाणीव करून देणाऱ्याही काही कविता असतात. माझी तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की, तुम्ही तुमच्या भावना व्यक्त करण्यासाठी एक डायरी जवळ बाळगा. लिखाण, कविता, चित्रे रंगविणे यातून तुमच्या भावना व्यक्त होऊ द्या. यातून तुमची जगण्याची शक्यता दुणावेल. याची कशी काय मदत होईल? सर्वप्रथम जेव्हा तुम्हाला लिहायचं असेल, चित्र रंगवायची असतील तेव्हा तुम्ही जगाकडे सौंदर्य दृष्टीने बघायला लागता. तसेच तुम्ही तुमच्या भावनांबद्दल अधिक जागरूक होता. कारण आता तुम्हाला त्या भावनांना शब्दांकित करायचे असते. चित्रात चितारायचे असते. त्यामुळे तुम्ही सजगतेने त्यांचे निरीक्षण करता. मग तुम्ही त्या बंद करून ठेवत नाही. मला खात्री आहे, तुमच्या लक्षात येईल की प्रेमाचे, विनोदाचे, हलकेफुलके क्षण आणि भावना विसरणे, हे त्रासदायक अनुभव लक्षात ठेवण्यापेक्षा सोपे असते. रोजच्या रोज येणारे छोटे-छोटे आनंदाचे, हास्याचे क्षण चटकन विस्मृतीत जातात. परंतु त्रास आणि दुःखाची मात्र वारंवार उजळणी केली जाते, असे तुम्हाला जाणवेल.

कृपया स्वत:जवळ एक लिखाणासाठीचे पॅड आणि पेन सतत बाळगा. तुम्ही बघितलेल्या, ऐकलेल्या आणि तुम्हाला भावलेल्या गोष्टींची त्यामध्ये नोंद करत राहा. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ज्या गोष्टींनी तुम्हाला बरे व्हायला मदत केली, त्यांची आवर्जून नोंद करा. 'तुम्ही बदल घडविता' असे

लिहिलेली बटने मी जवळ बाळगतो आणि जो कोणी माझ्याशी स्नेहाने वागतो किंवा माझ्या चेहऱ्यावर हास्य फुलवतो अशा कोणालाही मी ही छोटीशी भेट देतो. जर तुम्ही अनोळखी व्यक्तीशी संवाद साधू शकलात आणि तुमच्या भावना व्यक्त करू शकलात, तर तुम्ही एक विलक्षण उपचारतज्ज्ञ बनू शकाल. लक्षात ठेवा ९०टक्के लोक म्हणतात की, 'जीवन न्याय करीत नाही.' आपणा सगळ्यांनाच काही ना काही त्रास असतो आणि तरीही जीवन नेहमी न्याय्यच असते. आपण सगळेच तक्रारीच्या सुरात बोलत असतो. जीवन अवघड आहे परंतु अन्याय्य नक्कीच नाही. जर तुम्ही तुमच्या त्रासांबद्दल इतरांशी बोललात तर तुमच्या लक्षात येईल की, ते तुमच्यासाठी उपचारकाची, हीलरची भूमिका बजावतात आणि तुम्ही त्यांच्यासाठी! माझ्या एका प्रश्नाला आलेल्या प्रतिसादाने माझ्या हे लक्षात आले, 'कसे आहात तुम्ही?' यावर उत्तर आले, 'खूप निराश आहे, माझी औषधे संपली आहेत आणि माझ्यावर उपचार करणारे डॉक्टर बाहेर गेले आहेत.' यावर ७५ टक्के लोक म्हणतात, 'हो, मी समजू शकतो वा शकते तुम्हाला काय वाटत असेल.' आणि २५ टक्के लोक माझ्याशी इतक्या सहवेदनेनी बोलतात, हलके-फुलके उपाय सुचवितात आणि त्यांच्या बोलण्यात इतके प्रेम आणि काळजी असते की, माझी निराशा ते तिथेच अर्धी अधिक बरी करतात. हे सर्व लोक माझे आप्तच असतात, माझ्या आसपासचे लोक यांना माझा त्रास माहीत असतो, मी काय परिस्थितीतून जात आहे हे माहीत असते आणि मला कशाने बरे वाटेल, तेही त्यांना बरोबर माहीत असते.

मी तुम्हाला मनापासून सांगतो, डायरी लिहा, कविता लिहा किंवा काहीतरी कला जोपासा. एकदा हे करायला लागलात की, तुम्हाला सौंदर्य बघण्यातून, ते शोधण्यातून निर्मितीचा आनंद मिळेल. मग तुम्ही तुमच्या भावना दाबून टाकणार नाही. मग तुम्हाला त्यांचा त्रास होणार नाही. त्या भावना त्रासदायक असल्या तरी. त्रासदायक अनुभव तुम्ही नकळत तुमच्या शरीरात साठवून ठेवता. जे तुमच्यासाठी धोकादायक असते, ते आत दाबून न टाकल्यामुळे त्या जखमा दिसायला लागतात, जाणवायला लागतात आणि मग त्या उकरून काढायला सोपे जाते. छुप्या शत्रूपेक्षा उघड, समोरासमोर लढाई करणाऱ्या शत्रूवर विजय मिळविणे अधिक सोपे असते.


यापुढे जाऊन मी म्हणेन की तुमची कविता लयबद्धच असावी असे नाही किंवा तुमच्या कलाकृतीने कोणता पुरस्कार जिंकणेही अपेक्षित नाही.

**नवं कोरं**

*खवय्येगिरी सांभाळूनही*

*सडपातळ राहण्याचा मंत्र*

# सुडौल राहा




मूळ लेखक - **पुजा मखिजा**

अनुवाद - **सुनिती काणे**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

घटलं... वाढलं. घटलं... वाढलं. घटलं... वाढलं.

वजन घटवू पाहताय? याच चक्रात गोल गोल फिरत राहिलात तर वजन घटेल-वाढेल. प्रमाणबद्ध शरीर राखणं अवघड वाटतं, कारण चक्र गोल गोल फिरत राहतं;

परंतु वाढलेलं वजन हे केवळ एक लक्षण असेल तर? फक्त आपण कसा आहार घेतो याचंच नव्हे, तर आहाराकडे आपण कोणत्या दृष्टीनं पाहतो, याचंही ते लक्षण असेल तर? वाढलेलं वजन हे फक्त आपण अन्न कसं शिजवतो याचंच लक्षण नसून, आपण अन्नाशी कसं वागतो, याचंसुद्धा लक्षण असेल तर?

विचार करा... विचार करा... विचार करा...

स्वत:च्या प्रतिमेचे मोजमाप करून अपराधी भावनेला जन्म देण्यासाठी किंवा खतपाणी घालण्यासाठी हे करायचे नाहीतर तुमच्यातील सर्जनशीलतेला पंख देण्याचा हा खटाटोप आहे. टॅलमंड म्हणतात, 'तुमच्या दु:खाचा, पीडेचा आनंद घ्या आणि तुम्ही जगाचे तारणहार बनाल.' दु:खी, पीडितांच्या विनोदांमध्ये, कवितांमध्ये मला ही क्षमता, ही ताकद दिसते.

बायबलमध्ये सांगितले आहे : 'आपण ह्या धरतीवर सेवा करून घेण्यासाठी आलेलो नाहीतर सेवा करण्यासाठी आलो आहोत. तेव्हा स्वत:ची सर्जनात्मक बाजू शोधा आणि त्यातून सेवेचा स्वत:चा मार्ग विकसित करा.'

'पीस, लव्ह अँड हीलिंग'च्या प्रारंभी मी माझा लँडस्केपर मित्र जॉन फ्लोरिओचा उल्लेख केला होता. पोटाच्या कार्सिनोमाचे (कर्करोगाचा प्रकार) निदान झाल्यावर कोणतेही उपचार घेण्यास जॉनने ठाम नकार दिला. त्याचा शल्यविशारद या नात्याने त्याच्या पोटातून तो कार्सिनोमा पूर्णपणे काढण्यास मी असमर्थ होतो. मी या पुस्तकाचा परिचय लिहीत असताना वयाच्या नव्वदीमध्ये कर्करोगाच्या कोणत्याही खाणाखुणांशिवाय जॉनचा मृत्यू झाला.

मी तुमच्यासाठी जे प्रश्न उभे केले आहेत, त्यांची उत्तरे देऊन तुम्ही स्वत:च स्वत:ची उत्तरे शोधू शकाल आणि एक अर्थपूर्ण, तृप्त जीवन जगू शकाल. तुम्ही किती वर्षे जगलात याला काहीच महत्त्व नाही, पण तुम्ही कसे जगलात हे नक्कीच महत्त्वाचे आहे. तुम्ही प्रेम आणि आस्थेबद्दल शिकाल आणि उत्तम निवारक बनून इतरांवरही उपचार करायला लागाल. जेव्हा तुम्ही आजारांशी झुंजून दमून जाल तेव्हा हे शरीर सोडायला तुम्हाला त्रास होणार नाही. त्यासाठी इतरांची परवानगी घेण्याची गरज पडणार नाही किंवा सुटकेसाठी आत्महत्या करायला मदतही मागावी लागणार नाही.

विचार करा, स्वत:ला मारणे खरेच अवघड आहे का? अजिबात नाही! स्वत:च्या जीवनशैलीने अनेक लोक हे रोजच करीत आहेत. माझ्या कुटुंबामध्ये आणि माझ्या जवळच्या लोकांमध्ये मी हे बघितले आहे की, जेव्हा तुम्ही एक तृप्त आयुष्य जगलेले असता तेव्हा तुमचे शरीर तुमच्यासाठी एक ओझे बनायला लागते आणि मग तुम्ही ते शांतपणे सोडून मुक्त होता. कारण मग तेव्हा डॉक्टर मध्ये लुडबुड करीत नाहीत आणि तुमचे आप्त, नातलगही तुम्हाला अपराधी भावना देत नाहीत; शांतपणे निरोप देतात! शांत मृत्यू ही निरोगी किंवा आजारातून बऱ्या झालेल्या जीवनाची खरी, अर्थपूर्ण भेट आहे.

असे निरोगी जीवन तुम्ही कसे मिळवाल? मानसशास्त्रज्ञ निकोलस

हॉलच्या कामामध्ये असे दिसून आले आहे की, अभिनेता आणि अभिनेत्री जेव्हा अभिनय करीत असतात तेव्हा त्यांच्या रक्ताचे नमुने जर घेतले, तर त्या चाचणीमध्ये ते करीत असलेल्या भूमिकेमुळे बदल घडतो. विनोद आणि आनंद शरीरातील रोगप्रतिकारक कार्य वाढवितात आणि तणावाशी निगडित अंतस्त्रावांचा स्तर कमी करतात. याउलट जेव्हा निराशा आणि दुःखाचा अभ्यास केला तेव्हा विरुद्ध परिणाम जाणवला. लक्षात ठेवा, आपण सगळेच या जीवनाच्या रंगभूमीवर अभिनय करीत आहोत आणि आपल्या भूमिकांचा वारंवार सराव करीत आहोत. जीवन असंच आहे. एक छानसा सराव. तुम्हाला जसे बनायचे आहे तसे बनण्याची सतत संधी देणारा अखंड सराव! आपल्या नश्वरतेच्या जाणिवेचा अग्नी पेटता ठेवा, तरच तुमचा आत्मा कायम जागरूक राहील, तरच तुमची विनोदबुद्धी शाबूत राहील. जीवनाच्या नशेने उन्मत्त बना, आजाराच्या गुंगीने निष्क्रिय बनू नका! आपल्यातील खऱ्या भावना धगधगत्या ठेवा. हा बदल तुम्ही कसा घडवून आणाल? तुम्हाला जसे जीवन हवे आहे, त्याचा आराखडा लिहून काढा. त्यानंतर त्याप्रकारचे जीवन जगण्यासाठी तुम्हाला मदत करतील अशी आदर्श व्यक्ती, रोल मॉडेल शोधा. ही भूमिका पार पाडायला कोण तुम्हाला चांगले दिग्दर्शन करू शकेल? जीवनाचा हा खेळ समरसून खेळायला कोण योग्य प्रशिक्षण देऊ शकेल? सचिन तेंडुलकरला जसे रमाकांत आचरेकरसर भेटले तसे तुम्हाला कोण घडवू शकेल? प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूपेक्षा तुम्ही वेगळे नाही. अभिनयाचे धडे गिरविणाऱ्या नवोदित कलाकारापेक्षा तुमची भूमिका वेगळी नाही. एए म्हणतात, 'फेक इट टील यु मेक इट' म्हणजे 'हवे तसे घडेपर्यंत तसे घडल्याचे नाटक करा.' हे लोकांना फसविण्यासाठी नाहीतर तुमच्याच नवीन जीवनाचा हा सराव आहे.

तुम्हाला तुम्ही जशी व्यक्ती असावे असे वाटते, तशी व्यक्ती तुम्ही आहातच, अशाच थाटात जगायला, वागायला, अभिनय करायला सुरुवात करा. तुम्हाला जे योग्य वाटते, जे खरे असावे असे वाटते तसे करायला लागलात की, तुमच्या जीवनाला एक लय येते, एक रंगत येते, जीवनाचा सूर गवसतो. काहींना मौजमस्ती करताना ही भावना येते, तर काहींना शहराच्या गजबजाटात हा अनुभव मिळतो, तर काही जणांना निसर्गातील गूढशांतता भावते. मला माहीत आहे याचा उपयोग होतो. कारण मला हा सल्ला फार पूर्वी माझ्या मानववंशशास्त्रज्ञ (ॲन्थ्रोपॉलॉजिस्ट) मित्राने, ॲशली माँटगूने दिला

होता. जेव्हा मी त्याला विचारलं, 'मी आणखी प्रेमळ मनुष्य कसा बनू शकतो?' तेव्हा तो म्हणाला, 'तू अधिक प्रेमळ आहेसच असे वागायला सुरुवात कर.' मग मी खरंच तसं वागायला सुरुवात केली. जेव्हा मी लोकांना भेटायचो तेव्हा मी क्षणभर विचार करायचो की, जर मी ह्या व्यक्तीवर प्रेम करीत असतो, तर मी त्याच्याशी कसे वागलो असतो? आणि मग मी तसे वागायला सुरुवात केली आणि ते माझ्या अंगी भिनत गेलं. मी अजूनही त्याचा सराव करतोच आहे. जीवनाच्या रंगभूमीवरील कोणतीच भूमिका सहज आणि सोपी नाही. यातील संवाद अवघड आहेत, अभिनयसुद्धा कठीण आहे.


तुमच्या लक्षात येईल की संकटे, समस्या या जीवनाचाच एक भाग आहेत, पण म्हणून तुम्ही अंधारात चाचपडत राहण्याची गरज नाही. संकटे बागेतल्या खतासारखे काम करू शकतात. ती तुमच्या जीवनाला फुलायला, वाढायला, बहरायला मदत करतात किंवा जसे आमचा मुलगा जेफ्री म्हणाला, 'होली शीट!' मला वाटतं, हे शब्द जीवनाचं खूप अचूक वर्णन करतात. हे मला तेव्हा जाणवलं, जेव्हा माझी शिडी तुटली आणि मी आमच्या घराच्या छतावरून पडलो. जेव्हा 'ओ शीट!'ने देवदूतासारखे काम केले. कारण खाली पडताना फक्त तेच शब्द माझ्या तोंडून निघाले आणि माझा जीव वाचला. माझं डोकं थोडंसं आपटलं; पण जीव वाचला. त्या देवदूताला बहुधा वाटलं की, मला तेवढी तरी शिक्षा झालीच पाहिजे. आपल्या अवघड काळामध्ये असे अनेक देवदूत आपल्या मदतीसाठी आपल्या सभोवती फिरत असतात. धर्मगुरू रॉबर्ट स्कलर म्हणतात तसे, 'कठीण काळ टिकून राहत नाही, पण कठीण लोक मात्र टिकून राहतात.'

आकडेवारीने भविष्य ठरविता येत नाही; ते व्यक्तींनी, माणसांनी ठरविले जाते. तेव्हा रंगमंचावर चढा आणि आपली भूमिका समरसून पार पाडा. जागे होण्यासाठी डोके आपटण्याची वाट बघू नका तसेच टाळ्यांचा कडकडाट झाला नाही, तरीसुद्धा निराश होऊ नका. जोपर्यंत तुमची भूमिका पूर्णपणे वठत नाही तोपर्यंत सराव करत राहा.

जरी संशोधनाद्वारे हे सिद्ध झाले असले तरी मानसिक मध्यस्थीबद्दल डॉक्टरांनी त्यांच्या प्रिस्क्रिप्शनमध्ये लिहून द्यायला अजून सुरुवात झालेली नाही आणि तशी शक्यताही धूसर आहे. अजूनही डॉक्टरांना औषधांची प्रिस्क्रिप्शन लिहून देणंच बरं वाटतं. तो 'त्यांचा' दृष्टिकोन, त्यांची समस्या आहे. त्यामुळे तुमची जगण्याची शक्यता कमी होऊ देऊ नका. जर तुम्ही

**नवं कोरं**

*पाठदुखीविषयीची शास्त्रीय*
*माहिती वेधक स्वरूपात*




# चिकन सूप फॉर द सोल बॅकपेन

मूळ लेखक - **जोनाथन ग्रीर**
**जॅक कॅनफिल्ड**
**मार्क व्हिक्टर हॅन्सन**

अनुवाद - **डॉ. वसु भारद्वाज**

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'चिकन सूप फॉर द सोल' ही पुस्तकांची मालिका उत्तमोत्तम डॉक्टरांच्या मदतीनं तुम्हाला फक्त वैद्यकीय माहितीच देते असं नाही, तर प्रेरणा पण देते.

प्रत्येक आरोग्यविषयक माहिती देणाऱ्या पुस्तकात त्या आजारांनी त्रासलेल्या रुग्णांच्या आणि त्यांची काळजी घेणाऱ्या नातेवाइकांनी सांगितलेल्या प्रेरणादायी कथा आहेत. त्याखेरीज आहार, जीवनशैलीची निवड, योग्य पद्धती, भावनिक संबंध, नातेसंबंध आणि पर्यायी उपचार पद्धतीवर चर्चा करण्यात आली आहे.

माझा ई-मेल वाचलात तर मी तुम्हाला काय सांगायचा प्रयत्न करीत आहे, याबद्दल तुमच्या मनात शंका येणार नाही.

आपलं सरकार माझ्या स्वस्त, साध्या संदेशांमुळे हळूहळू जागं होत आहे. कृपया निरोगी होण्यासाठीच्या सगळ्या उपायांचा, प्रकारांचा आपल्या जीवनामध्ये पुरेपूर वापर करा. आपल्या सरकारला तुमच्या आरोग्याच्या किंवा वैद्यकीय योजनेला, विमा योजनेला आणि डॉक्टरांना त्याची जाणीव होऊ दे. तुम्ही तुमचे प्रयत्न चालू ठेवा.

परंतु 'मृत्यू टाळण्यासाठी' माझा सल्ला पाळू नका, तर 'जीवनाचा आनंद घेण्यासाठी', जीवनाचा उत्सव साजरा करण्यासाठी त्याचा वापर करा. स्वर्गात गेल्यावर मृत्यू टाळण्यासाठी तुम्ही केलेल्या उपचारांचा, प्रयत्नांचा राग शांत करण्यासाठी तुम्हाला परत उपचार घेण्याची गरज भासायला नको. नाहीतर तिथे तुम्हाला तुमचे मन खात राहील की निरोगी राहण्यासाठी तुम्ही जे व्यायाम, ध्यानधारणा केली, शाकाहारी बनण्याचा जो प्रयत्न केलात, त्या प्रयत्नात तुम्ही त्या कृतींमधला आनंद गमावून बसलात. व्यायाम करताना केवळ सुदृढराहण्याचे उद्दिष्ट ठेवलेत आणि त्या नादात व्यायामाच्या लयीचा आनंद घ्यायला विसरलात.

ध्यानधारणेच्या वेळी श्वासोच्छ्वासाचे सूर तुम्ही ऐकलेच नाही. शाकाहारी बनण्याच्या प्रयत्नामध्ये निसर्गाने भाज्यांमध्ये केलेली रंगांची उधळण डोळे भरून बघायचे राहूनच गेले. सगळ्या कृती केल्या पण त्यातला आनंदच उपभोगला नाही! 'प्रारंभ' या शब्दाशी निगडित सर्व गोष्टी मी आता थांबवितो. माझ्या सांगण्याचा मुद्दा हाच आहे की तुम्ही माझ्याकडून, माझ्या लिखाणातून जे काही शिकला आहात त्याचा आता वापर करा. त्याची आत्ताच अंमलबजावणी करा. 'स्वत:च्याच' नव्या आविष्काराचा हा प्रारंभ आहे. तुमच्याकडे असलेल्या, तुम्ही वाचलेल्या मार्गदर्शक पुस्तकातील शहाणपणाच्या गोष्टींचा वापर करणे चालू ठेवा. ही तुमची स्वत:ला जागरूक करण्याची, शिक्षित करण्याची अव्याहत प्रक्रिया आहे.

शांतता, प्रेम आणि निरोगी जीवन अनुभवायला सुरुवात करा, ते सुद्धा आज आणि आत्ताच!


**– बर्नी एस. सिगल**
एम.डी.

❖

नवं कोरं

*शेअर बाजारातील गुंतागुंत*
*सहज सोप्या शब्दांत*

# वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र




लेखक - **अतुल कहाते**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

वॉरन बफे या जगातल्या सर्वश्रेष्ठ गुंतवणूकदाराविषयी सगळ्यांच्याच मनात खूप कुतूहल आहे. लौकिक अर्थानं कुठलीही नोकरी किंवा कुठलाही व्यवसाय न करता न्याय्य मार्गानं अब्जाधीश होण्याची जादुई किमया बफेनं करून दाखवलेली असल्यामुळे, प्रत्येक माणसाला त्याच्याकडून खूप काही शिकण्यासारखं आहे. घरबसल्या गुंतवणूक करून कमाई करण्याची आशा बाळगणाऱ्या माणसापासून निरनिराळ्या व्यावसायिक-नोकरदारांपर्यंत प्रत्येकाला बफेच्या विलक्षण बुद्धिमत्तेची आणि जगावेगळ्या दृष्टिकोनाची ओळख करून देण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

वॉरन बफेच्या गाजलेल्या पन्नास विधानांची सोप्या भाषेत ओळख करून देण्याचा हा प्रयत्न मराठी वाचकांना निश्चितच आवडेल.



# स्मरण

# पु. शि. रेगे

कमनीय बांध्याची अत्यंत सुंदर स्त्री, तिचे तिलाच न पेलवणारे उभार तारुण्य, चेहऱ्यावर तीक्ष्ण बुद्धीची तेजभारली चमक, पुरुषी सहवासासाठी आसुसली लडिवाळ नजर, शृंगारोत्सुक मादक वृत्ती, जणू संगमोत्सुक सखोल डोह... ही काव्यात्मकता शब्द माध्यमातून अत्यंत तरल पातळीवर प्रगट करणारी, प्रेमभारली शृंगारकविता हाच तर पु. शि. रेगे ह्यांच्या एकूणच कवितेचा प्राण होता. सौंदर्यानुभव तरल मनाला सदैव बेचैन करून सोडतो, ह्याचे मराठी कविताविश्वातले सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पु. शि. रेगे ह्यांच्या अल्पाक्षरी कविता. सौंदर्याच्या ठिकाणी असे काही विलक्षण सामर्थ्य असते की, सुखानुभवाचा उत्कट क्षण प्रत्यक्ष भोगत असताना, मनाला एक प्रकारची हुरहूर निर्माण करणारी सुखद अस्वस्थता त्या कलाकृतीत सळसळत असते. सौंदर्याचे ते प्रधान कार्यच आहे, याची अनुभूती देणारी पु. शि. रेगे ह्यांची एकूणच कविता, त्यांनी शृंगारोत्सुक शब्दांमधून उभे केलेले त्यांचे अप्रतिम कविताविश्व, हा मराठी कवितेतला उत्कर्षबिंदू आहे.

पु. शि. रेगे ह्यांनी घडविलेले स्त्रीसौंदर्याचे आणि मादक अनुभवाचे विविधस्वरूपी दर्शन आपल्या मनाला क्षणभर का होईना, परंतु बेचैन करून टाकते. मन काही काळ का होईना, अस्वस्थ करून टाकते. स्त्रीसान्निध्यात, स्त्रीसहवासात, स्त्रीप्रेमात, एकूणच स्त्री-पुरुष आकर्षणात जो एक मन आकर्षून घेणारा, अंतर्मनात गोडगोडुल्या, बीजभारल्या लहरी

उत्पन्न करणारा अतिउत्कट भाग असतो, तो विलक्षण अनुभव रेग्यांची कविता देते.

क्षण पुढचा पुढचा
मला सेंवु द्या...
जीवन सारें
खुशाल तुम्ही घ्या... (दोला)

स्त्रीसौंदर्याच्या आणि तिच्या शृंगाररसात बुडून जाण्याच्या तिच्या काव्यभारल्या वृत्तीच्या तरल खुणा पु. शि. रेगे ह्यांनी आपल्या अल्पाक्षरी, छोट्या छोट्या कवितेतून प्रामाणिकपणे प्रगट केलेल्या आहेत. अत्यंत निरोगी असे संवेदनशील मन, ह्या कवितांमधून फुलातल्या मोहमयी गंधासारखं उमलून आलेलं आहे. शब्दांशी रतिक्रिडा खेळणारा हा श्रेष्ठ कवी चुकूनसुद्धा प्रणयाच्या उच्छृंखल वाटेवरून गेला नाही. प्रत्येक जीवाला हवाहवासा वाटणारा शृंगारच पु. शि. रेगे ह्यांनी आपल्या समग्र कवितेतून सहजपणे प्रगट केला.

पु. शि. रेगे ह्यांनी मुक्तछंद मनापासून जोपासला. तरल भावविश्वाचे भरजरी शब्दवैभव, ह्या शब्दांमधली गर्भश्रीमंती रेग्यांनी जेवढी प्राणपणाने जोपासली, तेवढी श्रीमंती इतर कवींच्या कवितांमधून, क्वचितच दर्शन देते. शृंगाराचे अनोखे प्रकटीकरण जेवढे आणि जसे रेग्यांच्या कविताविश्वाला पेलवले, तसे आणि तेवढे मराठी काव्यविश्वात फारच थोड्या कवींना रेग्यांनंतर पेलवले, हे सत्य कधीच नाकारता येणार नाही.

रतिसुखाचा सौंदर्यानुभव रेगे व्यक्त करतात, आपला भावानुभव, अर्धस्फुट सौंदर्य सौंदर्यानुभूतीतून रेगे देतात. १९५०मध्ये प्रकाशित झालेला पु. शि. रेगे ह्यांचा ‘दोला’ हा कवितासंग्रह त्याच्या काव्यायुष्यातला सर्वोत्तम संग्रह आहे. बटमोगरीतल्या पाकळ्या गंध उधळीत एकमेकांना गाढआलिंगन देतात, तसाच अनुभव रेग्यांच्या ह्या छोट्या छोट्या शृंगाररसात गच्च भिजलेल्या कविता देतात. काव्याचा उत्कट, आनंद, चित्त वेधून घेण्याची विलक्षण क्षमता त्यांच्या ह्या छोट्या कवितांमध्ये ठासून भरलेली आहे. अर्थात त्या कवितांमध्ये जो शृगांरभारला स्त्री-पुरुष संबंधामधला जो विलक्षण असा नातेसंबंधांचा गोफ आहे, तो आपल्याला रसिकतेने गुंफता येणे अत्यंत आवश्यक आहे.

१९७० साली मडगाव मुक्कामी असतांना त्यांनी 'वेगळे' नावाची एक छोटी कविता लिहिली होती...

वेगळें पहायचें तर वेगळें झालें पाहिजे
सगळें करायचें तर सगळें झालें पाहिजे
झाड व्हायचें तर आपण वाढले पाहिजे
मोती व्हायचें तर कुंठलें पाहिजे... (अनीह)

पु. शि. रेगे ह्यांच्या कवितांचे प्रधान वैशिष्ट्य काय तर, त्या कवितांमध्ये प्रगट झालेले उत्कट भावविश्व कवीच्या भावानुभवांशी प्रामाणिकपणे भिडणारे आहे. प्रामाणिक आहे. १९७०मध्ये प्रगट झालेल्या ह्या कवितेतले मानसशास्त्रीय विश्लेषण हे त्यांच्याच 'सावित्री'ह्या अति उत्कट काव्यभारल्या कादंबरीतल्या सावित्रीने लिहिलेल्या पत्रातल्या एका वाक्याशी निगडित आहे. सावित्री म्हणते, 'मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं ते ते आपणच व्हायचं.' त्याच चालीवर म्हणायचे झाले तर, पु. शि. रेगे ह्यांच्या कवितांमधली उत्कटता प्रत्यक्ष अनुभवायची असेल तर आपणच ती कविता होऊन, त्यातला रतिभाव प्रत्यक्षपणे मानसिक पातळीवर अनुभवणं अत्यंत आवश्यक आहे. पु. शि. रेगे ह्यांची १९६०च्या दरम्यान प्रसिद्ध झालेली 'सावित्री' ही पिटुकली कादंबरी हे एक अतिउत्कट गद्यकाव्यच आहे आणि रेग्यांच्या कवितांमधील स्त्रीभावनेतील कोवळीक समजून घेण्यासाठी आपणच 'सावित्री' व्हावे लागते.

पु. शि. रेगे ह्यांचा कालखंड आहे, २ ऑगस्ट १९१० ते १७ फेब्रुवारी १९७८. त्यांनी विपुल लेखन केले. त्यांच्या नावावर अकरा कवितासंग्रह, चार कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, सहा नाटके आहेत. १९६९ साली वर्धा येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात रेगे यांनी एक अत्यंत महत्त्वाचा रसिकत्वाचा विचार मांडला होता की, 'भवार्थदीपिकेत' ज्ञानदेव नसतात, आपणच असतो. वेगळे झालेले आपण असतो. 'हॅम्लेट'मध्ये शेक्सपियर नसतो, आपल्या स्वत:च्याच गूढप्रेरणा जागत असतात. खरा आत्माविष्कार तो हा. आत्माविष्कार म्हणजे केवळ स्वत:च्या भावनांचा किंवा जाणिवांचा आविष्कार, नव्हे. जेथे 'स्व' नाही

आणि तरीही तो ‘स्व’ आहे, आणि जेथे ‘स्व’ आहे आणि तरीही तो नाही, अशा आलौकिक पातळीवर हा साहित्यातील आत्माविष्कार होत असतो.

रेगे ह्यांची साहित्यविषयक जी भूमिका आहे, ही आपण जर आत्मसात केली तर त्यांच्या कवितांमधील कोवळी आणि ताजी टवटवीत शृंगारभावना आपल्या आकलनाचा विषय होते. ‘बालमित्र’ नावाच्या हस्तलिखित मासिकातून रेग्यांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली होती. पुढे पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘शालापत्रका’त त्यांच्या कथा-कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. लहान वयात उमलून आलेली ही काव्यवेल पुढे हळूहळू बहरू लागली. ह्याच वयात त्यांनी तीन-चार नाटकेसुद्धा लिहिली होती. त्याच वयात, विल्सन हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांना इंग्रजी कवितेची गोडी लागली. १९५० साल हे रेगे ह्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. ‘मनू’ ही त्यांची एक अतिउत्कट कथा ‘रूपकथ्थक’ ह्या त्यांच्या टोपण नावाने प्रसिद्ध झाली. रेगे ह्यांचे नाव साहित्यविश्वात पौर्णिमेच्या चंद्रासारखे शांत-शीतल स्वरूपात चमकू लागले. त्याच वर्षी त्यांचा ‘दोला’ हा कवितासंग्रहसुद्धा प्रसिद्ध झाला. वास्तविक १९३१ साली वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांचा ‘साधना’ हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्याच्या पाठोपाठ ‘फुलोरा’ (१९३७), ‘हिमसेक’ (१९४३) प्रसिद्ध झाले; परंतु १९५० साली ‘दोला’ प्रसिद्ध झाला आणि पु. शि. रेगे हे नाव खऱ्या अर्थाने नावारूपाला आले. १९५४ साली त्यांनी वाङ्मयीन जाणिवांना वाहिलेले ‘छंद’ हे मासिक सुरू केले. मराठी वाङ्मय क्षेत्रात ‘छंद’ने जणू एक आश्चर्यपर्वच सुरू केले. शेवटच्या श्वासापर्यंत रेगे लिहितच होते.

विसाव्या शतकातले जे श्रेष्ठ कवी होते त्यात पु. शि. रेगे हे नाव काहीसे अनोखे होते. एवढे तरल भावविश्व निर्माण करणारा, ‘सावित्री’ सारखी श्रेष्ठ अजरामर कादंबरी लिहिणारा, भाषावैभवाचे सर्वोच्च शिखर पादाक्रांत करणारा साहित्यिक शतकात एखादाच जन्माला येतो, हे मात्र निश्चित

**– वामन देशपांडे**

**डोंबिवली (पूर्व)**

**९३२४६१५०७७**

# श्रद्धांजली

**☼ रूप करनानी यांचे निधन**

ज्येष्ठ माजी पत्रकार व 'इन्स्पिरेशन्स पीआर' या जनसंपर्क संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक रूप करनानी (वय ६२) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी  उषा, मुलगी प्रेरणा असा परिवार आहे. रूप करनानी यांनी 'बिझनेस इंडिया' या नियतकालिकात आणि त्यानंतर 'बिझनेस टुडे' या नियतकालिकाचे सहाय्यक संपादक म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी 'इन्स्पिरेशन्स पीआर' ही जनसंपर्क संस्था स्थापन केली. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले होते. त्यात 'इंडिया ट्रॅव्हल ॲवॉर्ड फॉर बेस्ट कम्युनिकेटर', 'रोटरी ॲवॉर्ड फॉर लाइफटाइम ॲचिव्हमेंट', पीआर कौन्सिल ऑफ इंडियाचा 'चाणक्य पुरस्कार' यांचा समावेश आहे. फिरोदिया समूहाचे संस्थापक एच. के. फिरोदिया यांचे चरित्र त्यांनी लिहिले आहे.

**☼ बुकर विजेते समीक्षक जॉन बर्जर यांचे निधन**

लेखन क्षेत्रातील प्रतिष्ठेचे बुकर पारितोषिक विजेते इंग्रजी लेखक, कादंबरीकार आणि प्रसिद्ध कला समीक्षक जॉन बर्जर यांचे वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले.

मार्क्सवादी विचारांच्या बर्जर यांची प्राणज्योत राहत्या घरी मालवली. १९७२ मध्ये त्यांना 'जी' या कादंबरीसाठी बुकर पारितोषिक देण्यात आले. बर्जर यांनी पारितोषिक म्हणून मिळालेल्या रकमेपैकी निम्म्यापेक्षा अधिक रक्कम आफ्रिकन-अमेरिकन चळवळीत अग्रेसर असलेल्या ब्लॅक पँथर्सला दिली आहे.बीबीसीवरील नवा राजकीय

दृष्टिकोन मांडणाऱ्या त्यांची 'वेज ऑफ सीइंग' ही मालिका खूप प्रसिद्ध झाली होती. त्यांचे पुत्र चित्रपट निर्माते जेकब यांनी बर्जर यांच्या निधनाची बातमी दिली. 'वडिलांच्या निधनाचे दुःख असले तरी त्यांनी दिलेला वारसा आमच्यासाठी मौल्यवान आहे,' असे जेकब म्हणाले. बर्जर यांचे दिग्दर्शक मित्र सायमन मॅकबर्न यांनीही त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. बर्जर हे मार्गदर्शक, तत्त्वज्ञ आणि मित्र असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. उत्तर लंडनमध्ये हॅकनी येथे जन्मलेल्या बर्जर यांनी कारकिर्दीची सुरुवात रंगकामाने केली होती. त्यानंतर त्यांनी लेखन क्षेत्रात पाऊल ठेवले. कविता, नाटके, छायाचित्रांवरील लिखाण, निर्वासितांची पिळवणूक आणि पॅलेस्टिनी नागरिकांची पिळवणूक यावर केलेल्या त्यांच्या लिखाणाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली.

कलाकार डेव्हिड शिंगर्ले यांनी, 'बर्जर सर्वोत्तम नाट्यलेखक होते. त्यांच्यामुळे जगभरातील लोकांना प्रेरणा मिळायची,' असे म्हटले आहे. ब्रिटिश कवी अँथनी अॅनाक्सागोरोऊ यांनीही ट्विटरवरून बर्जर यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### ☼ डॉ. जोत्स्ना कार्येकर यांचे मुंबईत निधन

मराठी प्रायोगिक व व्यावसायिक नाटक, जाहिरात, मालिका आणि चित्रपटांतून अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री डॉ. ज्योत्स्ना कार्येकर (वय ८२) यांचे ३१ डिसेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे अभिनेता यतीन कार्येकर यांच्यासह डॉ. प्रफुल्ल व डॉ. चेतन हे मुलगे आहेत.

❖




# अभिप्राय

# वाचकाची प्रतिक्रिया

**माननीय संपादक,**

*डिसेंबरचा 'मेहता ग्रंथ जगत'चा आनंद यादव विशेषांक वाचायला मिळाला. खरंतर प्रथमच तुमच्या अंकाकडे माझे विशेष लक्ष गेले. यात यादवांच्या लिखाणाबद्दलची आस्था होतीच; पण ज्या पद्धतीने या अंकाची मांडणी केली आहे, त्याचे कौतुक वाटले.*

*सर्वांना यादव निव्वळ 'झोंबीकार' वाटतात; पण यादव इतके उमदे कवी होते, याची ओळख तुमच्या अंकाने करून दिली. यादवांच्या प्रगल्भ कविता अंकात समाविष्ट केल्याबद्दल तुमचे अपार कौतुक वाटले. अशी मांडणी करायला चांगली साहित्यिक नजर हवी, जी अंकात पदोपदी जाणवली. अतुल कुलकर्णीसारख्या अभिनेत्यानेही यादवांना वाहिलेली श्रद्धांजली भावली. 'मेहता ग्रंथ जगत'ने यादवांना अतिशय मनःपूर्वक श्रद्धांजली वाहिली आहे. यादवांचे लिखाण आमच्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान आहे.*





**– जाधव मोना**

**नवं कोरं**

# चिकन सूप फॉर द सोल टू लव्ह

भाग १ व भाग २




मूळ लेखक - **जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, ॲमी न्यूमार्क**

अनुवाद - **उषा महाजन**

**प्रत्येकी किंमत : २४०/-रु. । प्रत्येकी पोस्टेज : ५०/-रु.**

डेटिंग, रोमान्स, लग्नाची मागणी आणि विवाह व वैवाहिक जीवनातलं चैतन्य टिकवण्याबद्दलच्या मनाला भावणाऱ्या व निर्भेळ आनंद देणाऱ्या अशा कथांचं हे पुस्तक वाचायला घेतल्यावर तुम्ही खाली ठेवूच शकणार नाही. उदाहरणादाखल त्यातील काही कथांचा अंश. धर्मप्रचारक म्हणून काम करणाऱ्यानं ब्रह्मचर्य पाळण्याची शपथ कधीच घेतली नाही आणि मनातल्या मनात प्रेम करणाऱ्या मुलीशी अखेर त्यानं लग्न केलं. पतीवर्गासाठी खास सूचनापत्रक – एक अत्यंत विनोदी सल्ला. डेटिंग करत असलेला तिचा मित्र तिच्यासमोर आला की, त्याची दातखीळच बसत असल्यामुळे तिला तो मतिमंद असल्याची शंका आली होती. शाळेतल्या देखण्या शिक्षकाशी लग्न करण्याचं स्वप्न बघणाऱ्या मुलीनं, अनेक वर्षांनंतर त्याच शिक्षकाची अवचित भेट घडल्यावर त्याच्याशीच लग्न केलं. एका छोट्या मुलीचे पालक ती शाळेत गेल्यावर दोघं मिळून त्यांचा 'खास वेळ' बाहेर जाऊन, नाश्ता करून, सकाळचा सिनेमा बघण्याच्या स्पेशल डेटचा आनंद लुटत असतात. बेशुद्धावस्थेत मृत्युशय्येवर खिळलेला तो. पत्नीसाठी म्हणून आणून दिलेल्या आणि त्याच्यासाठी शेवटचं ठरणाऱ्या व्हॅलेंटाइन कार्डावर सही करण्यासाठी म्हणून शुद्धीवर येतो. सही करून मरण पावतो. लग्नाच्या बाविसाव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ पती आपल्या पत्नीसाठी बावीस कविता रचतो...



# मी झारा गहरमानी : एक देशद्रोही


'माय लाईफ ॲज ट्रेटर' ही कथा आहे झारा गहरमानी या सामान्य मुलीची. कैदेच्या अंधारात लुप्त झाल्यापासून तिथून पुन्हा स्वातंत्र्यकडे केलेल्या तिच्या निरातिशय धीट प्रवासाची. सदर विदारक प्रवास पूर्णत्वाला नेताना झाला स्वत:मधील सामर्थ्याबद्दल अनभिज्ञ होती; पण परिस्थितीनुरूप तिला आपल्यातलं ते सामर्थ्य जागृत करून त्याचा योग्य तो वापर करावा लागला. झारानं हे सगळं नेमकं कसं साधलं आणि एका सामान्य मुलीपासून ती एका धैर्यवान, करारी कार्यकर्तीमध्ये कशी रूपांतरित झाली, याची ही प्रेरणादायक कथा आहे.

झारा गहरमानी यांनी स्वत:च लिहिलेल्या या पुस्तकाचा अनुवाद रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांनी केला आहे या पुस्तकाबद्दल फिरूझेह दुमास या लेखिका म्हणतात की, वाचकाला अंतर्मुख करणारी अशी ही कथा आहे. इराणमधील राजकीय व सामाजिक गुंतागुंत समजून घेण्यात रस असलेल्या वाचकांनी एकदा तरी जरूर वाचावं असं हे पुस्तक आहे. तर लुई ब्राऊन म्हणतात की, झारा गहरमानीचे लिहिलेलं 'माय लाईफ ॲज अ ट्रेटर' हे पुस्तक जितकं प्रेरणादायी आहे, तितकंच बिथरून टाकणारंसुद्धा आहे. तारुण्यसुलभ आदर्शवाद आणि धर्मांधांची दुराग्रही मतप्रणाली या दोहोंमधील क्लेश झाल्यावर उद्भवणाऱ्या भयावह परिस्थितीचं लेखिकेनं केलेलं नेमकं चित्रण, वाचकाला मुळापासून हादरवून सोडतं. मात्र, घोर हिंसेच्या भीतिदायक छायेत वावरताना आपल्यात जागृत ठेवलेल्या मनोबलाचं झाराने जे चित्रण केलेलं आहे,

ते निव्वळ विलक्षण होय. कमालीच्या नकारात्मक परिस्थितीमधूनही सौंदर्य व स्वातंत्र्याची ज्योत कशी तेवत ठेवता येते, याची ही कथा एक उत्तम उदाहरण आहे. इराणच्या कुख्यात एव्हिन तुरुंगामध्ये व्यतीत केलेल्या काळ्याकुट्ट दिवसांचं विदारक चित्रण करणारी झारा गहरमानीची ही कथा प्रतिकूल परिस्थितीमध्येसुद्धा एका तरुण, आशावादी मुलीच्या हृदयात जागृत राहणाऱ्या स्वातंत्र्य व जीवनलालसेचं उत्कृष्ट रेखाटन आहे, असेही ब्राऊन लिहितात आणि जेनाईन दी जियोवानी या लेखिका म्हणतात की, झाराचा हा मन:पूर्वक लेखनप्रपंच म्हणजे उत्कृष्ट लेखनाचा अविस्मरणीय अनुभव होय! अतीव क्रौर्याच्या विळख्यात सापडल्यावरही मानव निव्वळ आपल्या इच्छाशक्तीच्या आणि हुशारीच्या बळावर त्या प्रतिकूल परिस्थितीवर कसा  मात करू शकतो, याचा उत्कृष्ट नमुना म्हणून हे पुस्तक सोल्झेनीसन वा प्रायमो लेव्ही यांसारख्या मातब्बर लेखकांच्या कार्याच्या पंगतीत जाऊन बसले आहे.

**'मी झारा गहरमानी : एक देशद्रोही'**

**लेखक** : झारा गहरमानी
**अनुवाद** : रेश्मा कुलकर्णी-पाठारे
**प्रकाशक** : मेहता पब्लिशिंग हाऊस
**किंमत** : रु. २००/-






# जुलमी तालिबानी राजवटीमध्ये स्त्रियांना आत्मनिर्भर करणाऱ्या उद्योजिकेची प्रेरणादायी कथा

पाच बहिणी, एक विलक्षण कुटुंब आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणाऱ्या एका तरुणीची कथा... असे थोडक्यात म्हणता येईल ते म्हणजे गेल झेमॉक लेमॉन यांनी लिहिलेल्या अणि वर्षा वेलणकर यांनी अनुवादित केलेल्या 'खैरखानाची उद्योजिका' या पुस्तकाबद्दल.

तालिबान नावाचं दुष्टचक्र अफगाणिस्तान आणि तेथील लोकांच्या नशिबी बहुधा कायमस्वरूपी आहे; पण जेव्हा ते पहिल्यांदा या देशात आपल्या सर्व शक्तीनिशी उभं ठाकलं, तेव्हा मात्र देशाची दैना झाली होती. त्याचा सगळ्यात जास्त त्रास या देशातील महिलांनी भोगला. या स्त्रियांनी आपापल्या परीनं आलेल्या परिस्थितीचा सामना केला. अशाच कथा या पुस्तकात वाचायला मिळतात. अभ्यासाचा भाग म्हणून गेल झेमॉक लेमॉन यांनी देशातील महिला उद्योजिकांचा शोध घेण्याचे ठरविले आणि अफगाणिस्तानातील तिच्या या सफरीत तिला कमिला सिद्धिकी भेटली. तालिबान आणि त्यांच्या देशाची संस्कृती जपण्यासाठी सुरू झालेल्या मोहिमेचा पहिला बळी अफगाणिस्तानातील महिला वर्ग होता. स्त्री ही पुरुषांना अनैतिकतेकडे घेऊन जाणारी एक 'बला' आहे आणि तिला दूर सारण्यासाठी तिच्या पायाचं नखही दिसता कामा नये, अशा विक्षिप्त विचारांच्या या राज्यकर्त्यांनी देशातील सगळ्या महिलांना वेठीस धरलं आणि मनमानी करायला सुरुवात केली. मुलींना शिक्षणासाठी केलेली बंदी मात्र अनेकांच्या जिव्हारी लागली आणि तेव्हाच एका छुप्या संघर्षाला सुरुवात

झाली. बंधनांना झुगारून न देता त्यांच्या दायऱ्यात राहून या महिलांनी आपलं स्वत्व जपण्यासाठी जे केलं त्यांचं प्रतिनिधित्व करणारी कमिला सिद्धीकी ही एक तरुणी आहे. प्रचंड आशावादाच्या जोरावर तिनं स्वत:च्या कुटुंबासाठीच नाही तर समाजासाठीही जे केलं त्याची अतुलनीयता निर्विवाद आहे. पुस्तक लिहिताना लेखिकेच्या हाती होतं, ते फक्त सत्य. सत्याला शब्दबंबाळ करण्याची कधीच गरज नसते. त्यामुळे पुस्तकाची ओघवती शैली वाचकाला थेट कमिलाच्या पुढ्यात घेऊन जाते. अफगाणिस्तान, तिथली राजकीय परिस्थिती, महिलांचे हाल किंवा आणखी बरंच काही या पुस्तकाच्या माध्यमातून वाचायला मिळतं; पण वाचकांच्या मनाला सगळ्यात जास्त भिडणारी गोष्ट म्हणजे व्यक्तीच्या अंगभूत विरोधाभासी वृत्तीमधल्या योग्य वृत्तीची निवड करण्याची पद्धत. संकट असामान्य आणि कुणालाही नेस्तनाबूत करण्याची क्षमता असलेलं होतं; पण तशा परिस्थितीतही एका तरुणीनं स्वत:तील एका योग्य वृत्तीची निवड करून आयुष्यात कसे बदल घडवून आणले, याची ही कहाणी आहे.

**'खैरखानाची वस्त्रोद्योजिका'**
**मूळ लेखक :** गेल झेमॉक लेमॉन
**अनुवाद :** वर्षा वेलणकर
**प्रकाशक :** मेहता पब्लिशिंग हाऊस
**किंमत :** रु. २००/-










अनोखे सस्तन प्राणी

*हिमसम्राट*

# ध्रुवीय अस्वल

# Polor Bear

आपल्या वसुंधरेवर कुठे रखरखीत वाळवंटे आहेत, तर कुठे सदा सर्वकाळ बर्फाच्छादित भूप्रदेश आहे. जवळपास ७० टक्के भूभाग तर सागर, महासागरांनी व्यापलेला आहे. अशा प्रदेशातही अनेक सजीव प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत आपल्या वंशाची वेल वाढवीत असतात. याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे ध्रुव प्रदेशात आढळणारा हिम-सम्राट अस्वल हा सस्तन प्राणी. भूपृष्ठावरील हे अस्वल म्हणजे जगातील सर्वांत मोठा शिकारी प्राणी तथा हिंस्त्र प्राणी आहे. त्याच्या अंगावरील जलप्रतिबंधक दाट, मऊ केसांचे आवरण आणि कातडीखाली असलेली जाड चरबी यामुळे रक्त गोठवून टाकणाऱ्या बर्फाळ प्रदेशातील कडाक्याच्या थंडीतदेखील हे अस्वल सुखा-समाधानाने राहू शकते, तसेच आर्क्टिक या उत्तर ध्रुवाकडील गोठणाऱ्या महासागरातही ते अनेक तास पोहू शकते. निसर्गाने त्याला ही वैशिष्ट्यपूर्ण देणगी दिल्यामुळे अस्वल हे पेंग्विन पक्ष्यांप्रमाणेच हिमसम्राट म्हटले पाहिजे. नर अस्वले एकदा का पळू लागली की, शरीरात उष्णता निर्माण करू शकतात. तसेच त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वर्षातील दीर्घ काळ ती हिमनगाच्या प्रचंड कड्यावर



राहतात. दर दिवशी हे अस्वल ४० किमी. प्रवास करते. हा प्रवास त्याला अन्नच्या शोधार्थ करावा लागतो, कारण अशा प्रदेशात भक्ष्याचीदेखील वानवा असते. एका अंदाजानुसार जन्मापासून मरेपर्यंत एक अस्वल सुमारे २,६०,००० चौ.किमी. क्षेत्रावर फिरत असते.

हा प्राणी पट्टीचा पोहणारा म्हणून प्रसिद्ध आहे. विश्रांती न घेता १०० किमी. अंतरापर्यंत तो पाण्यात वल्ह्याप्रमाणे हातपाय हलवीत असतो. आपल्या केसांमधील पाणी काढून टाकण्या-साठी बर्फाच्या मोठ्या तुकड्यांमधून तो स्वत:ला सरकवतो. याचसाठी तो स्वत:ला स्वच्छ ठेवण्या-बाबत कमालीचे जागरूक असतो, कारण अस्वच्छ केस थंडीला विरोध करू शकत नाहीत. अत्यंत जीवघेण्या थंडीच्या दिवसात तो बर्फातच खोल खड्डा खणून, अंगाचे वेटोळे करून निवारा घेतो. नाकातोंडातून उष्णता बाहेर पडू नये म्हणून तो आपल्या पंजांनी मुस्कट झाकून घेतो. हे प्राणी एकमेकांशी नम्रपणे वागतात, त्यामुळे एकाने मारलेले भक्ष्य दुसऱ्यालाही खायला मिळते. अस्वल दुसऱ्याकडून अन्न मिळविण्यासाठी वेग-वेगळ्या युक्त्या अवलंबीत असते. ते हळूहळू दुसऱ्या अस्वलाजवळ जाते. त्याच्याभोवती गिरक्या घेते आणि नाकाला नाक घासून शुभेच्छा, प्रेम व्यक्त करते आणि भक्ष्यामध्ये वाटेकरी बनते. तरुण अस्वले एकमेकांशी भांडतात, मस्ती करतात आणि लढाईही करतात. ही लढाई खोटी खोटी किंवा लुटुपुटीची असते.

वसंत ऋतूत नर-मादीचे मीलन होते. मादीमध्ये गर्भधारणा खूप उशिरा म्हणजे उन्हाळ्याच्या शेवटी होते. अशा वेळेस मादीच्या शरीरात पुरेशी चरबी साठवलेली असते. नंतर ती प्रसूतीसाठी गुहा खोदते. त्यात काही काळ निष्क्रिय राहते व नंतर पिलांना जन्म देते. जर पुरेशी चरबी शरीरात नसेल, तर गर्भाची वाढहोत नाही. जन्माला आलेल्या पिलांना आई जवळपास २ वर्षे अन्न भरविते.

या अस्वलाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे गंधज्ञान अत्यंत तीक्ष्ण असते आणि पाण्याखाली असतानाही त्याची दृष्टी तीक्ष्ण असते. समुद्र-किनाऱ्यावरील बर्फांच्या तुकड्यांमध्ये अस्वल आपले भक्ष्य शोधते. जवळपास सील माशांच्या श्वसनासाठी असलेल्या बिळ्याजवळ तासन्तास हे अस्वल दबा धरून बसते. सील माशाने आपले डोके वर काढले म्हणजे अस्वल त्यावर हल्ला करून पकडते. भक्ष्याला कडकडून चावा घेऊन अथवा आपल्या मजबूत पंजाच्या फटक्याने त्याला ठार मारते, त्यामुळे या अस्वलांना सील माशाची शिकार करण्यासाठी बर्फाची आवश्यकता असते. उन्हाळ्यात जेव्हा हिमनग उत्तरेकडे सरकतात तेव्हा भक्ष्य शोधण्यासाठी अस्वलांना शेकडो किमी. प्रवास करावा लागतो.

ध्रुवीय अस्वल हा मांसाहारी प्राणी असून उत्तर गोलार्धातील ध्रुवीय प्रदेशात तो सर्वत्र आढळतो. रशिया, नॉर्वे, ग्रीनलँड, कॅनडा व अलास्का इ. प्रदेशात हे अस्वल सापडते. या अस्वलाचे शास्त्रीय नाव उर्सस मॅरिटिमस (*Ursus maritimus*) असून ते २ ते ३.४ मीटर लांब असते व नराचे वजन ४०० ते ६८० किग्रॅ. असते. मादी ४ ते ५ वर्षांत वयात येते, तर नराला वयात यायला ८ वर्षे लागतात. मादी एका खेपेला १ ते ४ पिलांना जन्म देते. सामान्यपणे २ पिले जन्माला येतात. त्यांचे प्रमुख खाद्य सील मासे हे असले, तरी समुद्रपक्षी, मासे, छोटे सस्तन व पक्ष्यांची अंडीही ते फस्त करतात. या अस्वलाचे आयुष्य २० ते २५ वर्षांचे असते. त्याचे डोळे व कान लहान असतात. त्यातून उष्णता वाया जाऊ नये हा उद्देश असतो. नाका-तोंडाजवळची कातडी काळी असते. उष्णता शोषून घेण्यासाठी हा रंग उपयुक्त असतो. पुढचे

पंजे मजबूत, पसरट आणि मोठे असतात. पाच बोटे अर्धवटरित्या कातडीने एकमेकांना जोडलेली असतात. पाण्यात पोहण्या-साठी वल्ह्याप्रमाणे त्यांचा उपयोग होतो. मागच्या पायांचे तळवे मोठे असून त्यात निर्वात पोकळी असते. बर्फावर चालताना घट्ट पकड्यासाठी त्यांचा उपयोग होतो. ध्रुवीय पांढरे अस्वल व तपकिरी अस्वल यामध्ये संकर घडवून प्रजननक्षम संकरित अस्वले तयार करता येतात.

या प्राण्यांच्या शिकारीवर बंदी घालण्यात आली असून आजमितीला २५ हजार पांढरी अस्वले या प्रदेशात आहेत. जागतिक वाढत्या तापमानाचा धोका त्यांना आहे. वाढत्या तापमाना मुळे बर्फ लवकर वितळते आणि हिवाळ्यात उशिरा गोठते. त्यामुळे या अस्वलांना शिकारी-साठी कमी वेळ मिळतो. तसेच या प्रदूषणाचाही फटका त्यांना बसतो.

**– प्राचार्य डॉ. किशोर पवार,**
**प्रा. सौ. नलिनी पवार**

❖


**समस्त जीवित आणि नामशेष प्राणिसृष्टीतील प्राणी, पक्षी, जलचर, आणि उभयचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी चित्रमय सफर...**


१. जलसम्राट मासे
२. अजब सर्पसृष्टी
३. उभयचरांचे अनोखे विश्व
४. आकाशसम्राट पक्षी
५. पाणथळीतले पक्षी
६. मनोरंजक सस्तन प्राणी
७. डायनोसॉरचे अद्‌भूत विश्व
८. अनोखी मत्स्यसृष्टी
९. अनोखे सस्तन प्राणी
१०. सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग


'आपली सृष्टी' १० पुस्तकांची मालिका
किंमत प्रत्येकी ११० रूपये


# रिकाम्या जागेत योग्य तो अंक लिहा


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २० | | | | |
| | | - | | | | |
| १६ | - | | = | ८ | | |
| - | | = | | | | |
| | | १२ | - | | = | ६ |
| = | | | | | | |
| ११ | - | ४ | = | | | |
| | | | | - | | |
| | | ५ | - | २ | = | |
| | | | | = | | |
| | | | | | | |


# नवं कोरं



चिकन सूप
फॉर द सोल
फॅमिली मॅटर्स
भाग १
कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावस्पर्शी कथा
संपादन आणि संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
ॲमी न्यूमार्क । सुसान एम.
मेहता पब्लिशिंग हाऊस



दम्याविषयी
जाणून घ्या,
दमा नियंत्रणात
ठेवा
चिकन सूप
फॉर द सोल
अस्थमा
मूळ लेखक
नॉर्मन एच. एडेलमन, एम.डी
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
मेहता पब्लिशिंग हाऊस





चिकन सूप
फॉर द सोल
फॅमिली मॅटर्स
भाग २
कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावस्पर्शी कथा
संपादन आणि संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
ॲमी न्यूमार्क । सुसान एम.
मेहता पब्लिशिंग हाऊस


चिकन सूप
फॉर द सोल
टू लव्ह
भाग १
प्रेमाचं अद्वैत स्पष्ट करणाऱ्या रंगतदार कथा
संपादन आणि संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन । ॲमी न्यूमार्क
मेहता पब्लिशिंग हाऊस


सुडौल राहा


पाठदुखीविषयीची शास्त्रीय माहिती वेधक स्वरूपात
चिकन सूप
फॉर द सोल
बॅकपेन
मूळ लेखक
जोनाथन ग्रीर
एम.डी. एफ.ए.सी.पी., एफ.ए.सी.आर.
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन
मेहता पब्लिशिंग हाऊस


चिकन सूप
फॉर द सोल
टू लव्ह
भाग २
प्रेमाचं अद्वैत स्पष्ट करणाऱ्या रंगतदार कथा
संपादन आणि संकलन
जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन । ॲमी न्यूमार्क
मेहता पब्लिशिंग हाऊस

**RNI NO-MAHMAR/2000/2739**
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 Feb, 2017. Posting Date : 11 Feb, 2017.


# आवर्जून वाचावे










**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.